
साप्ताहिक

# माणूस

८ सप्टेंबर ८४/२ रुपये



साप्ताहिक

# माणूस

¤

वर्ष : चोविसावे

अंक : पंधरावा

¤

८ सप्टेंबर १९८४

किंमत : दोन रुपये

¤

संपादक

श्री. ग. माजगावकर

¤

साहाय्यक

दिलीप माजगावकर

सौ. निर्मला पुरंदरे

मेघा राजहंस

¤

वार्षिक वर्गणी

साठ रुपये

¤

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

¤

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

¤

: पत्ता :

साप्ताहिक माणूस

१०२५ सदाशिव, पुणे ४११ ०३०

दूरध्वनी ४४३४५९

¤

मुखपृष्ठ

सुरेश नावडकर

## सप्रेम नमस्कार, माणूस

¤ आपला ता. १८ ऑगस्ट ८४ चा अंक व त्यापूर्वीचा प्रत्येक अंक आवडीने वाचते, त्यातले कोणते सदर आवडत नाही असे म्हणावयास आपण वावच देत नाही, किंबहुना म्हणताच येत नाही.

सौ. शोभा भागवत लिखित ('बोंब मारायची') 'गाराचा पाऊस' हे सदर तर आवडलेच; परंतु आजपर्यंतच्या त्यांच्या लिखाणातून त्यांनी घर–संसाराच्या (मुलं–बाळं, शिक्षक, संस्कार, संस्कृती, शिक्षण, स्वयंपाक इ. इ.) आणि स्त्रीला जास्तीत जास्त स्वावलंबी करण्याच्या गुजगोष्टी सांगितल्या आहेत. धन्यवाद !

आपल्या साप्ताहिकात 'पुढील अंकी' ... आणि इतर फालतू (जी आज आकर्षक वाटतात) बाबी नसूनही त्याची ओढ, उत्सुकता असते व ती नेहमीच राहावी असे वाटते.

२१ ऑगस्ट ८४ **सुलोचना अहिरे**
करंजखेडा

¤ सुभाष काळे यांचा 'गुलबर्ग्याचे पत्रकार सिद्धरमेशची हत्या' हा लेख (२५ ऑ. ८४) वाचला. त्यातील हत्येसंबंधीचा मजकूर, पूर्वी घटना घडल्यानंतर लगेच, बऱ्याच वृत्तपत्रातून येऊन गेला आहे. त्यामुळे हा शिळा वाटतो. सा. माणूसचे संपादक चालू घडामोडींविषयी अतिशय जागरूक असूनही सिद्धरमेशच्या हत्येविषयीचा मजकूर प्रसिद्ध व्हायला बराच विलंब लागला याविषयी आश्चर्य वाटले.

दुसरा मुद्दा कन्नड (कानडी हा भ्रष्ट शब्द आहे.) भाषेची सक्ती व मराठी अल्पसंख्यांकाविषयीचा. गुलबर्ग्याला ४५ टक्के मुस्लिम समाज आहे व ५५ टक्के कन्नड व मराठी समाज. उर्दूचा प्रभाव उघड आहे. गुलबर्गा–बीदर–रायचूर–विजापूर हा भाग उर्दू भाषेने प्रभावित आहे. कन्नड–मराठीवर उर्दूचा प्रभाव आहे त्याचं कारण हा भाग निझामाच्या आधिपत्याखाली होता व मुस्लिम बहुसंख्यांकांमुळे उर्दूचा प्रभाव पडणं स्वाभाविक आहे. उर्दू ही राजभाषाच होती. आजही कन्नडमध्ये 'चुनाव परिणाम' (निवडणुकीचा निकाल) सारखे शब्द वापरले जातात. कन्नडची किंवा मराठीची सक्ती होते हे म्हणणं तितकसं खरं नाही. सीमावर्ती भागातील राजकारण्यांनी स्वार्थासाठी उठवलेली ही आरोळी आहे. गेल्या वर्षापासून गुलबर्गा विद्यापीठात मराठी विभाग चालू झाला आहे. तेथून 'अनुबंध' नावाचे दर्जेदार त्रैमासिक प्रकाशित होते. तिथेच कर्नाटक राज्य मराठी महामंडळ सतत मराठी साहित्यिकांना आमंत्रित करते. ही माहिती काळेंना नाही काय ? वस्तुस्थिती अशी आहे की, भाषा विचार व्यक्त करण्यासाठी वापरली जाते. कुठलाही मानवी व्यवहार अडू नये म्हणून तिचा उपयोग होत असतो. कन्नड असो की मराठी, कुठलीही भाषा सक्तीने आत्मसात करता येत नसते. सीमावर्ती भागातील लोकांना स्वाभाविकपणे बहुभाषिक राहावं लागतं. याचं एक उदाहरण देतो. दक्षिण सोलापूर विभागात कन्नड भाषिकांची संख्या अधिक आहे. एका खेडेगावात मराठी हायस्कूल आहे. शिक्षक मराठी-कन्नड भाषिक आहेत; पण शिक्षकांना मराठी भाषा कन्नडमधून शिकवावी लागते कारण विद्यार्थ्यांना मराठी समजत नाही. शाळा तर टिकवायची आहे. निकालही उत्तम ठेवायचा आहे. मग काय करायचं ? मग शिकवा झाड म्हणजे गिडा, घोडा म्हणजे कुद्रे. तसं नाही केलं तर मुलं शाळेत येणारच नाहीत व अनेकांच्या पोटाचा प्रश्न असल्यामुळे महाराष्ट्र शासन ती शाळा बंदही करू शकत नाही. खरं तर या गावी कन्नड हायस्कूलची गरज आहे,

पण कोण लक्ष देतो–राजकीय डावपेच व स्वार्थापुढे ? या गावातील लोक आमच्यावर मराठीची सक्ती होते अस म्हणत नाहीत. तसच गुलबर्ग्याचेही म्हणता येईल. तेथील मराठी समाज आमच्यासर कन्नडची सक्ती होते अस म्हणूच शकत नाही. त्याना कर्नाटकात जीवन कठायच आहे. कन्नड भाषा तशी अवघड नाही. थोडा प्रयत्न केल्यास कोणालाही कन्नड भाषा लवकर अवगत होईल

२८ ऑगस्ट ८४ **विश्वनाथ थोन्टे**
सोलापूर

¤ १ सप्टेंबरच्या आपल्या अकातील सौ. सुधा सोमण याचा 'अनुभव' वाचला त्याच्यासारखी स्थिती अनेक स्त्रियांची होते त्यापैकी एक मीपण होते, पण मला खूप विचारानी पटलेला एक मार्ग सुचवीत आहे

आपल्याला भेटलेल्या गरीब व्यक्तीला मदत करावीशी वाटते ती त्या व्यक्तीविषयी खास जिव्हाळा असतो अस म्हणण्यापेक्षा सध्या समाजात 'आहे रे' आणि 'नाही रे' याच्यामध्ये जी प्रचड दरी आहे ती पाहून आपण व्यथित होतो. काही तरी करावस वाटत आणि त्यातूनच असे मदत देण्याचे प्रसंग उद्भवतात त्यावर उपाय म्हणून अनाथाश्रम, S. O S. बालसदन, बाबा आमटयाच आनदवन तपोवन अशा कुठल्या तरी सस्थेला आपल्या प्राप्तीपैकी ठराविक रक्कम नियमितपणे दरमहिना देत जावी. या सर्व सस्था सामाजिक असमतोल कमी करण्यास हातभार लावतात मग हे कृत्य जर आपल्या हातून नियमित होत असेल तर जाता–येता भेटणारे गरीब पाहून जरी कणव आली तरी मन घट्ट करता येईल व मागाहून पश्चात्तापाची वेळ येणार नाही, हा माझा 'अनुभव' आहे भगिनीनी जरूर प्रयोग करून पहावा मन शाती लाभेल·

३० ऑगस्ट ८४ **विमला राव**
पुणे

¤ दि. १-९-८४ च्या 'माणूस' अंकातील 'अनुभव–त्याच्याशी कसं वागायच ?' या लेखासंबधात काही लिहू इच्छितो.

कोणतीही गोष्ट करताना त्यामागे आपला काहीएक हेतू असतो. तो हेतू त्या कृतीने साध्य होईल अशा बेताने आपण एखादी कृती करीत असतो, पण त्या कृतीने तो हेतू साध्य होतोच असे नाही असा बऱ्याच वेळा अनुभव येत असतो. म्हणजेच आपल्याला अपेक्षित फळ मिळेल अथवा मिळणारही नाही अशी दोन्हीही तऱ्हेची तयारी जर त्या व्यक्तीच्या डोक्यात असेल तर लेखक–बाईंना पडलेला प्रश्न खरोखर पडणार नाही 'कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन' या उक्तीचा अर्थ मी तरी असा धरतो (हा अर्थ कदाचित आणखी कोणाला मान्य होणार नाही); पण हा अर्थ घेतला तर बाईंच्या प्रश्नाचे उत्तर मिळते ते असे की, आपणाला त्या त्या वेळेला जे जे योग्य वाटत असेल ते ते करीत रहाणे. अपेक्षित फळ मिळेल अथवा मिळणार नाही, पण काहीच कृती केली नाही तर मात्र फळ बिलकुलच मिळणार नाही दुसरे असे की, आता एक काम योग्य वाटते; पण दुसऱ्या क्षणी ते अयोग्यही वाटेल. तर त्या दुसऱ्या क्षणी जे योग्य वाटेल तेच करायचे.

दुसरा मुद्दा असा की, बाईंनी अपात्री दानाची गोष्ट सागितली; पण सत्पात्री दानाचेही त्याना काही अनुभव आले असतीलच.

आणखी एक मुद्दा असा की, जरी अनुभवातल्या गोष्टीतील स्त्रीला तात्कालिक स्वरूपाची मदत पाहिजे होती तरी एरवी अध, अपग माणसाना मदत करताना त्याना आपल्या पायावर उभे रहायला लावणे हीच खरी मदत आहे, म्हणजे अशा लोकाना भीक न देणे हीच खरी मदत होईल Real love is that which allows each one to grow independently.

२९ ऑगस्ट ८४ **श्रीराम अनंत केतकर**
दादर

☐

## पुणे वार्ता

# संघव्रती

## रामदासजी कळसकर

तरुण भारतच्या आवारात जावे, एखाद्या व्यक्तीने चेहऱ्यावरच्या प्रसन्न हास्याने आणि आपल्या नावाने हाक मारून आपले स्वागत करावे आणि जणू या माणसाची नि आपली वर्षानुवर्षे ओळख आहे अशा थाटात सवाद व्हावा हा अनुभव खरोखर न विसरण्यासारखा आहे हा अनुभव कोणा एकाला आलेला नाही तर बहुसख्य लोकाचा हा अनुभव आहे. हे हसतमुख व्यक्तिमत्त्व म्हणजे रामदासजी कळसकर.

सघाच्या परिभाषेत काही विशिष्ट शब्द आहेत. 'आपला माणूस' हा असाच एक शब्द. माणस जोडण हेच मुख्य काम असल्यान स्नेह निर्माण करणं, जवळीक साधण आणि त्याला 'आपला' बनवण हे सूत्र प्रत्येक स्वयसेवकाच्या डोक्यात असत–असलं पाहिजे. रामदासजीशी एकदाच बोललेला किंवा त्याच्या सहवासात काही काळ घालवलेला माणूस परत त्याच्याकडे आकृष्ट झाला नाही असे कधीच होत नसे. म्हणूनच रामदासजी हा सर्वांचाच 'आपला माणूस' होता आणि रामदासजीही सर्वांना 'आपला माणूस' मानीत असत गुरुवार २३ ऑगस्टला त्याचे निधन झाले. कर्करोगाला १२ वर्षे उरात बाळगून नतर मृत्यूचाही त्यानी हसतहसत स्वीकार केला.

बडोद्याला जन्म, जुन्नरला बालपण आणि पुण्याला महाविद्यालयीन शिक्षण असा अगदी सुरुवातीपासूनच त्याचा 'प्रवास' चालू होता. त्यानतरही अखेरपर्यंत त्यानी अखड प्रवास केला, मात्र ध्येय एकच होते. जुन्नरला शिशुवयातच भगव्या ध्वजाची दीक्षा घेतलेली होती, राष्ट्रीय स्वयसेवक सघाचे माध्यम स्वीकारले होते. सघकार्य हेच त्यानी आपले जीवनकार्य मानले आणि जीवनाचा प्रवास अव्याहतपणे या कार्याच्या दिशेनेच

केला आणि म्हणूनच कळसकराच्या कार्याचा मोठेपणा !

कळसकरासारख्या एखाद्या कार्यकर्त्या-बद्दल एवढे भारावून लिहायचे कारण काय ? याचे उत्तर अगदी साधे आहे हिंदू समाजाचे हित एवढे व्यापक ध्येय समोर ठेवून जीवन जगणारा हा कार्यकर्ता होता आणि त्यासाठी सर्वस्व समर्पण करण्याची वृत्ती होती. भोमला मिलिटरी स्कूलमध्ये घेतलेले लष्करी शिक्षण आणि वकिलीचेही शिक्षण पूर्ण केल्यानतर त्याना ही दोन्ही क्षेत्रे कर्तृत्व गाजविण्यासाठी, भरपूर पैसा मिळविण्यासाठी खुली होती; पण या सगळयाकडे पाठ फिरवून एकदा सघाशी घनिष्ठ नाते जोडल्यानतर बाकी सर्व गोष्टी त्यानी दुय्यम मानल्या रामदासजी म्हणजे कोणी असामान्य आणि अलौकिक महापुरुष नव्हते तरीपण मिळवलेल्या एवढया मोठेपणाचे रहस्य काय ?

२५ ऑगस्टला शनिवारी पुण्याच्या मोतीबाग सघकार्यालयात श्रद्धाजली सभा झाली. या वेळी बोलताना श्री. नानाराव ढोबळे यानी याचा उलगडा केला. संघाचा विचारही आपल्या भाषणात त्यानी या प्रसगी माडला ते म्हणाले—

' सघामधले अनेक प्रचारक एवढे खबीरपणे आणि तरीही सहजतेने आपले सर्वस्व, आपले आयुष्य कार्यासाठी झोकून कसे काय देतात, यामागची प्रेरणा तरी कोणती असा अनेकाना प्रश्न पडतो. ही प्रेरणा आहे भगव्या ध्वजाची ! कळसकराना ही प्रेरणा मिळाली होती. ते असे महापुरुष नव्हते की ज्याच्याकडे पाहून एखाद्या कवीला कविता सुचावी? पण भावनेच्या एका विशिष्ट अवस्थेत केलेले उदात्त काव्य मात्र रामदासजीच्या जीवनाकडे पाहिल्यानतर सजीव आणि साकार झाल्याचे दिसून येते. एवढे उदात्त जीवन ते जगले याचे कारण सघ आणि समाजसमर्पित वृत्ती हेच होय समाज हाच ईश्वर आणि हिंदूचे समाजजीवन समृद्ध करण हेच ध्येय मानल्यामुळे वैयक्तिक जीवनातली अनेक दु खे, सकटे प्रसन्नचित्ताने आणि हसऱ्या चेहऱ्याने त्यानी परतवून लावली आणि त्याचमुळे मृत्यूशीही ते खेळगडयासारखे वागले. त्याच्या हसतमुख चेहऱ्याचे आणि प्रसन्नचित्तामागचे हेच खरे मर्म आहे


जबलपूरहून श्री कानिटकराच्या एका पत्राचा आशयही नाना ढोबळयानी सागितला कानिटकरानी एका 'वाक्यात कळसकराचे मोठेपण व्यक्त केले आहे ते लिहितात ' शालेय महाविद्यालयीन शिक्षण घेणाऱ्याना आदर्श जीवनाची उदाहरणे सागण्यासाठी पुराणात किंवा इतिहासात शिरण्याची आवश्यकता नाही, कळसकराच्या जीवनाकडे बोट दाखविले तरी पुरे '

जससघाचे विस्तारक, प्रचारक, सघाचे प्रचारक, आसाम मित्र मडळाचे कार्यवाह, नुकत्याच स्थापन झालेल्या भारतीय विचार-केंद्राचे अग्रणी कार्यकर्ते आणि सघपरिवारातील विविध योजनामध्ये हिरीरीने ते काम करत असत.

नानारावानी सागितले त्याप्रमाणे त्याच्या बुद्धीचा निश्चय आणि जीवनाकडे बघण्याचा दृष्टिकोन निश्चित झाला होता. म्हणूनच सामान्यत्वातून ते असामान्य होऊ शकले, अनेक माणसे जोडता जोडता एकीकडे स्वत चे दुर्गुण सुटत जातात रामदासजी तर माणसाना जिंकत असत प्रसन्नचित्तता आणि हृदयाची विशालता या दोन गुणावर त्याना हे जमत असे आपल्या दु खाचे आणि सकटाचे पाढे इतरासमोर वाचण्याची प्रत्येकाची स्वाभाविक प्रवृत्ती असते, पण आत कर्करोगासारखा भयकर रोग शरीर पोखरत असूनसुद्धा त्याच्या चेहऱ्यावरचे हास्य कधी मावळले नाही. केवळ सघाच्याच नाही तर कुठल्याही क्षेत्रात काम करणाऱ्याना 'हाडाचा कार्यकर्ता ' कसा असावा हे रामदासजीच्या जीवनाकडे पाहिल्यानतर कळेल

नानारावानी सर्व स्वयसेवकाना उद्देशून सागितले की, ' व्यापक हिंदूहिताचा विचार करण हाच रामदास कळसकराच्या जीवनाचा सदेश आहे आणि त्यासाठी आपल्या सर्वस्वाचा त्याग करण्याची तयारी आपण ठेवली पाहिजे ' ' कर्तृत्वाची खडणी देऊ एकमुखाने सघाला ' हे पद त्यानी प्रत्यक्ष अनुभवले ते आचरणात आणण्याचा प्रयत्न प्रत्येक स्वयसेवकाने केला पाहिजे '

—निरंजन



## मुंबापुरी

### □ स्वायत्तता संपुष्टात

राज्यसरकारने गेल्या अधिवेशनात माडलेल्या नवीन युनिव्हर्सिटी बिलामुळे सध्या मुंबई विद्यापीठात खळबळ माजली आहे. हे बिल तयार करण्यासाठी राज्यपाल लतीफ यानी पुढाकार घेतला असे म्हटले जाते. बिल जर पास झाले तर राज्यातील सर्वच विद्यापीठाना जी थोडी—फार स्वायत्तता आहे ती सपूर्णपणे नष्ट होऊन शिक्षणखात्यातील अधिकाऱ्याची सत्ता विद्यापीठावर प्रस्थापित होईल अशी शिक्षकाना भीती वाटत आहे आणि ती रास्तच आहे.

या बिलामुळे विद्यापीठातील सेनेटच्या सभासदाची सख्या दोनशेवरून शभरावर आणि कार्यकारी मंडळाच्या सभासदाची सख्या एकवीसवरून पधरावर आणण्यात आली आहे प्रश्न केवळ सख्येचा नाही, तर ह्या बिलामध्ये विद्यापीठातील निवडणुकाना सपूर्णपणे काट दिला आहे आणि त्या जागी नॉमिनेटेड मेंबर्सचा भरणा करण्यात आला आहे. सरकारचे असे म्हणणे आहे की, निवडणुकामुळे विद्यापीठात मोठया प्रमाणावर राजकारणी लोकाचा शिरकाव झाला आहे

या कायद्यात राज्यपालाना जास्तीत जास्त अधिकार देण्यात आले आहेत सध्याच्या कायद्याप्रमाणे राज्यपाल हा विद्यापीठाचा घटनात्मक परतु नामधारी प्रमुख असतो. प्रत्यक्ष कारभारात उप—कुलगुरूला अधिक स्वातत्र्य असते आता ह्या नवीन बिलानुसार उपकुलगुरूची निवडही सपूर्णपणे राज्यपालाच्या मर्जीनुसार होईल

आणि राज्यपालाना उप-कुलगुरूना काढताना कोणतेही कारण द्यायची गरज भासणार नाही नागपूर, मराठवाडा, शिवाजी आणि पुणे विद्यापीठात गेल्या एक-दोन वर्षात जे गैरप्रकार घडले आणि पैशाच्या अफरातफरीची जी प्रकरणे झाली त्यामुळे अशा तऱ्हेचे अधिकार राज्यपालाना देण्यात आले असे राजभवनातून सागण्यात येते.

आहेत त्याच अधिकारात राज्यपाल काय चमत्कार करू शकतात हे आपण हरियाणा, काश्मीर आणि आता आध्रप्रदेशात पाहिलेच आहे त्यामुळे सध्याचे राज्यपाल कितीही थोर असले तरी रामलालसारखे सत्पुरुष जर महाराष्ट्राच्या वाट्याला आले तर थोड्याच अवधीत ते येथील विद्यापीठाना कॉंग्रेस आयची पार्टी-ऑफिसेस करून सोडतील !

सध्याच्या कायद्याखाली विद्यापीठाचा कारभार मोठा सुरळीत चालला आहे असे आमचे म्हणणे नाही, पण सुधारणेच्या नावाखाली लोकशाही पद्धतीच्या मुळावरच घाव घालणे योग्य नाही. मुबई महानगरपालिकेची मुदत सपली असताना तिचा कारभार सुधारण्यासाठी सरकारने ती बरखास्त करून ताब्यात घेतली. त्याला आता पाच महिने झाले, पण त्यामुळे कारभारात कितपत सुधारणा झाली ? केवळ स्थानिक स्वराज्यसस्था नष्ट करायचे पुण्य मात्र सरकारच्या पदरी पडले !

बिहार, दिल्ली किंवा उत्तरप्रदेश येथील विद्यापीठात जितके मोठ्या प्रमाणावर राजकारण चालते तितके महाराष्ट्रातील विद्यापीठात चालत नाही आणि जेवढे आहे ते कोणत्याही लोकशाही व्यवस्थेला पोषक असावे तेवढेच आहे

विद्यापीठाच्या होत चाललेल्या अधोगतीची लतीफसाहेबाना इतकी घोर चिंता पडली आहे, पण राज्यसरकारने गेल्या वर्षी पन्नासाहून अधिक अभियात्रिकी कॉलेजेस् कॉंग्रेस आयच्या लोकाना खिरापतीसारखी वाटली आणि आता तीन वैद्यकीय महाविद्यालयेही काढली. (यात ज्ञानमहर्षी आयुर्वेदाचार्या शालिनीताई पाटील याचेही एक कॉलेज आहे.) त्या वेळेस राज्यपालाचा हा कळवळा कोठे गेला होता ? या सस्थाना प्रथम विरोध झाला तो मुबई विद्यापीठाच्या सेनेट आणि कार्यकारी मडळाकडूनच.

### ☐ परंपरेची 'बूज' !

पुण्याच्या त्या चार नगरसेवकाच्या रासलीला वाचून आम्हाला किती किती बर वाटलय मुबई महानगरपालिकेच वस्त्रहरण झाल्यापासून आमचा काउन्सिलर मंडळीशी जवळजवळ कॉंटॅक्ट सपलाच होता. कधी काळी मुबई म्युनिसिपालिटीचा फेरफटका मारला तर नगरसेवकाच्या जुन्या आठवणी म्युनिसिपालिटीवाले खुलवून सागतात; पण पुण्याच हे प्रकरण वाचून आम्हाला परम सतोष झाला की, मुबई महानगरपालिकेच अन् आमच्या दिव्यलक्षणी नगरपित्याचं अनुकरण करणारी गुणी माणस या पुण्यनगरीत आहेत! थोडक्यात अस की, मुबई महापालिका जरी बरखास्त झाली असली तरी या एकशेचाळीस नगरसेवकाची परंपरा पुढे रेटायला पुण्यातले नगरसेवक सज्ज आहेत !

पुण्याच्या त्या चार पुण्यवान नगरसेवकानी हॉटेलात नेमक काय काय केल याची वित्तवातमी अद्याप कळलेली नाही. अर्थात त्यामुळे काहीच बिघडत नाही. मुद्दा एकच आहे की, या नगरसेवकानी एका थोर, वैभवशाली, गौरवदायी परपरेची बूज राखली आहे आम्हाला इतके दिवस अस वाटायचं की, या परपरेच जतन करण्याची जबाबदारी आमच्या मुबईकर नगरसेवकावरच आहे आता कळल की, मुबईचे एकशेचाळीस नगरसेवक व्यतीत झाले म्हणून काही बिघडत नाही पुण्याचे नगरसेवक आहेत की ट्रेडिशन पुढे चालवायला !

भाजप, जनता, कॉंग्रेस ( आय ) या सगळ्या पक्षातली युवकमडळी या चार नगरसेवकावर जाम पेटली आहेत आणि या चौघाची जाहीर धिड काढण्याचे मनसुबे वर्तमानपत्रातून आम्ही वाचतोहोत

खर तर हे असे गलिच्छ धिंड-बिंड काढण्याचे प्रकार आम्हाला मान्य नाहीत या सतप्त युवकनेत्यानी मन मोठ ठेवायला हव त्या इदिरा गाधीनी बघा आपल्या रामराव आदिकाना कस मोठ्या दिलान मुआफ करून टाकल. परवा आदिक माता-चरणी लीन व्हायला गेले तेव्हा त्याना पाहून इदिराजी म्हणे म्हणाल्या : 'रामराव, यू लुक बेटर' रामरावना न पिता झिंग चढली !

परवा दिल्लीहून आल्याआल्या रामरावजीनी तातडीन पत्रकाराना घरी बोलावून गेल्या पाच महिन्यात आपण दारू-तंबाकूला सपूर्णपणे सोडचिठ्ठी दिल्याच जाहीर करून टाकलं. एप्रिल १५ च्या 'त्या' दिवसापासून आपण दारूच्या थेंबालाही स्पर्श केला नाही अस त्यानी सागितल. रामरावानी दारू सोडली हा बातमीचा 'इट्रो' होऊ शकेल किंवा नाही हा काथ्याकूट डोक्यात चालू असतानाच एक गोष्ट प्रकर्षाने जाणवली ती ही की, रामरावजीनी मद्यपान सोडल तर आपल्या एका थोर, गौरवशाली परपरेचं काय होणार ?

आता उत्तर मिळालय पुण्याच्या नगरसेवकाकडून आमच्या खप अपेक्षा आहेत सो, आगे बढो, जिगर मुरादाबादीने म्हटलय ना . 'आज पीने का मजा पीकर बहक जाने मे हैं।'

**—विष्णु जयदेव**

---

राजधानी दिल्ली

## जर्मन साहित्य आणि भारतीय संस्कृती

गेल्या आठवड्यात येथील सप्रूहाउसमध्ये एका मनोरजक विषयावर निबंध वाचला गेला विषय होता 'जर्मन साहित्यावर भारतीय सस्कृतीचा उमटलेला ठसा' ( The Impact of Indian Culture on German Literature ). दीडशे वर्षे भारतावर राज्य करणाऱ्या ब्रिटिशाच्या इग्लिश वाङ्मयावर कळत-नकळत परिणाम होणे हे तसे स्वाभाविक होते. तथापि जर्मन साहित्यावर भारतीय सस्कृतीचा कसा परिणाम झाला, हे जाणण्याच्या उत्सुकतेने निबंधवाचन ऐकायला आवर्जून गेले

वास्तविक भारतीय सस्कृतीने अनेक देशातील लोकाना आजतागायत आकर्षित केलेलेच आहे एक तर आपली ही सस्कृती बरीच प्राचीन आहे दुसरे म्हणजे आपल्याइतकी विविधता दुसऱ्या कुठल्याच देशातील संस्कृतीत आढळत नाही. हाडामासात भिनलेल्या आणि रक्तात मुरलेल्या या आपल्या सस्कृतीशी आपण जन्मापासूनच एकरूप

झालेलो असतो तिच्यात वाढत वाढतच ती जाणून घेत असतो तथापि परक्या देशातील लोक आपल्या संस्कृतीकडे कुठल्या दृष्टीने पाहतात, तिचा त्याच्यावर काय परिणाम झाला आहे, हे जाणून घेणे फार मनोरंजक ठरते एका नव्या दृष्टिकोनातून ती आपल्याला जाणवू लागते सबधित विषयावरील निवध ऐकताना ही गोष्ट उत्कटतेने लक्षात आली.

सप्रू हाउसमधील एका दालनामध्ये कार्यक्रमास सुरुवात झाली सुमारे पन्नास लोकाच्या क्षमतेचे दालन होते. सध्याकाळी सहा वाजता दालनामध्ये सुमारे २५ माणसे जमली होती. वक्ते होते जवाहरलाल नेहरू विद्यापीठातील स्कूल ऑफ लॅंग्वेजचे डीन आणि जर्मनचे प्राध्यापक डॉ प्रमोद तलगेरी. विशेष आनदाची गोष्ट वाटली ती म्हणजे वक्ते महाराष्ट्रीय होते श्रोत्यामध्ये आठ–दहा जर्मन स्त्री–पुरुष होते. पैकी काही मॅक्समुल्लरभवनमधील अधिकारी होते. बाकीच्या श्रोत्यापैकी एक-दोघे सोडून सगळेच खास रुचीने आलेले होते. शेवटपर्यत तितकेच श्रोते होते आणि चर्चेत सहभागी होत होते

डॉ. तलगेरीच्या निवंधाचा आशय असा–

'अनेक शतकापासून जर्मन लोकानी भारत आणि भारतीय सस्कृती याचे वैशिष्टचपूर्ण सवध जोपासले. याचे प्रमुख कारण म्हणजे भारतीय जीवन आणि भारतीय संस्कृती यामध्ये अनुस्यूत असलेली अध्यात्मिकता या अध्यात्मिकतेने जर्मनाना भुरळ घातली... विशेष म्हणजे जर्मन आणि भारतीयाचे परस्परसवध हे या आध्यात्मिक आणि वाङमयीय रुचीमधून सुरू झाले. ते राजकीय किंवा आर्थिक प्रेरणेतून निर्माण झाले नाहीत.

इडो–जर्मन सवधाचा प्रारभ अठरा–एकोणिसाव्या शतकामध्ये झाला अठराव्या शतकाच्या अखेरीस जर्मनीमध्ये संस्कृतच्या सशोधनात्मक अभ्यासास सुरुवात झाली. हळूहळू सस्कृत साहित्याचा जर्मन साहित्यावर परिणाम दिसू लागला. इतका की, जर्मन सशोधक सस्कृत शिकू लागले आणि त्यानी सस्कृत साहित्यकृतीची जर्मनमध्ये भाषातरे करण्यास सुरुवात केली त्याद्वारेच युरोपियन लोकाना पौर्वात्य संस्कृतीची ओळख होऊ लागली.

... एकोणिसाव्या शतकात जर्मनानी भाषाशास्त्रीय, आध्यात्मिक, सास्कृतिक आणि वाङमयीन अभ्यासाची उत्कट इच्छा आणि रुची जाणीवपूर्वक जोपासली. मार्टिन वेहाइमसारख्या भूगोलतज्ज्ञाने भारतात येऊन ह्या सुदूर देशाची आपल्या देशवासियाना जेव्हा ओळख करून दिली, तेव्हापासूनच जर्मनाच्या मनात या देशाविषयी कुतूहल निर्माण झालेले होते फॉरिन सर्व्हिसमध्ये असणारे तद्देशीय तर भारतीय सस्कृतीत अगदी सामावूनच गेले होते.

एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस फॉरेस्ट सायन्सचा एक प्रोफेसर डिट्रीच ब्रँडिस हा ब्रिटिशाच्या काळात भारतातील वनखात्याचा इन्स्पेक्टरजनरल बनला. त्याने भारतीय उपखडातील अरण्याचा आणि हवामानाचा खास अभ्यास केला १८७८ मध्ये पहिली भारतीय वन-प्रशिक्षणाची सस्था सुरू करण्याचे श्रेय ब्रँडिसकडे जाते.

भारताचा विविध अंगानी अभ्यास करणाऱ्यापैकी ही काही ठळक नावे तथापि सतराव्या शतकात जे जर्मन मिशनरी दक्षिण भारतात आले, त्यानी मात्र भारतीयाशी दृढ सबध प्रस्थापित केले बार्थोलोम्नॉस झीगेन्बाल्ग हा पहिला जर्मन मिशनरी. हा भाषाशास्त्रज्ञ होता. याने पहिला तमिळ शब्दकोष लिहिला. तसेच याने मलबारी भाषेचे व्याकरण लिहिले. याने अनेक तमिळ पुस्तकाचे जर्मन भाषेत भाषातर केले इतकेच नव्हे तर त्याने पहिल्या ख्रिश्चन चर्चगीताचे तमिळ भाषातरही केले (१७७४). तमिळमधील ख्रिश्चन साहित्याचा तो जनक मानला जातो.

... जर्मनाच्या दृष्टीने भारत हा अध्यात्मिकतेच्या दृष्टीने परिपूर्ण देश आहे गटे हा कालिदासाच्या वाङमयाने, विशेषत 'शाकुतल'ने फारच प्रभावित झाला होता. शाकुतलचा त्याने 'एक परिपूर्ण अभिजात कलाकृती' म्हणून गौरव केला. युरोपमध्ये ही एक फार महत्वाची कलाकृती मानली गेली. अठराव्या शतकात जॉर्ज फॉस्टर या जर्मन वनस्पतिशास्त्रज्ञाने हे नाटक जर्मनीला नेले या नाटकातील प्रेमाचे आणि निसर्गाचे वर्णन व त्याची काव्यमय माडणी पाहून एक अभिजात जर्मन कवी अक्षरशः वेडावून गेला. गटेनेही शाकुंतलच्या उत्कृष्टतेवद्दल परीक्षणे लिहिली. त्याने आपल्या काही नाटकामध्येही शाकुतलमधली सूत्रधाराची कल्पना उचलली अभिजात जर्मन वाङमयाच्या अव्वल काळात हर्डरने शाकुंतलची दुसरी आवृत्ती १८०३ मध्ये प्रसिद्ध केली थेट सस्कृतमधून जर्मनमध्ये केलेले याचे भाषातर १८३३ मध्ये प्रसिद्ध झाले

-- जर्मन रोमँटिक कवीवर ज्याचा गडद ठसा उमटला असे भारतीय सस्कृतीचे दुसरे वैशिष्टच म्हणजे भारतीय पुराणकथा आणि धर्म प्रख्यात रोमँटिक जर्मन लेखक हॅाने याने भारतावर अनेक उत्कृष्ट कविता रचल्या. श्लेगलवधूनी जर्मनीत भारतीय सस्कृतीचा पुष्कळ प्रसार केला. त्यांनी आपले सपूर्ण आयुष्य भारताच्या अभ्यासासाठी खर्ची घातले ऑगस्ट श्लेगलने सस्कृत वाङमय थेट सस्कृतमधून जर्मनीत भाषातरित केले, तर फ्रेड्रिकने भारतीय साहित्य व विशेषत धर्म यावद्दल लेखन केले. भारतीय धर्मविषयक तत्त्वज्ञानाने तो इतका प्रभावित झाला होता की सपूर्ण युरोपचे आध्यात्मिक भारतात रूपातर व्हावे असे त्याला तीव्रतेने वाटले होते. अनेक जर्मन वास्तववादी लेखकानी–कादवरीकारांनी आपल्या वाङमयात भारतीय प्रतिमासृष्टी आणि पुराणकथातील व्यक्ती आणल्या

त्यानतर तथाकथित भारत–जर्मनसवधामध्ये सुमारे ४० वर्षांचा खड पडला. एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धापर्यत जर्मन लेखक भारतीय प्रभावापासून दूर राहिले विसाव्या शतकाच्या सुरुवातीला भारतीय पुराणकथाचा जर्मन साहित्यात पुन्हा शिरकाव झाला अनेक रोमँटिक लेखकानी अध्यात्मिक एकवाक्यता असलेला प्रदेश म्हणून भारताचे चित्र रगवले मॅक्स डॉथेंडी, बोन्सेल्स आणि मॉथनर हे तेथील प्रातिनिधिक रोमँटिक लेखक. नोवेल पारितोषिकविजेते थॉमस मॅन आणि हरमॅन या दोन लेखकानी भारतीय कथाचे जर्मन दृष्टिकोनातून विश्लेषण केले.

भारतोय वास्तुकलाशास्त्र, चित्रकला, मूर्तिकला, सगीत याचाही जर्मन लोकावर प्रभाव पडला होता. वौद्ध तत्त्वज्ञानाचाही अभ्यास काहीनी केला.

पृष्ठ ३२ वर

# आंध्रचा कित्ता राष्ट्रपतींनी गिरवला तर ?

**अभय गोखले**

फरुक अब्दुल्लाचे जम्मूकाश्मिरातील सरकार यशस्वीपणे खाली खेचल्यावर मग रक्ताला चटावलेल्या वाघाप्रमाणे तोच प्रयोग कॉंग्रेस (इ) वाल्यांनी आध्रमध्ये केला, परतु तो प्रयोग त्याना फारच महागात पडणार आहे हे थोड्याच कालावधीत त्याच्या लक्षात येईल. जम्मूकाश्मिर आणि आध्रमधील एकदर राजकीय परिस्थितीत जमीन-अस्मानाचा फरक आहे आध्रमध्ये हात पोळल्याने बहुधा असा प्रयोग कर्नाटकात करण्यास ते धजावणार नाहीत; परंतु तो प्रयोग त्याना कर्नाटकात करण्याची जरुरीही नाही जम्मूकाश्मिर, आध्रप्रदेश याच्याप्रमाणे कटकारस्थान करून कर्नाटकातील सरकार खाली खेचण्याचा प्रकार कॉंग्रेस (इ) वाल्यानी केला तर उलट सत्ताधारी जनताआघाडीचा तोटा न होता फायदाच होईल. कारण जनता व त्याचे मित्रपक्ष आणि त्याचे सघटनात्मक कार्य पहाता आगामी लोकसभा निवडणुकीत जनताआघाडी निम्म्याहून जास्त जागा जिंकण्याची शक्यता नाही आणि ह्या बाबतीत जनता आघाडी अपयशी ठरली तर लोकप्रियता गमावली या नावाखाली (सबबीखाली) तेथील सरकार बरखास्त करण्यास कॉंग्रेसवाले मोकळे रहातील. तेव्हा बंगारप्पा, चद्रप्रभा अर्स व कॉंग्रेस (इ)चे राज्यपातळीवरील नेते याच्या नादी लागून कर्नाटकातील जनताआघाडीचे सरकार खाली खेचणे म्हणजे स्वत च्याच हाताने स्वत च्या पायावर धोंडा पाडून घेतल्यासारखे होईल. अर्थात आध्रचे रामाराव सरकार खाली खेचण्यात जो उतावळेपणा, घाई व राजकीय अपरिपक्वतेचे दर्शन घडवण्यात आले त्यावरून कर्नाटकातील जनताआघाडीचे सरकार पाडण्यात येणारच नाही असा निष्कर्ष काढता येणार नाही

जम्मूकाश्मिर व आध्र या दोन्हीही राज्यसरकाराच्या बडतर्फीत मात्र खूपच फरक आहे जम्मूकाश्मिरमध्ये बारा आमदारानी बडखोरी करून सध्याचे मुख्यमंत्री जी एम. शहा याना पाठिंबा व्यक्त केल्यावर फरुक जवळजवळ अल्पमतात आले होते विधानसभेत परीक्षणाची संधी त्याना देण्यात आली असती तर ते आपले बहुमत सिद्ध करू शकले असते असे छातीठोकपणे सागता येणार नाही आणि जी एम. शहा मुख्यमंत्री झाल्यावर तर फरुकचे आणखी काही सहकारी त्याना सोडून गेले रामाराव तर १७० आमदाराना खिशात ठेवून वावरत आहेत. थोडक्यात म्हणजे जी. एम. शहाना आपले बहुमत सिद्ध करण्यासाठी जो साधारण महिन्याचा कालावधी देण्यात आला त्या कालावधीत त्याला फारसे आमदार (फरुकचे) आपल्याकडे फिरवण्याची गरज भासणार नव्हती, परंतु आध्रचे सध्याचे (तात्पुरते) मुख्यमत्री भास्कर राव याना एन. टी रामारावाचे बरेच आमदार एक महिन्याच्या कालावधीत आपल्या कळपात ओढून आणावे लागणार आहेत व ही गोष्ट फारच अवघड आहे जम्मूकाश्मिरचे राज्यपाल जगमोहन याची कृती निश्चितच समर्थनीय नव्हती; परतु आध्रचे माजी राज्यपाल रामलाल यानी अतीच केले! त्याचे हे कृत्य नुसते घटनाबाह्यच नसून लोकशाहीचा मुडदा पाडणारे आहे आणि म्हणूनच रामाराव याची परत मुख्यमंत्रीपदी स्थापना होईपर्यंत या देशातील लोकशाहीवादी विरोधीपक्षानी गप्प बसता कामा नये या बाबतीत रामलाल हे बळीचा बकरा ठरले. इतर राज्याचे राज्यपाल यापासून धडा शिकतील व कॉंग्रेस हायकमाडकडून असे गलिच्छ व घटनाबाह्य निर्णय घेण्यास त्याना सागण्यात आले तर ते असे कुकर्म करण्यापेक्षा राजीनामा देणे पसत करतील. रामलाल याचे हे वर्तन नुसतेच घटनाबाह्य नसून राज्यपालपदाला काळिमा फासणारे होते. राज्यपाल हा कॉंग्रेस (इ)चा सनदी नोकर आहे हा सामान्य जनतेचा समज दृढ करणारे होते. म्हातारी मेल्याचे दु ख नाही पण काळ सोकावतो राज्यपाल व जगमोहन यानी जे महाभयकर कृत्य केले त्याची री इतर राज्यपालानी ओढली तर काय हाहाकार माजेल हे सागता येत नाही अशा प्रकारचे विरोधी पक्षाचे एकही सरकार देशात टिकू शकणार नाही मग याचाच कित्ता राष्ट्रपतींनी गिरवला तर भारतातील लोकशाहीचा समूळ नाश होण्यास वेळ लागणार नाही समजा कॉंग्रेस (इ)चा एखादा गट पक्षातून बाहेर पडला व त्याने इदिरा गाधीनी बहुमत गमावल्याचा राष्ट्रपतीकडे दावा केला आणि राष्ट्रपतीनी त्यातील सत्यासत्यता पडताळून न पहाता व इदिरा गाधीना शक्तिपरीक्षणाची सधी न देता, त्याचे सरकार बडतर्फ करून, बंडखोर गटनेत्याला पतप्रधानपदी बसवले तर काय अनर्थ ओढवेल, याची कल्पनाच करता येत नाही. या परिस्थितीत इदिरा गाधीच्या बाजूला बहुसख्य खासदार असले तरी राष्ट्रपतीना तसे वाटत नसल्याने त्या काहीही करू शकणार नाहीत व बडखोर पतप्रधानास एक महिन्याचा अवधी दिल्यास (बहुमत सिद्ध करण्यास) तो खासदाराची मोठ्या प्रमाणात खरेदी करू शकेल. तेव्हा रामलाल, जगमोहन, तपासे यानी जो वाईट पायडा पाडला आहे त्याची तेथेच इतिश्री व्हायला हवी नाही तर लोकशाही हा एक पोरखेळ होऊन बसेल!

## नट आणि प्रशासक

फरुकच्या पतनानतर आता नबर कर्नाटक व आध्रचा आहे हे मी मागे 'माणूस'मध्ये लिहिले होते आध्रमधील जी एम. शहा हा एन भास्करराव असेल असेही मी त्या लेखात म्हटले होते. एन टी. रामाराव व अर्थमंत्री (माजी) एन भास्करराव याच्यात तेलगु-देसम्पक्ष सत्तेवर आल्यापासूनच कुरबुरी चालू होत्या मात्र एन.

टी रामाराव इंदिरा कॉंग्रेसचा दणदणीतपणे पराभव करून सत्तेवर आल्याने व तेलगुदेसम्‌ची हवा निर्माण झाल्याने एन भास्करराव हात चोळत बसण्याशिवाय काही करू शकते नव्हते लोकामध्ये कॉंग्रेस (इ) बद्दल एक प्रकारचा तिटकारा निर्माण झाला होता. कॉंग्रेस (इ) सत्तेवर असताना आंध्रप्रदेशातील मुख्यमंत्री सतत्‌ बदलल्याने दिल्लीच्या तथाकथित हुकुमशाहीचा लोकाना कटाळा आला होता. तेलगु लोकाच्या भावनाची कदर केंद्रशासन करीत नाही अशी भावना निर्माण झाली होती. कॉंग्रेस (इ) ला मोठे पाठबळ असूनही अंतर्गत कलहामुळे एक प्रकारची अस्थिरता निर्माण झाली होती तिचा अचूक फायदा एन टी रामाराव या लोकप्रिय नटाने घेतला व तेलगुदेसम्‌पक्ष स्थापन केल्यापासून कॉंग्रेसचा आंध्रातील बालेकिल्ला एन टी. रामारावनी नेस्तनाबूत केला एन. टी. रामारावाची हवा बघून एन भास्करराव यानी त्याच्याशी जमवून घेतले व अर्थमंत्रीपद पदरात पाडून घेतले एन टी रामारावांभोवती लोकप्रियतेचे वलय असल्याने व कॉंग्रेस (इ) पक्ष राज्यात बदनाम झाल्याने मग एन भास्कररावना योग्य संधीची वाट पहात बसण्याशिवाय इलाज नव्हता. घाई करण्यात अर्थ नव्हता. तसा पन्नासएक आमदाराचा त्याना पाठिंबा होता, परंतु बंडखोरी करणाऱ्या बंगारप्पाचे कर्नाटकात काय हाल झाले याचे ताजे उदाहरण त्याच्या डोळ्यांसमोर होते. एन टी रामारावाशी विद्रोह करणे म्हणजे लोकक्षोभ ओढवून घेणे याची त्यांना पुरेपूर कल्पना होती एन. टी रामाराव कधी चूक करतील याकडे ते डोळे लावून बसले.

## अव्यवहार्य निर्णय

एन. टी. रामाराव हा नावाजलेला नट असला तरी राजकारणात मुरलेला नव्हता. त्यानी सत्तेवर येताच बरेच अव्यवहार्य निर्णय घेतले. त्याच्या काही निर्णयांमुळे जनतेचा राग त्यानी ओढवून घेतला. सरकारी कर्मचाऱ्यांच्या निवृत्तीचे वय ५८ वरून ५५ वर आणण्याच्या त्याच्या निर्णयामुळे सरकारी कर्मचाऱ्याच्या उग्र आंदोलनाला त्याना तोंड द्यावे लागले. गरीब जनतेला स्वस्त दरात तांदूळ पुरवण्याच्या त्याच्या योजनेचा फज्जा उडाला, गरीब जनतेकरता वीस लाख पक्की घरे बांधण्याची एन. टी. आरची योजनाही पूर्णपणे अमलात आणता येणे शक्य नाही. विधानपरिषदेची गरजच काय ही त्याची मागणीही सोडून द्यावी लागणार आहे. हैद्राबाद शहरात (तेलगुदेसम-पक्ष सत्तेवर आल्यापासून) ज्या जातीय दंगली झाल्या त्या एन. टी. रामरावाना नीटपणे हाताळता आल्या नाहीत. आता ऑगस्ट महिन्यात एन. टी. आर परदेशात गेले असताना जी जातीय दंगल झाली ती हाताळण्यात आंध्र सरकारने इतका गलथानपणा दाखवला की कारण नसताना ती लवकर आटोक्यात आणता आली नाही. सरकारने त्या बाबतीत निष्क्रियता दाखवली व इंदिरा कॉंग्रेसवाल्यांना त्याचे भांडवल करता आले. अर्थात एन. टी आरच्या अनुपस्थितीत नंबर दोनच्या एन. भास्कररावने मुद्दामच त्या बाबतीत वेळकाढूपणा केला असेल.

एन. भास्करराव तर एन. टी. आरच्या अशाच चुकाचा फायदा उठवू इच्छित होते, परंतु त्याच्या मार्गात अनेक अडथळे होते एन. टी आरने चुका केल्या असल्या तरी बरीच लोकोपयोगी कामे केली होती तेलगु जनतेला प्रतिष्ठा मिळवून दिली, अराजपत्रित सरकारी कर्मचाऱ्याच्या निवृत्तीचे वय कमी करण्यात बेकाराना नोकरीच्या जास्त संधी उपलब्ध करून देणे हाच त्याचा हेतु नव्हता काय? विद्यार्थ्यांना दुपारच्या सुट्टीत मोफत जेवण पुरवणे, आमदाराचे पेन्शन बंद करणे, तिरुपती देवस्थानच्या मिळकतीचा ट्रस्ट करून तेथील प्रचंड संपत्ती जनतेच्या विकासकार्याकडे वळवणे, सार्वजनिक जीवनातील भ्रष्टाचार कमी करणे, 'तेलगु गंगा प्रोजेक्ट' असे कित्येक कार्यक्रम हाती घेऊन त्यानी जनतेचा दुवा मिळवला होता. तेव्हा अशा रामारावाना दगा देणे म्हणजे आपली राजकीय कारकीर्द संपुष्टात आणणे हे एन भास्कररावांना माहीत होते आणि या बाबतीत कॉंग्रेस (इ.) चीही साथ मिळू शकणार नव्हती. २९४ आमदाराच्या विधानसभेत कॉंग्रेस (इ) चे फक्त ५७ आमदार होते. शिवाय त्याच्यात लाथाळयाही कमी नव्हत्या. वेंगलराव, ब्रह्मानंद रेड्डी, अंजय्या हे निरनिराळे गट प्रदेशकॉंग्रेसअध्यक्ष राजशेखर रेड्डी यांच्यावर टीका करण्याची एकही संधी दवडत नव्हते. चेन्ना रेड्डी हे माजी मुख्यमंत्री आपल्याला पक्षात भवितव्य नसल्याने सवता सुभा मांडून बसले होते. रामारावला धडा शिकवण्यासाठी आता काय करावे या विवचनेत भास्करराव असतानाच जम्मु–काश्मिरचे फारुकचे मंत्रिमंडळ पाडण्यात फारुकचे मेव्हणे जी. एम. शहा हे राज्यपाल जगमोहन याच्या मदतीने यशस्वी झाले त्याना इंदिरा कॉंग्रेसनेही तावडतोब पाठिंबा दिल्याने जी. एम शहाचे काम सोपे झाले होते. इंदिरा कॉंग्रेसचा विधानसभानिवडणुकीत फारुकच्या हातून झालेला दारुण पराभव इंदिरा गांधीना सलत होता त्यातच अखिल भारतीय राजकारणातील फारुकची लुडबुड, त्याचे विरोधी पक्षांना एकत्र आणण्याचे प्रयत्न, अखिल भारतीय स्तरावरील एक मुस्लिम नेता म्हणून स्वत:ची प्रतिमा निर्माण करण्याचे त्याचे प्रयत्न या सर्व गोष्टीचा इंदिराजीना संताप आला होता. जी एम. शहांनी फारुकला धडा शिकवण्याची संधी त्याना मिळवून दिली.

आंध्रप्रदेशातही जवळजवळ तीच स्थिती होती. एन. टी. आरने सहा महिन्यात पक्ष बांधून इंदिरा कॉंग्रेसचा बालेकिल्ला समजल्या जाणाऱ्या आंध्रात इंदिरा कॉंग्रेसला चारीमुंड्या चीत केले होते हा पराभव इंदिरा गांधीच्या जिव्हारी लागला होता. त्यातच एन टी. आर सतत कॉंग्रेस (इं.) विरोधी भूमिका घेऊ लागले. विरोधी पक्षाच्या ऐक्यपरिषदा आयोजित करू लागले. हे सर्व सहन करण्याच्या पलीकडले होते; परंतु कॉंग्रेसचे बळ आंध्रात तुटपुंजे असल्याने हात चोळीत बसावे लागत होते. कॉंग्रेस (इं) वाले एन. भास्कररावाकडे आशेने पहात होते. फारुकला पाडण्यातील जगमोहन यांची धडाडी पाहून एन. भास्कररावाना राज्यपालाच्या या वेगळ्या शक्तीचा शोध लागला व आंध्रमध्येही राज्यपाल आपल्याला अशी मदत करू शकेल अशी त्यांची मनोमन खात्री पटली. कर्नाटकात बंगारप्पा व आंध्रात एन भास्करराव आता जी एम. शहा बनण्याची महत्त्वाकांक्षा बाळगू लागले होते. जी. एम. शहापेक्षा आपली कामगिरी अवघड आहे, ह्या गोष्टीची राज्यपालाच्या मदतीमुळे चिंता करण्याचे भास्कररावांना कारण नव्हते. इंदिरा कॉंग्रेसच्या आमदाराचा पाठिंबा त्याने गृहीत धरलेला होता.

एन. टी. आर परदेशात गेल्यावर मग त्याने मोर्चेबांधणीस सुरुवात केली; पण त्याना पाठिंबा देणाऱ्या आमदाराचा आकडा जेमतेम ५१ होत होता त्यानी आता माघार घ्यायची नाही असे ठरवले. एन' टी. आर. परत येताच त्यानी व त्याच्या मन्त्रिमडळातील तीन सहकाऱ्यानी आपल्या मन्त्रिपदाचा राजीनामा दिला. एन टी. आर. काय समजायचे ते समजले व त्यानी या चौघाची तावडतोब हकालपट्टी केली. भास्करराव व एकावन्न आमदाराचा गट तेलगुदेसममधून फुटला एन टी आरना हे अपेक्षितच होते; ,परतु काळजी करण्याचे कारण वाटत नव्हते कारण त्याना अजूनही बहुसख्य आमदाराचा पाठिंबा होता शिवाय भाजप, कम्युनिस्ट, जनता इ पक्षाच्या आमदाराचा पाठिंबा वेळ पडल्यास त्यानी गृहीत धरलेला आहे

## दिल्लीची पूर्वसंमती

एन टी रामारावानी बहुमत गमावले असून त्यानी मुख्यमन्त्रीपदाचा राजीनामा द्यावा व मन्त्रिमडळ बनविण्यासाठी आपल्या गटास पाचारण करण्यात यावे असा दावा जेव्हा भास्करराव गटाने राज्यपाल रामलाल याच्याकडे केला तेव्हा मात्र एन टी रामाराव चक्रावून गेले असा दावा करण्याइतके पाठबळ भास्कररावाजवळ नाही हे त्यानाच काय पण साऱ्या जगाला माहीत होते; परतु त्या वेळचे राज्यपाल रामलाल याच्या मनात वेगळेच काही शिजत होते. रामलाल यानी एन. टी रामाराव याची विधानसभेत तावडतोब शक्ती परीक्षण करण्याची तयारी धुडकावून लावली. रामाराव यांनी राजीनामा देण्यास नकार देताच रामलाल यानी त्याना तावडतोब बडतर्फ केले रामाराव याची न्याय्य विनती त्यानी मानली नाही. कारण त्याना बडतर्फ करण्याचे त्यानी अगोदरच ठरवले होते, जी एम. शहाप्रमाणे एन. भास्करराव याचा तावडतोब शपथविधी उरकण्यात आला. एन. टी रामाराव याना नुसतेच बडतर्फ न करता अटक करण्यात आली आता इदिरा गाधी सागत आहेत की रामलाल याना मी कोणताही सल्ला दिला नव्हता, परंतु यावर कोणाचाही विश्वास बसणार नाही इतका महत्त्वाचा निर्णय ते काँग्रेस हायकमाडच्या परवानगीशिवाय घेणेच शक्य नाही. भ्रष्टाचाराच्या आरोपामुळे हिमाचलप्रदेशच्या मुख्यमन्त्रीपदावरून उचलबागडी झालेल्या रामलाल याच्यात तेवढी कुवत निश्चितच नव्हती.

## विरोधक भारी होतील !

या बेकायदेशीर निर्णयामुळे आता आध्रमध्ये हिंसेचा डोब उसळला आहे त्यात आतापर्यंत विसाच्यावर लोकाची आहुती पडली आहे आणि हे सर्व टाळता येण्यासारखे असूनही घडले आहे आतापर्यंत एन टी आर च्या बडतर्फीच्या निषेधार्थ दोनदा विरोधी पक्षानी राज्यात बंद पुकारला. बसेस, रेल्वे यासारख्या अत्यावश्यक सेवा बद ठेवाव्या लागल्या आता दोन्ही बाजू आपापल्या सामर्थ्याविषयी परस्परविरोधी दावे करत आहेत एन टी आर आपल्या १६२ आमदाराना घेऊन राष्ट्रपतीकडे जाऊन आले त्याना विचाऱ्याना वस्तुस्थिती पटली तरी ते काय करू शकणार आहेत ? ह्या निमित्ताने तरी सर्व विरोधी पक्ष एक झाले आहेत व त्याचे श्रेय इदिरा गाधीनाच द्यायला हवे !

या सर्व प्रकारात इंदिरा काँग्रेसची 'गाढव गेले आणि ब्रह्मचर्यही गेले' अशी अवस्था झाली आहे. एन भास्करराव याना बेकायदेशीररीत्या मुख्यमंत्री केल्याने देशभर जनतेत काँग्रेस (इ.)बद्दल संतापाची लाट उमटली आहे इदिरा काँग्रेस पक्षातीलही काही नेत्याना ही गोष्ट आवडलेली नाही बिहारच्या एका काँग्रेस (इं) खासदाराने तर या कारवाईचा निषेध म्हणून पक्षाचा राजीनामा दिला आहे आता विधानसभेत आपले बहुमत सिद्ध करण्यासाठी माजी राज्यपालानी एन भास्करराव याना जी मुदत दिली आहे ती त्यानी वाढवून मागितली आहे जर या मुदतीत एन भास्करराव पुरेसे आमदार आपल्या बाजूला वळवू शकले नाहीत तर काँग्रेस (इ)ची छी-थू होणार हे ठरलेलेच आहे तेव्हा एन टी. रामाराव याचा पाडाव करून आपण काय साध्य केले असा प्रश्न काँग्रेस (इ)वाल्याना स्वत लाच विचारावा लागणार आहे. अर्थात चमत्कार झाला तर एन भास्करराव अजूनही पुरेसे आमदार आपल्याकडे वळविण्याची किमया करू शकतील. समजा तसे करू शकले नाहीत तर राज्यपालाना विधानसभा विसर्जित करण्याचा सल्ला देऊ शकतात अर्थात तरीही काँग्रेसचा त्यात काही फायदा नाही. कारण नतर होणाऱ्या विधानसभा-निवडणुकीत जनता काँग्रेस (इ)ला नेस्तनाबूत केल्याशिवाय रहाणार नाही एन टी आर च्या पाडावाने काँग्रेस (इ)चा फायदा झाला नसला तरी विरोधी पक्षाचा झाला आहे, या घटनेचा निषेध करण्यासाठी सर्व विरोधी पक्ष एकत्र आले असून सभा, मोर्चे, धरणे असे धडक कार्यक्रम त्यानी हाती घेतले आहेत. राज्यसभा व लोकसभेत या प्रश्नावरून त्यानी सरकारला सळो की पळो करून सोडले आहे अशाच निरनिराळ्या उपक्रमातून ते एकत्र येतील व येत्या निवडणुकात ही एकी कायम राहिली तर काँग्रेस (इं)ला भारी ठरू शकेल

जम्मू-काश्मीर व आध्र प्रदेशातील पडावानतर इंदिरा काँग्रेसविरोधी जनमत तयार होत असताना वेळच्या वेळी (नियोजित वेळेस) इदिरा गाधी निवडणुका घेतील का ? हा मोठा प्रश्न आहे. त्यातच सुवर्णमंदिरातील लष्करी कारवाईनतर शीखसमाज त्याच्या पक्षापासून दुरावला आहे अशा परिस्थितीत १९७५ मध्ये आणीबाणीपूर्वी जी परिस्थिती निर्माण झाली होती तशी परिस्थिती आता निर्माण होत आहे असे इदिरा गाधीना वाटण्याचा सभव आहे, परतु त्यामुळे त्या अतर्गत आणीबाणी जाहीर करणार नाहीत. कारण त्यातील तोटे त्याना माहीत आहेत; तरी काही नियन्त्रणे त्या आणू शकतील मात्र यापुढे कधीच निवडणुका घेणार नाहीत हा काही लोकाचा होरा मात्र अतिरेकी वाटतो आध्रप्रदेशातील कृतीचा त्याना पश्चात्ताप वाटत असेल, त्यामुळे तसा प्रकार कर्नाटकात करण्यास त्याचा पक्ष कदाचित धजावणार नाही; परतु आध्रप्रदेशातील एन टी. रामाराव याच्या बडतर्फीचे गभीर परिणाम त्याच्या पक्षाला दीर्घकाळ भोगावे लागतील हे निश्चित ! □

# लष्कराला नागरी प्रशासनात गुंतवून ठेवू नये

शं. ग. चिटणीस (ग्रुप कॅप्टन)

ब्रिटिशकालापासून भारतात लष्कराची बांधणीच राजकारणापासून अलिप्त ठेवण्याच्या दृष्टीने झाली. अगदी सुभाषबाबूंच्या आझाद हिंद सेनेत असलेल्या अधिकाऱ्यानाही परत लष्करी सेवेत घेतले गेले नाही! मात्र सध्या चालू असलेल्या प्रकारामधून लष्कराचा 'सिव्हिलियन लाइफ'शी जास्त काळ सपर्क होत आहे आणि ते चागले लक्षण नव्हे! लष्करात राजकीय विचार शिरण्याची शक्यता त्यामुळे नाकारता येत नाही.

पुणे विद्यापीठाच्या सरक्षणशास्त्र विभागातील एक प्राध्यापक ग्रुपकॅप्टन. श. ग. चिटणीस यानी या शब्दात आपली भीती व्यक्त केली. मात्र भारतीय लष्कर कधी काळी राजकारणात उतरेल, लष्करातील एखादा गट बंड करेल अस त्याना वाटत नाही. ते म्हणाले,

'भारतातील लष्कर हे प्रचलित राजकारणापासून अलिप्त राहील, किंबहुना जातीय–प्रातिक अभिनिवेशाला बळी पडणार नाही अशीच आपल्या लष्कराची रचना केली गेली आहे. मात्र लष्कराला देशाच्या सामान्य प्रशासनात नेहमीच बोलाविणे, जास्त काळ ठेवणे यामुळे ते राजकारणापासून कितपत दूर राहील याबद्दल शका वाटणे साहजिक आहे. लष्कराला या कामात गुतवून ठेवू नये. ते त्याचे कामच नाही. त्याना परकीय आक्रमणाविरुद्ध सज्ज राहण्यासाठी राखून ठेवावे. वस्तुतः लष्कर बोलाविण्यापर्यंत मजल जाऊ द्यायला नको होती. कायदा-सुव्यवस्था राखणे पोलीसदलामार्फत व्हावे '

आपला स्वत:चा लष्करातला अनुभव सांगताना चिटणिसानी एक चागला मुद्दा माडला 'ब्रिटिशाच्या काळापासूनच लष्करात काही जाती मुद्दाम वगळण्यात आल्या. ब्राह्मण व रजपूत यानी १८५७ च्या बडात पुढाकार घेतला. त्याच्याऐवजी त्या वेळी ब्रिटिशाना ज्या जमातीनी मदत केली अशा शीख, जाट, गुरखा अशा जमातीना 'मार्शल रेसेस' म्हणून सबोधण्यात आले. त्याचीच जास्त प्रमाणात भरती झाली. त्यानुसार जाट, शीख रेजिमेंट असे भाग झाले. एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे. कंपन्यामध्ये जातवार –प्रदेशवार भरती असली तरी एका रेजिमेंटमध्ये अनेक कपन्या असतात. एक बटालियन अभिन्न अग म्हणून लढते, प्रशिक्षण घेते; त्यातील जवान आपल्या जमातीचे म्हणून राहतच नाहीत. त्याच्या दीर्घ परस्पर सहवासामुळे, त्याचा आपल्या विशिष्ट जमातीचा 'क्लास कॉन्शिसनेस' जवळजवळ निघून जातो. त्याची निष्ठा आपल्या रेजिमेंटशी होऊन जाते आजही अनेक माजी जवान केवळ एका रेजिमेंटचे म्हणून एकत्र येतात. त्यात धर्म, जात अशी भेदयुक्त दृष्टी नसते.'

'ही फक्त झाली सैन्याची गोष्ट हवाईदल आणि नौदलात तर अशी petrogenit खूपच असते तिथे तुमच्या पात्रतेच्या बळावरच भरती होते सैन्यातल्याप्रमाणे अमुक अशा रेजिमेंट्सचा तिथे सवालच नसतो. मला तर वाटतं की लष्कर हीच सध्या भारतातील राष्ट्रीय ऐक्य घडवून आणणारी सर्वांत मोठी व समर्थ सघटना आहे.

लष्करात असंतोष पसरण्याचा काही धोका आहे का? या प्रश्नावर कॅ. चिटणीस म्हणतात – 'लष्करात असेपर्यंत तेथील शिस्त, नियम–पालन, काटेकोर जीवनपद्धती याची सवय सैनिकाला होते. मात्र नागरी जीवनाशी सबध आल्यावर, विशेषत निवृत्तीनतर, रोजच्या जीवनातील भ्रष्टाचार, चेंगटपणा, बजबजपुरी त्याच्या नजरेला येते. त्याच्याकडे फारसे लक्षही दिले जात नाही. त्यामुळे निवृत्त सैनिकामध्ये असतोष पसरतो. दरवर्षी लष्करातून ५० हजार निवृत्त होतात. याचा लष्करातील सैनिकाशी नेहमीच सबध येत राहतो. याची दखल घेतली पाहिजे.'

## चंद्रगुप्ताचा काळ

भारतातील लष्कराची प्राचीन कालापासूनची परपरा सागताना चिटणिसानी लष्करात असलेल्या एकत्वाच्या भावनेचाही उल्लेख केला.

'भारतात सर्वप्रथम केंद्रीय सैन्य व Standing Army ही चद्रगुप्ताच्या काळात निर्माण झाली. तत्पूर्वी सुसघटित असे 'लष्कर' अस्तित्वात नव्हते सैन्याचा उद्देश सीमा वाढविणे, तिचे रक्षण करणे एवढाच. त्यातही 'धर्मयुद्धाची' सकल्पना प्रचलित होती. त्यामुळे नीतीनियमानुसार व व्यक्तिगत धर्मानुसार युद्ध व्हायचे लष्कराची म्हणून स्वतत्र code of conduct किंवा Espirit de Corps ( समूहभावना ) त्या वेळी नव्हती'

**प्रश्न :** प्राचीन काळात लष्कर व राजकीय सत्ता आणि नागरी जीवन याच्यात कशा प्रकारचा सबध होता ?

**चिटणीस :** त्या वेळी लष्कराच्या साहाय्यानेच राजकीय सत्ता मिळविली जात असे. मात्र हे लष्कर राजाचे किंवा सरदाराचे असे. ती एक स्वतत्र *Entity* नव्हती. त्या सैन्याला वेग ( Mobility ) नव्हता. कायमस्वरूपी अशी सेना नव्हती तसच सैनिकी शिक्षण देणारी काही सस्थात्मक व्यवस्थाही नव्हती

वैयक्तिक शौर्य, धडाडी, कौशल्य यालाच महत्त्व होते. त्यामुळे ' लष्कर ' अशी सघटित शक्ती नव्हती. ते सैन्य गरजेच्या वेळी उभे केले जाई. ते राजाच्या आज्ञेवरून लढत असे जवळजवळ भाडोत्री सेनेसारखाच हा प्रकार होता.

चद्रगुप्ताच्या काळात कौटिल्याच्या सागण्या-प्रमाणे पहिल्यादा कायमस्वरूपी सैन्य उभे राहिले मात्र केंद्रीय–नियोजित सैनिको प्रशिक्षणाचा तिथे अभावच होता.

नागरी जीवनाबाबत हीच अवस्था. क्षत्रिय ही लढाऊ जमात होती. तिला विशिष्ट स्थान होते ती राजकीय सत्तास्पर्धेतही असे मात्र क्षत्रिय हे बहुधा अधिकारी असत, त्याच-बरोबर राजकीय सत्ताधारीही-हे लक्षात घेणे जरुरीचे आहे.

## मोगल आणि ब्रिटिश

**प्रश्न :** मध्ययुगात मुस्लिम भारतात आल्यावर लष्कराच्या संकल्पनेत, रचनेत काही फरक पडला का ?

**चिटणीस :** पहिल्यादा जे मुस्लिम आक्र-मक आले, त्याचे घोडदळ उत्कृष्ट होते. ते वेगवान होते, त्याच्यात ऐक्यभावन होती. खास लष्करी प्रशिक्षण दिले जाई. त्याचे खेळही त्याच प्रकारचे असत. लष्करात भोगळपणा राहू नये, सुसूत्रीकरण हवे म्हणून अलाउद्दिन खिलजीने घोड्याना चिन्हाकित करणे सुरू केले. ते शिस्तबद्ध सैन्य होऊ लागले. त्यात ' Espirit de corps ' भावना होती

मुस्लिम साम्राज्ये आल्यावर केंद्रीय कायमस्वरूपी लष्कर होते, तसेच मनसब-दाराची सेनादले गरज पडल्यास उभी राहत. ही सैन्ये कायमस्वरूपी नसत. शेती व इतर कामातून ती माणसे घेतली जात.

मोगल सैन्यात सुसूत्रीकरण (coordi-nation) व शिस्त याचा अभाव होता. त्याच्याकडे लष्करी strategy ची दृष्टी नव्हती. वैयक्तिक शौर्यच महत्त्वाचे समजले जाई.

**प्रश्न :** त्या वेळी लष्करातील भरती कोणत्या प्रकारची असे ?

**चिटणीस :** एका विशिष्ट जातीपेक्षा सबधित भागातील व्यक्तीना प्राधान्य होते. असे सैन्य जात–जमातवार hetrogenous (विखुरलेले) होते.

**प्रश्न :** लष्कर सुसघटित, स्वतत्र दल म्हणून भारतात सुरुवात कशी झाली ?

**चिटणीस :** महाराजा रणजितसिगानी सर्वप्रथम सपूर्ण सैन्याला प्रशिक्षण देण्याची सुरुवात केली. त्यानतर मराठ्यानी तोच कित्ता गिरविला.

ब्रिटिश राजाचे राज्य (crown) आल्या-वर १८५७ नतर भारतातील लष्कर हे ' लष्कर ' म्हणून पुढे येऊ लागले. ईस्ट इडिया कपनीच्या वेळी कलकत्ता, मुबई, मद्रास येथे प्रातिक सेना होत्या. १८५७ नतर मात्र कलकत्त्याला एक केंद्रीय सैन्य निर्माण करण्यात आले. बडात भाग घेतले-ल्याना–राजकारणाचा प्रभाव असलेल्याना–लष्करातून काढून टाकण्यासाठी ' मार्शल रेसेस ' ही नवी सकल्पना आणली गेली. मराठ्याना वगळण्यासाठी मराठा ही Non-Martial Race आहे असे जनरल रॉबर्टस्ने जाहीर केले.

भारतीय लष्कर आज जसे आहे त्याच पाया घातला गेला तो लॉर्ड कर्झनच्या कार कीर्दीत,त्या वेळचा कमाडर-इन-चीफ लॉर्ड किचनरयाने. त्याने केंद्रीकृत नियत्रण असलेली लष्करी यत्रणा उभी केली. स्टाफ सिस्टीम (सैन्यप्रमुखाचे सल्लागार) कार्यक्षम केली एकत्वाची भावना असलेले संघटित लष्कर त्याने उभे केले

लॉर्ड किचनरचा आणखी एक विशेष म्हणजे सेनाधिकारी असल्याच्या सामर्थ्यावर राज-कीय निर्णयप्रक्रियेत, प्रशासनात सहभागाच्या हक्काची त्याची मागणी होती. त्याचे व गव्हर्नरजनरल लॉर्ड कर्झनचे यावरून वाद होत. किचनरने आपल्या लष्करी सामर्थ्याचा प्रशासनावर तावा ठेवण्यासाठी उपयोग करून घेतला. गव्हर्नरजनरलला दुसरा लष्करी सल्लागार नेमल्यावर त्याने जोरदार विरोध केला.

प्रशासनात सघटित लष्कराचा प्रभाव वाढविण्याचे ते भारतातील पहिले उदाहरण होते.

मुलाखत । संजय संगवई

---


**मांडणी, विचार व देखणेपणा या सान्यातच ' उत्तम ' असे म्हणता येईल असे हे पुस्तक आहे.**

**–प्र. बा. भोसले**

**संपादक, बळीराजा मासिक**

# योद्धा शेतकरी

**ले. विजय परुळकर**

**राजहंस प्रकाशन, पुणे ३०**

**मूल्य : ३६ रुपये**


---

# शारदेच्या शोधात

**एका अविवाहित महाराष्ट्रीय तरुणीच्या ठिकाणी वयाच्या ३३ व्या वर्षी २२ वर्षीय बंगाली तरुणीचे व्यक्तित्व पूर्णत्वाने प्रकट होऊ लागले व ह्या प्रकाराने परामानसशास्त्रीय अभ्यासकांचे लक्ष वेधून घेतले. या घटनेचे अन्वेषण पुण्याच्या प्रा. व. वि. अकोलकरांनी प्रथम हाती घेतले. त्यांच्या इंग्रजी प्राथमिक अहवालाची जाणकारांनी प्रशंसा केली आहे.**

**व. वि. अकोलकर**

१९७५ फेब्रुवारी १३ च्या 'नागपूर-टाइम्स'मध्ये बातमी प्रसिद्ध झाली. जन-सामान्यांचे कुतूहल जागृत करणारी आणि वैज्ञानिकाना परामानसशास्त्रीय दृष्टिकोना-तून विचार करण्यास भाग पाडणारी बातमी साराशाने अशी होती.

नागपूर येथे ३३ वर्षांच्या मराठी भाषिक द्विपदवीधर आणि विद्यापीठात अध्यापन करणाऱ्या तरुणीचे महाराष्ट्रीय व्यक्तित्व लोप पावले आहे व ह्या अविवाहित तरु-णीच्या ठिकाणी स्वत चे नाव 'शारदा', स्वतःचे वय २२–२३ सागणारे व स्वत.चे माहेर वरद्वानचे व सासर खुलन्याजवळील शिवपूरचे म्हणून सागणाऱ्या बगाली भाषिक महिलेचे व्यक्तित्व प्रकट झाले आहे. 'शारदे'ला मराठी बोलता येत नाही; मराठी बोललेले समजत नाही. ती जुन्या काळातील बगाली पद्धतीने साडी पेहरते, व्रजेश चट्टोपाध्याय हे वडील आणि कविराज (वैद्य) विश्वनाथ मुखोपाध्याय हे पती असल्याचे सागते, सस्कृत-प्रचुर परंतु व्याकरणशुद्ध बंगालीत सभाषण करते, ईस्ट इंडिया कपनीचा काळ अजून चालू असल्यासारखे बोलते व प्रश्न विचा-रते; इत्यादी.

त्या महाराष्ट्रीय तरुणीचे नाव उत्तरा. ती इग्रजी व पब्लिक ॲडमिनिस्ट्रेशन या दोन विषयांत एम्. ए. व नागपूर विद्यापीठात अध्यापक. तिला ललित तसेच आध्यात्मिक वाङमयाची, कविता करण्याची, फुलझाडाची रागोळधाची व भरतकामाची आवड.

उत्तरेच्या ठिकाणी 'शारदा' हे व्यक्तित्व मधूनमधून प्रकट होऊ लागले होते ते ३१ मार्च ७४ पासून; परंतु आरंभी आरभी दहाएक मिनिटे, ऑक्टोबरमध्ये १ दिवस एकदा १७ दिवसपर्यंत आणि डिसेंबरात ७ दिवसपर्यंत ते अवस्थातर झाले होते. वृत्त-पत्रात प्रसिद्धी पावलेले अवस्थांतर मात्र १७ जानेवारी १९७५ ला झाले व २६ फेब्रुवारी-पर्यंत ४१ दिवस टिकले.

प्राथमिक माहिती पुरवणारी पत्रोत्तरे नागपूरहून आल्याबरोबर मी २ मार्च १९७५ च्या सकाळी नागपुरास पोहोचलो श्री. व श्रीमती डॉ. खरे व प्राचार्या श्रीमती कोठारे याचेसमवेत उत्तरेच्या घरी गेलो. तीनच दिवसापूर्वी शारदावस्था सपली होती. उत्तरा ही उत्तराच होती व तिला शारदावस्थेची पूर्ण विस्मृती झालेली होती. नागपूरच्या तीन दिवसाच्या मुक्कामात एकूण १३ जणाच्या मुलाखती घेतल्या. तिच्या, तिच्या माता-पित्याच्या, बहिणीच्या, उत्तरेच्या मित्राच्या. 'शारदे'शी संभाषण केलेल्या मडळीपैकी प्रो. आर. एन. रॉय, सौ कृष्णा नियोगी व श्रीमती कोठारे याच्याशी चर्चा केली. शारदेस पाहिलेले प्रो. किणी, मनोरुग्णालय-प्रमुख डॉ वाय. डब्ल्यू. केळकर याना, तसेच उत्तरेच्या स्नेह्यास व वैद्यास भेटलो. उत्तरेचा मस्तिष्क विद्युतआलेख (EEG) काढून घेतला (४-३-७५) तो नॉर्मल आढळला. (पुढे काही दिवसानी एका मज्जवैद्यकतज्ञानी 'शारदावस्थेत' EEG घेतला. तोही नॉर्मल होता असे उत्तरेने कळवले)

शारदावस्थेत कागदावर टिपलेली जुनी बंगाली भक्तिकवने तसेच काही मराठी व काही बगाली असे लिहिलेले कागद इत्यादी उत्तरेच्या बहिणीने माझ्या स्वाधीन केली. त्याच्या झेरॉक्स कॉपी काढून घेऊन १७–१०–७६ रोजी मूळ कागद श्री. पडित पुण्यास आले, त्या वेळी त्याच्या स्वाधीन केले, डॉ. स्टीवन्सन याना पहाता यावेत म्हणून.

उत्तरेचा निरोप घेते वेळी तिने एक बंद लिफाफा मजजवळ दिला. त्यात १४-१०-७४ रोजी लिहून ठेवलेले आत्मनिवेदन होते. ती म्हणाली, 'काही बरे–वाईट झाले तर कोणाही सबंधित व्यक्तीस त्रास पोहोचू नये. हे तुमचेजवळ ठेवा!' तेव्हापासून उत्तरेने 'पितृतुल्य श्रद्धा ठेवून' मला अनेक गोष्टी पत्राद्वारे तसेच प्रत्यक्ष भेटीमध्ये सागितल्या आहेत. तिच्या वडिलानीही माझ्याशी मोकळे-पणाने पत्रव्यवहार केला.

डॉ. आर के. सिन्हानी शारदेच्या हस्ता-क्षराच्या फोटो स्टॅट नकला पुरवल्या.

'शारदेची' व माझी भेट पुणे येथे ९ व १० जान्युअरी १९७६ या दोन दिवशी झाली. तोपर्यंतचा माझा इग्रजी टकलिखित अहवाल मी १४–२–७६ ला डॉ. जे. बी ऱ्हाइन याचेकडे पाठवला. तेथून तो लडनच्या सोसायटी फॉर सायकिकल रीसर्चकडे गेला पुण्याहून उत्तरा अमदाबादला गेली तेथे तिला शारदावस्था प्राप्त झाली (८-२-७६) त्याविषयीचा वृत्तांत मी अमदाबादला जाऊन तिच्या मामाकडून मिळवला.

(१९७५ जूनपासून याच केसचे अन्वेषण श्रीमती पसरिचा (बेंगलूर) प्रो पाल (कल-कत्ता) व त्यांच्या सहाय्याने व्हर्जिनिया विद्यापीठातील पुनर्जन्मसूचक केसेसविषयक विशिष्ट केसेसचे अभ्यासक डॉ.स्टीवन्सन यांनी त्यांच्या विशिष्ट दृष्टिकोनातून सुरू केले, व अहवाल १९८० जुलैमध्ये प्रसिद्ध केला आहे.)

## उत्तरा 'शारदा' होई तेव्हा


ह्या अवस्थातराचे उत्तरेच्या मामांनी जान्युअरी ७६ मध्ये अमदाबाद येथे केलेले निरीक्षण त्यांनी निवेदन केले. ते प्रातिनिधिक म्हणून मानता येईल ते असे–'उत्तरा सकाळी लवकर जागी झाली. ग्लानी आलेल्या स्थितीत बराच वेळ पडून राहिली. थोड्या वेळाने प्रातर्विधी उरकून, अगात त्राण नसल्याप्रमाणे हळूहळू पावले टाकीत परत बिछान्यावर पडून राहिली. जरा वेळाने उठली. थड पाण्याने डोक्यावरून स्नान केले बगाली पद्धतीने साडी नेसली व देवाजवळ पाटावर जाऊन बसली. (उत्तरा गरम पाण्याने स्नान करते)

उत्तरेला 'शारदेची' चाहूल लागे. डॉ श्रीमती खडे याना त्या वेळचा स्वतचा अनुभव तिने सागितला आहे तो असा · 'तळपाय, तळहात यामध्ये आत ओढल्यागत वाटते तळपायावर मेंदी दिसते पायास आळता लावलेला आहे असा भास होतो.'

माझ्या स्वाधीन करण्यात आलेल्या कागदापैकी एका कागदाने माझे लक्ष वेधून घेतले आहे. उत्तरा शारदावस्थेत जात असताना तिला मेंदूमध्ये काही तरी जाणवत असले पाहिजे,असे त्या कागदावरील लेखनावरून वाटते मराठीमध्ये वाक्य सुरू झालेले आहे आणि ते अर्धवटच राहून '— मेंदूचे थर पालटतात का?' हा प्रश्न आला आहे त्यानतरचे दोन शब्द मराठी आहेत. त्यापाठोपाठ सात शब्द मराठी लिपीत पण बगाली आहेत व नतर बगाली लिपीत बगाली शब्द आहेत

पुणे मुक्कामी, शारदेस उत्तरावस्थेत परत आणता येते काय हे पहाण्याच्या उद्देशाने मी विचारले: 'आरती करायची का? बाबाना बोलावू का?' तेव्हा 'शारदेने' मस्तकाच्या मध्यभागी बोट ठेवून सागितले की: 'इतक्यात नको, अजून इथे दुखते आहे.' ही गोष्टही वरील सदर्भात सूचक वाटते. (शारदावस्था सपण्याच्या वेळी शारदा दुर्गेची आरती करावयास सागते व कर्पूरारतीचे वेळी शिंक येऊन ती उत्तरा होते.)

१९७४ मार्च ते १९७८ मार्च या काळात उत्तरा निदान २५ वेळा 'शारदा' झाली कधी अर्धा तास, कधी दोन–चार दिवस, कधी कित्येक दिवसपर्यंत. शारदावस्थेत झोपी गेलेल्या उत्तरेला, गाढ झोपेतून पाण्याचा हबका देऊन जाग आणून पाहिले, तरी तिच्या तोंडून बगाली भाषाच येई. उत्तरेच्या वडिलांना ती कोणती भाषा बोलते आहे हे कळेना. ती भाषा बगाली असल्याचे बाहेरच्या काही माणसानी ओळखले




मराठीतून सुरुवात...बंगालीत शेवट

प्रथमचे काही दिवस, शारदेचा चेहरा बावरलेला असे' हे घर कुणाचे? मी इथे कशी आले? ही माणसे कोण? कोणती भाषा बोलत आहेत? अशा प्रश्नाकित चेहऱ्याने व काहीशा भयभीत नजरेने ती इकडेतिकडे पाहत असे प्रार्तविधीसाठी कुठे जावयाचे हे तिला दाखवून द्यावे लागे पाण्याचा नळ व हौद पाहिल्यावर ती म्हणाली: 'आमच्या तिथे तर पुकुर आहे' विजेची बटणे तसेच विजेची उपकरणे याची शारदेला भीती वाटायची टेपरेकॉर्डरवरचा आवाज तिने ऐकला तेव्हा ती म्हणाली, 'ही डाकण आहे'

उत्तरेला कित्येक वर्षांपासून सरदीचा त्रास 'शारदा' मात्र सकाळी लवकर उठायची व डोक्यावरून थड पाण्याने स्नान करायची. अगावरील ओल्या साडीचा पदर पिळून त्यानेच अग पुसायची. डोक्यावर नेहमी पदर घेतलेला स्नानानतर बहुतेक वेळ ती देवघरात पाटावर बसून असे. रागोळीने दुर्गेचा मुखवटा काढायची बगाली तऱ्हेच्या रागोळ्या काढायची तोंडाने जप किंवा बगाली जुनी स्तोत्रे गुणगुणे. तिने एकदा रुद्राचा काही भाग म्हटला व सागितले की वडिलाच्या घराजवळच्या शिवमदिरात ब्राह्मण मोठ्याने रुद्र म्हणत असत कागदाच्या तुकड्यांवर स्तोत्रे लिहीत बसे. मी माझ्याकडे घेतलेल्या कागदावर, 'पतित पावन भवरजन जयजय सीताराम।' हा जप आहे 'साधु सौदागर किबोले' ही कडवी आहेत. 'शुनो रे ए मानुषभाई' या कवितेची कडवी आहेत. 'हे अनादि भगवान' हे दशावतार स्तोत्र आहे. एका कागदावर 'दया कर मोर निताई ... अगतीर गति निताई, कतु रामदास बले (बोले) कि ...' हे भजन आहे व त्याच कागदावर 'नयनपुतली करे शयन... प्रितीर अगुनज्वाले सकलइ पीडाइया छेन' इत्यादि पक्ती आहेत तिच्या हस्ताक्षरातील पक्ती पुढे दिल्या आहेत

एका कागदावर, 'आम्ही आमच्या वडिलाची उत्तरक्रिया (आमार बाबा क्रिया) प्रयागक्षेत्री केली' वगैरे लिहिलेले आहे

मी नागपुरास जाण्यापूर्वी पुण्यास श्रीमती बानर्जी (कै. शरदेंदु बानर्जींच्या पत्नी) यानी जुन्या बगाली राहणी–करणीविषयीच्या काही खुणा सागून ठेवल्या होत्या. त्या अनुरोधाने मी उत्तरेच्या वहिणीजवळ चौकशी केली त्यानी सागितले–'शारदा अतर्वस्त्र (पेटीकोट वगैरे) पेहरीत नाही. एकवस्त्रा असते.' आणि मासिक पाळीच्या



**शारदेच्या हस्ताक्षरातील बंगाली स्तोत्र**

¤

वेळी ? त्यानी सागितले की, ‘शारदेने कापूस आणि केळीचे पान मागून घेतले होते.’

उत्तरेचे आई–वडील वगैरे मंडळी ‘शारदेला’ परकी वाटायची. उत्तरेला प्राप्त झालेली ही काही निराळीच अवस्था पाहून तिच्या वडिलांचे हृदय कळवळले व त्यानी तिच्या पाठीवर हात ठेवला त्या वेळी ‘शारदा’ इतकी क्रुद्ध झाली की तिने त्यांना झिडकारले व म्हटले, ‘परस्त्रीला स्पर्श करता ?’ तिने त्याच्या ‘इतके वय झाल्याचा’ही जराशा तिरस्काराने उल्लेख केला.आईला व वहिणीला ती ओळखेना. पुढे हळूहळू त्याच्या सहवासाला ‘शारदा’ सरावली. उत्तरेच्या आईला ‘मासीमा’, वडिलाना ‘बाबा’, व वहिणीला ‘रेणू’ म्हणू लागली. तिला मराठीही ‘इटुक इटुक’ समजू लागले.

डॉ. दत्त तिला तपासायला आले तेव्हा त्याना ती स्पर्श करू देईना

जेवताना, इतराच्या पानात थोडासाच भात बघून ती आश्चर्य व्यक्त करी. इतर जण पोळी वगैरे कशी व कशाशी खातात हे पहात पहात ती स्वत तसे करी.

अमदावादला, उत्तरेच्या मामांनी सांगितले की, ‘शारदा’ प्रथम जमीन सारवून घेऊन त्यावर थाळी ठेवते. जेवताना उजव्या हातानेच पेल्यातील पाणी पिते. दूध व कॉफी प्यायची ती वशीत तोंड घालून, उत्तरेप्रमाणे वशीच्या काठाला ओठ लावून नाही.उत्तरेला गोड पदार्थांची आवड नाही; पण ‘शारदेला’ मिठाई आवडे. उत्तरा चिकू खाते; परंतु ‘शारदे’ला ते फळ निषिद्ध. (कारण, स्वामी–पती चिकू खात नसत !) पाटावर बसलेली शारदा पाणी पिण्यासाठी पाटावरून उठून जमिनीवर बसायची.

नागपूरची अनेक बंगाली मडळी तसेच बगाली बोलू शकणारी मराठी मडळी शारदेस भेटू लागली. बंगाली लोकाचे बोलणे ऐकेत्या वेळी ही ‘चितगावची बगाली बोली’, ‘ही बरद्वानची बगाली बोली’, ‘ही कलकत्त्याची बगाली बोली’ असे ती बरोबर सांगे. मडळी निरोप घेत त्यावेळी त्याना ‘सीताभोग’(बरद्वानकडील मिठाई)द्यायला सागे

प्रो. रॉयनी तिला विवेकानदाची बंगाली पुस्तिका दिली, त्यातील पुनर्जन्मविषयक पान तिने त्याना वाचून दाखवले. श्रीमती कोठारे यानाही तिने ते पान वाचून दाखविले. ‘दुर्गापारा’ वगैरे ३/४ स्तोत्रे तिने सौ. नियोगीना म्हणून दाखविली. श्रीमती कोठारे शारदेशी बोलल्या त्या वेळी त्याच्या बगाली बोलण्यातील चुका तिने त्याच्या नजरेस आणल्या. उत्तरेच्या वहिणीस शारदा बगाली व्याकरण शिकवू लागे.

## शारदेचे माहेर–सासर

तिला बंगाली मंडळी भेटायला येत व नाव, गाव, नातेवाईक इ. विषयी विचारीत त्या वेळी तिने वडिलांचे नाव ब्रजेश चट्टोपाध्याय, आईचे नाव रेणुकादेवी सांगितले. ‘माझी माता माझ्या जन्मानंतर लवकरच मृत्यू पावली. आनंदमयी ही माझी दुसरी माता व जगद्धात्री ही माझी मावशी, ती सप्तग्रामला आहे. तिथे सरस्वतीनदी आहे, असे तिने सागितले. छोटे काकाबाबू उच, गोरे व विद्वान होते. त्यानी मला मनु–स्मृती शिकवली असे ती म्हणाली.

प्रो. आर एन. रॉयनी तिच्या पतीचे नाव विचारले तिने ते उच्चारले नाही ‘वाराणशीच्या देवाचे नाव’ असे म्हणून ते नाव विश्वनाथ असल्याचे सुचवले, असे प्रो. रॉयनी मला सागितले (उत्तरेची वहीण शारदेजवळ बसून गुरुचरित्र मोठ्याने वाचीत होती त्या वेळी पोथीत ‘विश्वनाथ’ हे नाव आले की शारदा उठे व त्या पानावर कुकू वाहायची असे वहीण म्हणाली )

मासीमाने माझा विवाह ‘मेसो’चे भाऊ नदकिशोर मुखोपाध्याय याच्या मुलाशी करून दिला, माझ्या स्वामीना जदुनाथ व सोमनाथ हे भाऊ व सुनदा व शुभदा या वहिणी आहेत असे तिने सांगितले.

प्रो. रॉयनी विचारले–पतीचे नाव काय होते ?

शारदा – ‘होते ? आहे !’


‘पती आता हयात नाही,’ असे रॉयनी म्हटल्याबरोबर ती रडू लागली.

सौ रॉयच्या मनगटावरील ‘सावित्री’ (सोन्याचे पाणी दिलेले लोहककण) शारदेने निरखून पाहिले. त्यानी विचारले, ‘तुला हवे का हे ?’ शारदा म्हणाली, ‘तुमच्याकडून कसे घेऊ ? ‘सावित्री’ सासूकडून घ्यायची असते.’

तिच्यासाठी नागपूरच्या रामकृष्ण मिशन वाचनालयातून वाल्मीकि रामायण, रामलीला व भागवत ही पुस्तके आणली होती. (२५.१.७५; १८.२ ७५ व पुन १८.४. ७५ )

जून महिन्यात डॉ. सिन्हा बंगालमध्ये जाऊन आले. केस्तोपूर, बरद्वान वगैरे गावे हिंडता हिंडता त्याना वसबेरिया येथे चट्टोपाध्याय कुटुबाची वशावळ मिळाली व १३–१०–७५ रोजी तिच्यातील एक एक नावाचा उल्लेख करून, ‘हे कोण लागतात’ असे शारदेस विचारले. त्या वेळी तिने लिहिले की, ठाकुरदा रामनाथ वावार नाम ब्रजेश चट्टोपाध्याय. परदादा नाथबाबा छिलेन। रामनाथ ठाकुरदा. केलासनाथ, श्रीनाथ, ही नावे लिहिली. श्रीनाथ छोटो, देवीदास काका असेही लिहिले.

देवीनाथ हे तिचे छोटे काकाबाबू व



**शारदेची वशावळ. . .**

शिवदास हे बडे काका अशी नाती तिने सागितली चुलती एकाक्ष व कर्कशा होती असे ती म्हणाली

## पुण्यामध्ये शारदेची भेट

शारदेला भेटण्याची सधी मला पुण्याला लाभली उत्तरा आईवडील व वहिणीसह पुण्यास आली असताना, ८ जानेवारी १९७६ रोजी मजकडे भेटायला आली त्या वेळी मनात विचार आला 'उद्या अष्टमी आहे आतापावेतोच्या १७ अवस्थातरापैकी १३ अष्टमीस झाली आहेत कदाचित् उद्या होण्याचा सभव आहे ' मी उत्तरेस घरी पोचवले तेव्हा सागून ठेवले की, 'उद्या काही विशेष घडले तर फोन करा ।'

दुसऱ्या दिवशी दुपारी फोन आला की, सकाळपासून उत्तरा ही शारदा झाली आहे लगेच या 'माझे स्नेही श्री. धु ह बेडेकर व माझ्या सहकारी प्रो डॉ श्रीमती राजलक्ष्मी भट्टाचार्य ( वाडिया कॉलेज ) याना घेऊन गेलो त्या ९ तारखेस सायंकाळी तीन तास श्रीमती भट्टाचार्यांच्या साहाय्याने शारदेशी प्रश्नोत्तरात्मक संभाषण करता आले दुसरे दिवशी ( १०–१–७५ ) सकाळी मी व श्रीमती भट्टाचार्य शारदेशी तीन-साडेतीन तास बोललो या दुसऱ्या दिवशीच्या भेटीत मी दोन-तीन प्रयोगात्मक प्रसग योजले

श्रीमती भट्टाचार्यांचे नाव ऐकल्यावर व त्या बंगाली बोलतात हे पाहून शारदेचा चेहरा प्रफुल्लित झाला। तिने कोठून आलात? बैलगाडीतून ? रस्ता 'खोराव ' होता का ? वगैरे चौकशी केली. ती दिलखुलास व अस्खलित बोलली

श्रीमती भट्टाचार्यांपेक्षा उत्तरा वयाने लहान आणि २२। २३ वर्षाची, 'शारदा ' तर आणखीनच लहान साहजिकच, त्या तिला एकेरी संबोधू लागल्या, परंतु शारदा जराशी रागावून म्हणाली, 'आशुन-बाशुन बोलो '

आम्ही शारदेस अनेक प्रश्न विचारले पहिल्या दिवशीची मुलाखत सुरचित ( स्ट्रक्चर्ड ) होती. तिचे बालपण, शिक्षण, वैवाहिक जीवन, धार्मिक आचार, तात्कालीन वातावरण, तिचा जीवनकाल इत्यादि विषयी माहिती मिळवण्याचा व 'शारदा ' हे व्यक्तित्व सच्चे आहे की नाही हे पहाण्याचा आमचा उद्देश होता.

शारदेने तिच्या खापरपणजोबाचे नाव 'नारायण ' म्हणून सागितले त्यानी बारगीच्या त्रासामुळे 'कहद्दूर ' ( केस्तोपूर ) सोडल्याचे ती म्हणाली 'रामनाथ ' या आजोबाविषयी तिने सागितले की ते हंसेश्वरी मदिराचे पुजारी होते व त्याच्या पश्चात् छोटचा काकाबाबूकडे ( देवीनाथ ) पुजारीपण आले छोटचा काकाबाबूस दुर्गा नावाची मुलगी होती बडचा काकाच्या मुलाचे नाव 'न ' ने सुरू होते वरद्वानला दामोदरनदी व वडिलाचे घर याच्या दरम्यान शिवमदिर आणि कंकालिन्नचे मंदिर आहे वगैरे सागून ती म्हणाली

'लहान होते तेव्हा बाबाच्या ( ब्रजेशनाथाच्या ) बरोबर, मी वरद्वानच्या महाराजाच्या राजगृहात जात असे. तेथे भिंतीवर चित्रकारानी काढलेली मोठमोठी चित्रे आहेत

'मला छोटचा काकाबाबूनी लिहा-वाचायला शिकवले मनुस्मृती शिकवली योगवासिष्ट वाचून दाखवीत. योग, वियोग, गुण व भाग( बेरीज वजावाकी वगैरे) शिकवले 'हे अनादिभगवान् ' हे दशावतारस्तोत्र त्यांचे आहे ते भक्तिगीते रचीत त्याच्या (शेवटच्या) पक्ती अशा असत : 'देविदास नाथवले कि बले पामर आमि, जेड जानते पारे बले शइ आमि । '

'मी हंसेश्वरीमदिर अनेकदा पाहिले. त्याला १८ स्तभ आहेत (तिने स्तंभाचे चित्र रेखाटले )मूर्ती पद्मशाम, हसारूढ व 'काठेर मूर्ती ' आहे ' पूर्वी डॉ सिन्हाना शारदेने हसेश्वरीच्या आवाराचे वर्णन लिहून दिले होतेच

पूर्वेस हस, पश्चिमेस वशवृक्ष, उत्तरेस बाग व दक्षिणेस मोकळी जागा या वेळी पुण्यास, तिने त्या बागेतील वृक्षवनस्पतीची पुढील नावे लिहून दिली माधवीलता, बकुल, किंशुक, केशर, आकंद

शारदा म्हणाली ७ व्या वर्षी मासीमाने माझा विवाह ठरवला व दहाव्या वर्षी करून दिला. ती 'साधुसौदागर ' हे काव्य म्हणत असे माझे मावसे पडित नव्हते जमीनदार होते


ती आणखी म्हणाली 'आजोबानी ( रामनाथानी ) मला १० वे वर्षी नवाक्षरी बीजमत्र दिला तो सागायचा नसतो. आजोबा हसेश्वरीचे पुजारी होते. महाराजानी त्याना ३० बिघे करमुक्त जमीन दिली होती '

पूर्वी तिने विवाहाचे प्रसगी माहेरून व सासूकडून आणलेले अलकार लिहून दिले होतेच ( बाला, वाहुटी, शाखा, लोहा– मौतिकहार, मोटोरहार, हीग, नथुर. ) पुणे मुक्कामी शारदेने आपण होऊन सागितले की "प्रथम 'सावित्री ' घालायची असते, त्यानतर शख व नतर बागडचा चढवायच्या असतात 'सावित्री' ही सासूकडूनच यावयाची असते "

## पतिसहवास

'मी व स्वामी खुलन्याजवळच्या शिवपूरला राहातो खुलन्याजवळ सुनदानदी आहे तिथून १४ मैलावर शिकारपूर व तारामामदिर आहे स्वामी कविराज (वैद्य) आहेत घरी शिकण्यासाठी विद्यार्थी असत त्याना खाऊ घालावे लागे. मी कटाळत असे म्हणून ( स्वामी ) मारायचे स्वामी घोडचावर बसून जातात ह्याना एका जमीनदाराने ५ बिघे जमीन बक्षोस दिली '

भेटायला आलेल्याना ती 'स्वामी'बद्दल



विवाहप्रसंगीचे अलंकार

¤

विचारी. तिच्याशी श्री. मनोहरपंत हरकरे बंगालीत बोलू लागले तेव्हा डोळ्यात पाणी आणून तिने विचारले ' आपनि आमार स्वामीके जानेन ? ' (पतीना ओळखता ?) मला केव्हा तिकडे घेऊन जाणार असे ती कळवळून विचारी. डॉ. सिन्हाना तिने लिहून विचारले ' शशुर ओदा शशुर, भा सशुर केउ आढि की ना ? ' ( कोणी आहे की नाही ? )

' स्वामी माझ्याहून ७ वर्षांनी मोठे आहेत. ते रुग्णाना पहाण्यास घोड्यावरून जातात व रात्री परत येतात रक्तदोषावर रोग्याना सुवर्ण देतात. कर भरण्यासाठी खुलन्याला जातात घरी शिकण्यासाठी विद्यार्थी असत स्वामीबरोबर बैलगाडीने व मग नावेतून कलकत्यास गेलो होतो. तेथे घोडागाडी होत्या तिथे शख, कंगन व सोने घेतले- ' तीन टाका भारी ' या दराने. बसबेडिआस आम्ही डोलीतून गेलो '

स्वामी ब्रह्मचर्य पाळतात ? असे विचारता, शारदा म्हणाली, ' हो, मासेर निषिद्ध दिने. '

' स्वामीचा व माझा सहवास ' चतुर्दश वर्षांचा ' मला दोनदा ' मोरुनचे पोती ' झाले ( दुपवले ) तिसऱ्या खेपेस ७ व्या महिन्यात स्वामीनी सप्तग्रामला मासीमाकडे पोहोचवले. ते मला घेऊन जायला येणार आहेत मासीमाकडे दुर्गापुजेसाठी फुले वेचताना माझ्या उजव्या पायाच्या अंगठ्यास सर्पदंश झाला व मला मूर्च्छा आली. '

वडिलाच्या मृत्यूविषयी शारदा म्हणाली, 'माझ्या विवाहानतर ११ वर्षांनी बाबा वारले संपत्तीची वाटणी ते हयात असताना झाली नव्हती '

## रहाणी–करणी

आणखी प्रश्न विचारता, शारदा सागत गेली

' आमि उपानह परबेना ( मी जोडा वापरत नाही. ) कारण मी पडितेर बाडीर ( पडिताच्या घरची ) ' मेये ' ( मुलगी ). स्वामी कापडाच्या खटावा वापरतात. आम्ही मृत्तिकापात्रात ‹ चोखा आणि काशाच्या पात्रात शाकदाल शिजवतो बसण्यासाठी मादुर व जेवण्यासाठी कालपतो ( केळीची पाने ) वापरतो. स्वयपाकात व दिव्यासाठी नारियल तेल असते खाण्यासाठी गाईचे तूप कादा, कोबी व मासे खात नाही लसूण ' निषिद्ध जिनिस '. मला ' चेखिर पावेश ' ( तादळाची खीर ) आवडते

' पजिका (पचाग) घेवड्याच्या व शेवग्याच्या पानाच्या रसाने लिहिलेले असते कष्टतिथी (एकादशी,चतुर्दशी व अमावस्या) लाल रंगाने, बोटाचे रक्त काढून लिहिलेल्या असतात. पायाला अळता लावायला बाई येते

' आम्ही सरस्वती, माघमडल, आकाशपूजा व पितृसक्राति करतो. सत्यनारायणही करतो मी माघमासात कंकण सूर्यग्रहण बघितले आहे '

आज तिथी कोणती आहे, म्हणून विचारले तेव्हा ' अष्टमी हेठे नवमी ' ( अष्टमी नवमी कडे चालली आहे ) असे ती म्हणाली हा शब्दप्रयोग श्रीमती भट्टाचार्यांना अपरिचित होता नागपूरचे श्री. पी सी भट्टाचार्य (वय ७५) यांनाही तो अपरिचित.


' कलकत्यात कपनीलोक. त्याची भाषा दुर्भाषा आहे मोठा गोरा साहेब घोड्यावर असायचा ' कम् कम् ' अशी भाषा बोलायचा. कोणी महाराणी आहे; पण फार फार दूर. शिवाजीराजाविषयी ऐकले आहे तो भालो ( चागला ) पण मराठा लोक ' खोराब ' '

राणी लक्ष्मीबाई ठाऊक आहे का म्हणून विचारले. नाही असे तिने सागितले त्या वेळी आपण होऊन ती उद्गारली, ' देवी म्हणा. बाई शब्द अभद्र. ' रामकृष्ण परमहस व विवेकानद तिला ठाऊक नव्हते ' नाटक पाहिले आहे का ? ' असे विचारले, तेव्हा नाटक म्हणजे काय हा प्रतिप्रश्न तिने केला

' आमच्या तिथे महापूर, रोगाची साथ धरणीकप नाहीत ' लोक पाप करीत नाहीत. असे ती म्हणाली.

शारदा कायस्थाना सामाजिकदृष्ट्या कमी दर्जाचे लेखीत होती. ' मासीमा 'कडून कोणी तरी तिच्यासाठी साडी व सीताभोग आणला होता एवढे तिला स्मरण होते. त्या गृहस्थाचे नाव मात्र ' जानेना ' असे म्हटल्यावर आम्ही सागितले त्याचे नाव पाल ( प्रो. पाल ). हे ऐकताच ती उद्गारली, ' पाल ! कायस्थ ' आणि ( त्यानी आणलेला सीताभोग खाल्ला या विचाराने ) रडू लागली.

दुसरे दिवशी तिने तिच्या शिवपूरच्या घराचे रेखाचित्र काढून दिले टेकडी, तिच्यावर ' कुडघर ' पायथ्यास राहते घर पूर्व दिशेला पुकुर, घरात राधाघरात कोपऱ्यात देवघर, राधाघरालागून चिकित्साघर आणि ( बाणाने दर्शवलेले ) शय्याघर, त्यानंतर पडवी घरावाहेर आमवृक्षाखाली रुग्णांसाठी ' वसवार जागा ' ( बसण्याची जागा ) असे चित्र तिने काढले आवारातील झाडाची नावे तिने लिहिली : लिंबू, कमलेलेबू, लिचू, आम, गाव, सर्पगधा देवघराचा कोपरा दर्शवताना



शारदेचे शिवपुरचे घर...

श्रीमती भट्टाचार्यांच्या कानाजवळ तोड नेऊन शारदा म्हणाली, 'देवोघरापाठीमागे अल-मारीत मी चादीचे १२५ टाका ठेवले आहेत. कुणाला सांगू नका.'

मी मिश्किलपणे विचारले, 'शय्यागृहात खाट कुठेशी होती?' शारदा लाजेने चूर झाली व डोक्यावरच्या पदराने तिने चेहरा झाकून घेतला.

## शारदेतील उत्तरा

शारदा व उत्तरा ही दोन व्यक्तित्वे अगदी अलग आहेत की, अन्योन्यस्पर्शी आहेत हे मला पहावयाचे होते. त्यासाठी मी तीन प्रयोगात्मक गोष्टी केल्या

(१) अठरा व्यक्तिनावाची यादी शारदे-पुढे ठेवली शारदेच्या तोडून आली होती त्यापैकी काही नावे आणि उत्तरेला परिचित अशा काही व्यक्तीची नावे एकेक नाव ऐकल्यावर शारदेची प्रतिक्रिया आम्ही पहात होतो. १३ वे नाव 'क' होते. ते वाचून दाखवताच तिने मानेस झटका दिला. 'बोले नाइ' म्हणाली का म्हणून विचारता, 'गुजकथा' हे उत्तर दिले आणि आम्ही पिच्छाच पुरवला, तेव्हा तिने त्या नावापुढे शब्द लिहिला, 'भोगदासी'. ती स्त्री ३५ वर्षांची आहे अलकार वापरीत नाही हे व आणखी एकदोन गोष्टीही सांगितल्या शारदेची ती प्रतिक्रिया म्हणजे उत्तरेची प्रतिक्रिया होती. कारण ती स्त्री उत्तरेच्या परिचयाची होती. तिच्याविषयी उत्तरेने लिहिले आहे की, 'तिचे काम म्हणजे... साठी घेतलेला बुरखा आहे...'

(२) नतर आम्ही शारदेस विचारले, 'इथे किती दिवस रहाणार?' शारदा म्हणाली, 'मला एका साधूच्या गावी जायचे आहे. तेथे इद्राणी (इद्रायणी) नदी आहे उद्याच जायचे होते; पण मासीमा (म्हणजे उत्तरेची आई) नेईल तेव्हा खरे.'

इथे शारदेने उत्तरेचाच बेत बोलून दाखवला उत्तरेने इद्रायणीकाळच्या आळदीस जाऊन ज्ञानेश्वरीचे पारायण करण्याचे ठरवले होते

यानतरची प्रश्नोत्तरे तर आणखीच सूचक आढळली

**प्रश्न** उत्तरा माहीत आहे का?

**शारदा :** या मासीमाला उत्तरा नावाची कन्या आहे मासीमाने मला ती अजून दाखवली नाही

**प्रश्न** मग कशी काय माहीत?

**शारदा :** मासीमाकडे तिची छबी पाहिली आहे.

**प्रश्न :** तुमचे प्रतिबिंब आरशात पाहता?

**शारदा :** केस विचरते व कुकू लावते तेव्हा पहाते.

**प्रश्न** त्या प्रतिबिंबात व उत्तरेच्या छबीत साम्य आहे का?

**शारदा** आहे पण डोळे (नजर) भिन्न आणि लगेच 'शारदा' स्वत होऊन उद्गारली.

'उत्तरा उद्धता!' आणि गदगदून हसली.

**प्रश्न :** का हसलात?

**शारदा** उत्तरेच्या छबीवरून मी अभिप्राय दिला म्हणून

**प्रश्न** तुमच्यात उद्धता आहे?

**शारदा** मी कसे सागू? तुम्ही सागा.

यानतर श्रीमती भट्टाचार्य बगालीत म्हणत राहिल्या, 'तुम्हीच उत्तरा आहात.' आणि मी मराठीत 'उत्तराताई, उत्तराताई, असे सबोधीत राहिलो तेव्हा 'शारदा' श्रीमती भट्टाचार्यांना म्हणाली; 'तुम्ही म्हणता तर तसे असेल.'


शारदेची चर्या बदलू लागली. उत्तरेची बहीण उद्गारली 'काका, ती उत्तरा होते आहे!' लगेच आम्ही शारदेस विचारले दुर्गेची आरती करायला 'बाबाना' बोलवू का?'

इतक्यात नको असे ती म्हणाली व मस्तकाच्या मध्यभागावर बोट ठेवून तिने सागितले; 'अजून इथे दुखते आहे.'

शारदेमध्ये उत्तरा हा मन.प्रवाह काही प्रमाणात असला पाहिजे ही माझी कल्पना वरील तीन गोष्टीमुळे दृढ झाली. माझे मत मी उत्तरेस व डॉ. स्टीवन्सनना लिहिले (५-१२-७७) स्टीवन्सनने पत्रोत्तरी लिहिले (२२-१२-७७). I agree with you that the Sharada personality and the Uttara one are by no means completely impermeable to each other.'

श्रीमती कोठारे व उत्तरेची बहीण याच्या सभाषणात, पूर्वी शारदेने उच्चारलेला 'लुके' शब्द आला होता. त्या वेळी शारदेने उडी टाकण्याचा अभिनय करून दाखवला होता, यावरूनही ते सभाषण थोडे फार शारदेस समजले असले पाहिजे

**प्रक्षेपण चाचणी** 'शारदेस' Rorsehach Ink Blots मध्ये काय दिसते हे पहावे म्हणून मी क्लॉफर व केली याच्या




**प्रो. पाल यांना मिळालेली वशावळ**

¤

ग्रंथात छापलेली चित्रे तिला दाखवली. तिच्या प्रतिक्रिया खाली क्रमवारीने देत आहे (१) घोडार मुख (घोड्याची तोडे) (२) पूजेच्या वेळची हातांची टाळी. (३) जलपात्रे नेणाऱ्या विवस्त्र मुली; (४) 'अभद्र' (५) चामचिका (रातपक्षी). (६) पद्म (७) छोटे छागल (बकरे) (८) नृसिंह मुख. (९) दोन भैरव (१०) शिवजी शिवताडवनृत्य; कबल पाघरलेला साधु

## शारदेचे बंगाली

शारदेच्या बोलण्यात सस्कृत शब्द बऱ्याच प्रमाणात आढळले उदा उपानह, मनोवाछा, कष्टतिथि. त्यामुळे काहीना ते ग्राथिक–बुकिश वाटायचे. तथापि विभक्तिप्रयोग तसेच वाक्यरचना या बाबतीत तिचे बंगाली रूढ बोलभाषेप्रमाणे असल्याचे आढळले. करबेनाई, पारबे नाई, छेल्या, मोर, तोमि यासारखे शब्दप्रयोग तिने केले आहेत. डॉ सौ. भट्टाचार्यांना तिची बोली बरद्वानी वाटली.

शारदेच्या बगाली उच्चारावर मराठीची छाप असल्याचे प्रो. रॉय याना आढळले. 'Her pronounciation of Bengali has the impress of Marathi, may be due to her life long habit of speaking Marathi.' (26-2-75)

पूर्वी नागपूर येथे शारदेने लिहिलेले कागद आम्ही तिला दाखवले. 'हे मी लिहिले आहे' असे म्हणून तिने ते अस्खलितपणे वाचून दाखवले. आधुनिक छपाईतील बगाली पुस्तक तिला अमदावाद मुक्कामी दिले होते ते मात्र तिने तिसऱ्या इयत्तेतील मुलीने वाचावे तसे वाचले. त्यातील 'फ्लॅट' या शब्दापाशी ती अगदीच अडखळली व अर्थ विचारू लागली. 'वाडी' (रहाण्याची जागा) असे सागताच ती खुलली; पण तो 'कपनी भाषेतला शब्द आहे' असे तिला सागताच तिने ते पुस्तक भिरकावून दिले.

शारदेच्या लिहिण्यात सफाईचा अभाव आढळला. उत्तरेचे मराठी अक्षर वळणदार पण शारदेचे बेढब व बरेच वेळी लहान मुलीने लिहावे तसे तिने लिहिले आहे व खोडाखोड व दुरुस्ती केलेली आहे याग्य वाक्यातील 'ग्य' ऐवजी 'ग' गगा ऐवजी जगा, पोटफोड्या ष ऐवजी 'श' सर्वेषा ऐवजी सवेषाम्, जगद्धात्री ऐवजी जगधात्री, गार्गी ऐवजी जार्जी अशा चुका झालेल्या आहेत. शारदा अक्षरे काढी ती anti clock wise ही गोष्ट सौ. भट्टाचार्यांच्या नजरेस आली शारदेचे लेखन बरेचसे उच्चारानुसारी असल्याचे दिसले. उदा 'आता' (आत्मा), वपरे (ओपारे) वखानेर (ओखानकार) हसेश्वरीच्या आवाराच्या वर्णनात, हाँस ऐवजी हास, बाँस ऐवजी बास फाँकऐवजी फाक, 'स, भ, ज,' ही अक्षरे जुन्या काळी लिहीत तशी लिहिलेली आहेत

शारदेने लिहून काढलेले दशावतारस्तोत्र फार जुने दिसते. श्री. एस. बी. जोशी (कलकत्ता) यानी मला पाठवलेल्या दशावतारस्तोत्राहून ते निराळे आहे. जयदेवरचित स्तोत्राच्या विश्वदेव भट्टाचार्यकृत अनुवादाहूनही ते भिन्न आहे.

'शारदा' खरोखरच होऊन गेली ? होय. उध्वस्त स्थितीत असलेल्या केस्तोपूर या गावी आजही चतर्जीवेड (चतर्जीवस्ती) म्हणून भाग आहे, परतु सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे, बसबेरिआ येथे हसेश्वरीच्या परिसरात राहणारे श्री. सतीनाथ चट्टोपाध्याय याच्या जुन्या कागदपत्रात शारदेने सागितलेली नावे असलेली चट्टोपाध्याय या विद्वान-घराण्याची वशावळ १९७५ मध्ये डॉ आर. के. सिन्हा तसेच प्रो पाल याना मिळाली आहे. ही ती वंशावळ.

पुण्यास शारदेने भावाचे नाव सतीनाथ म्हणून या वशावळीत ते नाही. श्रीनाथ हे नाव आहे.

या घराण्यातील अनादिनाथाना डॉ. सिन्हा भेटले आहेत. त्याचे पुत्र श्री. अशोकनाथ चट्टोपाध्याय आज कलकत्त्यात चडीबाडी, गोवगान येथे राहतात केस्तोपूरच्या चट्टोपाध्याय घराण्याचे एक वशज श्री. कामाक्षी चट्टोपाध्याय वरद्वानला रेल्वेइन्स्टिट्यूटच्या वाचनालयात काम करतात त्याच्या पणजीच्या पिढीत एक स्त्री सर्पदशाने मेली होती असे ते सागतात.

ब्रजेश चट्टोपाध्याचे बधु देवीनाथ व पुत्र श्रीनाथ याच्यामध्ये मार्च १८२७ साली झालेले वाटणीपत्रही उपलब्ध झाले आहे

खुलन्याजवळच्या शिवपूर येथे विश्वनाथ मुखोपाध्याय नावाचे वैद्य होऊन गेले त्यांनी पहिल्या पत्नीच्या निधनानतर दुसरा विवाह केला व तो वश सध्या आहे प्रो. पालना शारदेच्या सासरकडील मडळीबाबत काही तरी निश्चित पुरावा मिळाला असून त्यानुसार या caseच्या सत्यतेवर नवा प्रकाश पडेल असा अदाज असल्याचे उत्तरेने मला कळवले. (२५–१०–७६)

### शारदा कधी होऊन गेली ?

हे ठरविणे जरासे कठीणच आहे. १८०६-१८३० हा तिचा जीवनकाल असावा. दहाव्या वर्षी, म्हणजे १८१५–१६ मध्ये विवाह, त्यानतर स्वामीसह वास्तव्य 'चतुर्दशवर्ष' विवाहानतर ११ वर्षांनी वडिलाचा मृत्यू (म्हणजे १८२७ मध्ये) व मार्च १८२७ मध्ये काका–पुतणे यामध्ये वाटणीचा कागद व बावीस वर्षाचे वय असताना सर्पदश, असा घटनाक्रम असणे शक्य आहे. या सदर्भात पुढील गोष्टीही विचारात घेण्याजोग्या आहेत (१) बगालमध्ये १८१९–२० पासून पंचागे छापली जाऊ लागली; परतु पजिका हाताने लिहीत असे शारदेने शागितले (२) १८२२ सालच्या बाजारभावपत्रिकेमध्ये खोबरेल तेलाचाच फक्त उल्लेख आहे या वस्तुस्थितीशी, शारदेचे 'आम्ही स्वयपाकात खोबऱ्याचे तेल (व गाईचे तूप) वापरतो' हे विधान जुळते

जे ककणाकृती सूर्यग्रहण पाहिल्याचे शारदा म्हणाली ते बहुतकरून १४ एप्रिल १८२८ चे असावे १८०१ ते १८६० या काळात ५० सूर्यग्रहणे झाली होती (ए. कनिंगहॅमकृत यादी*) त्यापैकी १४–४–१८२८ व ४–३–१८४० या दिवशीची ग्रहणे ककणग्रहणे होती व ती बरद्वानच्या भागात दिसू शकणारी होती त्यानतरची दोन कंकणसूर्यग्रहणे ६–४–१८७२ व १७–६–१८९० या दिवसाची आहेत (थिओडोर अप्पोलझर, द. कॅनन एक्लिप्स) श्रीरामकृष्ण परमहस (१८३६), राणी लक्ष्मीबाई, बरद्वान व वीरभूम जिल्ह्यातील १८६३ ची तापाची साथ, या गोष्टी शारदेस ठाऊक नव्हत्या हेही लक्षात घेण्यासारखे आहे हसेश्वरीचे मदिर १८१४ मध्ये पूर्ण झाले व राणी शकरीदेवीने देवीची स्थापना केली. शारदेचे आजोबा या मंदिराचे पुजारी होते व त्याच्या पश्चात काकाबाबूकडे पुजारीपण आले. ही शारदेची विधाने दर्शवतात की तिचे वडील बहुधा त्या वेळी हयात नसावेत

प्रो पाल याच्या मते शारदा १८५९ मध्ये मरण पावली असावी. कारण नानासाहेब पेशवे तराईच्या जगलात निघून गेले असे शारदा सागे व त्यावरून तिला १८५७ चे बड ठाऊक असले पाहिजे (पॉल याचा लेख नागपूर टाइम्स, १० नोव्हेंबर ७५) परतु ह्या उल्लेखाचे मूळ शारदेत होते की, त्याच्या मुळाशी तिच्यातील उत्तरेचे इतिहासज्ञान होते हा प्रश्न विचारता येतो.

या मदिराचे पुजारीपण कोणाकोणाकडे व केव्हा गेले, बरद्वानच्या महाराजानी रामनाथ चट्टोपाध्यायाना करमुक्त ३० बिघे जमीन दिली होती काय, 'देविदास बोले' असा शेवट असलेली भक्तिकवने आहेत काय, बरद्वानच्या राजवाड्यातील भिंतीवर मोठी चित्रे आहेत काय, इ विषयी बरद्वान-विद्यापीठाचे उपकुलपती डॉ. रमारंजन मुखोपाध्याय याना, डॉ आर एन. दाडेकराचे पत्र जोडून, मी पत्राने विचारले होते (१३–२–७६). त्यानी ते काम एका प्राध्यापकावर सोपवले; परतु माहिती आली नाही. आली असती तर बरे झाले असते.

गेल्या शतकाच्या पूर्वार्धात चट्टोपाध्याय-कुलात जन्मलेली व विवाहानतर मुखोपाध्यायकुलात गेलेली शारदा नामक तरुणी खरोखरच होऊन गेली असल्याचे दिसते. त्यामुळे उत्तरेच्या ठिकाणी शारदा नावाने एक निराळे व्यक्तित्व प्रकट होऊ लागले हा प्रकार परामानसशास्त्रीयदृष्ट्या विचार करावयास भाग पाडणारा आहे वास्तवापासून पराङ–मुखता व अपसरण (withdrawal) या लक्षणामुळे हा प्रकार म्हणजे केवळ छिन्नमानस (शिझोफ्रेनिआ) नामक मनोविकृतीचा प्रकार आहे असे म्हणून भागणार नाही दुभग अथवा द्विधा व्यक्तित्व (dual personality) हे मनोविकृत्ती-शास्त्रीय लेबल देऊनही भागणार नाही

तथापि, या विलक्षण प्रकाराच्या मुळाशी काही कारण–कार्यसबध असलाच पाहिजे विवाहित परतु अपत्यप्राप्ती होण्यापूर्वीच मृत्यू पावलेली शारदा ही बगाली तरुणी मराठी भाषिक उत्तरेच्या ठिकाणी प्रकट का होऊ लागावी ? शारदा नामक एक स्त्री होऊन गेली अशी केवळ ज्ञानात्मक जाणीव न होता उत्तरेस शारदावस्था का प्राप्त होऊ लागावी ? आणि हा प्रकार उत्तरेच्या ३३ व्या वर्षानंतर का दिसून येऊ लागला ? शारदा व उत्तरा या दोन व्यक्तित्वामध्ये काही सबध असू शकेल काय ? हे अतिशय महत्त्वाचे प्रश्न आहेत उत्तरेचे आत्मनिवेदन व तिने व तिच्या वडिलानी पत्राद्वारे तसेच प्रत्यक्ष भेटीत सागितलेला तिचा जीवनेतिहास यामध्ये या प्रश्नाची उत्तरे सापडतात असे मला वाटते म्हणून आता त्या उत्तरासाठी उत्तरेकडे–

---

# शारदेच्या शोधात उत्तरा

---

उत्तरेचे घराणे मूळचे नाशिककडचे, राऊळदे आडनावाचे पाच पिढ्यापूर्वी एकाला छिंदवाड्याच्या गोड राजाकडून हुद्देदारी मिळाल्यामुळे त्या भागात स्थाईक झाले. आईकडचे घराणे तंजावरकडचे, कानडे आडनावाचे पैतृक घराण्याचा सबध मोरया गोसावीशी होता.

उत्तरेचा जन्म नागपूरला १४ मार्च १९४१ सकाळी ११०५ चा. उत्तरेच्या मातोश्री सागत की त्या गर्भारपणी त्याना मोठमोठ्या सापाची स्वप्ने पडत असत

उत्तरेचे पहिले ७ महिन्याचे बालपण नागपुरास गेले त्यापुढची ७ वर्षे ती आई-सह आजीकडे वर्ध्यास (मशानकराच्या वाड्यात) होती. त्यानतर दोन वर्षे तिचे वास्तव्य तिच्या वडिलाच्या दत्तक मातुःश्रीच्याकडे शिरसी या गावी होते. ह्या आजी अतिशय धार्मिक होत्या व अनेक स्तोत्रे म्हणत असत उत्तरा नागपुरास कायमची राहू लागली ती १९५३ पासून–वयाच्या १२–१३ व्या वर्षापासून

(शिरसीस सर्प फार दिसायचे. ८–९ वर्षांच्या उत्तरेला त्याची भीती वाटायची. प्रौढ वयात मात्र तिला सापाची भीती वाटत नसे. 'मला स्वत ला तर सापाची भीती नाहीच.' जागेपणी फक्त एकदाच तिला सर्पाची भीती वाटली. १९७६ फेब्रुवारीत शिवरात्रीच्या सकाळपासून उत्तरेला स्वप्नामध्ये मात्र सर्प मानेजवळ चावेल की काय अशी भीती वाटली आहे शिवपूजाप्रसगी पायाच्या अंगठ्यास सर्पाने दंश केल्याचे एक स्वप्नही पडले आहे)

उत्तरेच्या वडिलाना (जन्म १९००) युवावस्थेत बगालमधील क्रातिकारकाविषयी खुदीराम बोस, विपिनचद्र पाल, अरविंद घोष

याविषयी अतिशय आकर्षण व आदर होता चित्तरंजन दास हे त्यांच्या घरी (नागपूर येथे) आठ दिवस राहिले होते असेही ते म्हणाले तरुणपणी ते प्रथम राष्ट्रीय स्वयंसेवक संघात होते नतर कम्युनिस्ट बनले पुढे त्यानी स्पेनमध्ये जाऊन जनरल फ्रँको-विरुद्धच्या लढाईत भाग घेतला व तेथे कैदी झाले होते त्याना बगाली येत नव्हते 'शारदा' बोलते ती बगाली भाषा असल्याचे इतरानी ओळखले म्हणून त्याना समजले असे ते म्हणाले.

तिला भाषाची आवड कौमार्यावस्थेपासूनच मॅट्रिकच्या वर्षात असताना ती भारतीय भाषाच्या लिपी शिकली थोडेसे रशियन शिकली (पुढे सस्कृतची प्राज्ञ परीक्षाही दिली) बगाली शिकण्याची इच्छामात्र फार त्यासाठी ती व तिचा बालमित्र बंगाली शिकवू शकणाऱ्या एका महाराष्ट्रीय शिक्षकाकडे काही दिवसच गेले होते बगाली प्रायमर वाचण्याइतपत प्रगती झाली होती असे त्या स्नेह्याने सागितले. इतरत्र कोठे तिने वंगालीचे शिक्षण घेतल्याचे आढळले नाही १९६४ ते १९७० पर्यंतच्या, पी सी भट्टाचार्यांच्या वर्गाच्या रेकॉर्डमध्ये तिचे नाव नाही तसेच दिनानाथ हायस्कूलच्या बंगाली वर्गाच्या रजिस्टरमध्ये उत्तरेचे नाव नाही नागपूर विद्यापीठात•१९६० ते ७० या काळात बगालीचे वर्ग चालवले नव्हते असे रजिस्ट्रारानी पत्रोत्तरी कळवले आहे (४–८–८०) उत्तरेच्या राची येथे रहाणाऱ्या मावसबहिणीस बगाली येते, पण ती फक्त एकदाच (१९७५) नागपुरास आली होती. रामकृष्ण मिशन वाचनालयातून बंगाली लिपीतील रामायणादि पुस्तके नेण्यात आली होती, त्या तारखा उत्तरा शारदावस्थेत असतानाच्या आहेत

उत्तरेने बंकिमचद्र, टागोर व शरच्चंद्र चट्टोपाध्याय याचे वाङमय वाचले आहे, परतु मराठी-अनुवादित स्वरूपात. शरच्चद्राच्या कादंबऱ्याकडे तिचा ओढा विशेष होता 'श्रीकात'मध्ये ती तन्मय होई १९७० मध्ये व नतर तिने त्या कादवरीचे जणू 'पारायण'च केले होते. शरच्चद्र हे वरद्वान-नजीकचे त्याच्या वाङमयाचे आकर्षण व उत्तरेतील 'शारदा' यामध्ये काही सवंध असेल काय?

उत्तरा १९५८ मध्ये मॅट्रिक झाली डॉक्टर होण्याची खूप इच्छा होती, पण जमले नाही बॉयॉलॉजी विषय घेऊन ती बी एस्सी झाली कॉलेजातील तिची वर्षे 'सुखाची गेली नाहीत' शरीरप्रकृती साथ देत नसे अभ्यासात खड पडे सर्दी, मासिक त्रास यामुळे ती खूप अशक्त होई तेव्हापासून ती अतर्मुख बनली बी एस्सी नतरची चार वर्षे (१९६८ पर्यंत) तिने हायस्कुलामध्ये अध्यापन केले त्या काळातही शारीरिक तक्रारींनी तिचा पिच्छा सोडला नाही व ती अधिकाधिक अशक्त व अतर्मुख होत गेली. १९६९ मध्ये इग्रजी विषय घेऊन ती एम ए झाली व नतर पब्लिक अॅडमिनिस्ट्रेशन या विषयातही एम ए. पदवी मिळविली

उत्तरेस स्वतःच्या स्वभावातील गुण-वैगुण्याची स्पष्ट जाण आहे तितक्याच वस्तुनिष्ठ वृत्तीने ती मातापिता व इतर लोकाकडे पाहू शकते आपले व आईचे काही बाबतीत फार छान जमते, पण तिचा स्वभाव असा असा आहे वडील अत्यंत बुद्धिमान; परतु कल्पना कृतीत उतरवणे त्याना जमत नाही तिला स्वतःला नीतिबाह्य सबधाविषयी तिटकारा आहे, असे वाक्यपूर्ती–चाचणीमध्ये तिने म्हटले आहे (तिचा ह्या ढोबळ अभिप्रायाचा अर्थ एका मनोवैद्याने मात्र असा लावला आहे की. तिची आई–वडिलाविषयीची तसेच sex बाबतची अभिवृत्ती **Unhealthy** आहे तो तिवारी घाव तिला अर्थातच सहन झाला नाही)

उत्तरा एम ए. परीक्षेसाठी टी एस इलिअटच्या **Wasteland** या काव्याचा अभ्यास करीत होती. **Complex echoing of multiple sources** ह्या कल्पनेवर ते आधारलेले आहे त्या वेळचा अनुभव उत्तरेने सागितला आहे तो असा 'त्या कवितेतील टायरसिअससारखेच आपण आहोत असे मला वाटू लागले – – त्याला कुठेही जाता येते – – त्याला त्रिकालज्ञान आहे – – त्याच्याप्रमाणे आपणही भूत, वर्तमान व भविष्य ह्या तीनही काळात जाऊ शकतो असे वाटायचे.'

तिने सागितलेली पुढील घटना तिला असे वाटू लागण्यास कदाचित कारणीभूत झाली असेल 'माझी मैत्रीण कुमुद ×× हिचे लग्नानतर (त्या वेळी मी दक्षिणेत होते) तिच्या प्रथम भेटीत काय घडले हे दूर उभी राहून (तिच्या घरी) पाहिल्याचे स्मरते १५ दिवसानंतर आम्ही भेटलो, तर ती सागण्यास उत्सुक; पण मीच ते सर्व तिला ऐकवले'

## आध्यात्मिक दिशा

उत्तरेस लहानपणी वडिलाविषयी विशेष ओढा नसे नागपुरास आल्यानतर व मॅट्रिकच्या वर्गात ती गेल्यापासून मात्र त्याचा खूपच लळा लागला आणि तो कायम टिकून राहिला उभयताची दोन मित्राप्रमाणे चर्चा चालत असे चर्चेचा ओघ तात्त्विक व आध्यात्मिक विषयाकडे असायचा कुटुंबात गणपतीची उपासना होतीच 'घरातील सर्व मंडळी सकष्टी चतुर्थी करीत असल्यामुळे अथर्वशीर्षाचे पाठ नेहमीच होत असत.' उत्तरेच्या वडिलाचा पिंड तत्त्वचिंतकाचा होता, इतकेच नव्हे तर त्याना योगी होण्याचीही इच्छा होती राष्ट्रीय स्वयसेवक सघाचे कार्य, कम्युनिस्ट चळवळीत भाग, तुरुगवास, स्पेनमध्ये कैद इत्यादीमुळे ती इच्छा पूर्ण होऊ शकली नव्हती. त्याच्याकडून उत्तरेच्या आयुष्याला आध्यात्मिक वळण मिळू लागले. त्यानी लिहिलेल्या पत्रात त्यानी म्हटले आहे 'योगी होण्याची माझी इच्छा मी तिला ध्यान वगैरे शिकवून पुरवीत होतो. माझ्या मुलीने **perfection** कडे जावे असे मला वाटे काही बाबतीत ती माझ्याहून श्रेष्ठ आहे हे दिसले की, त्या वेळी मला आनद वाटे'

पचविशीच्या सुमारास तिची साधना तीव्र सवेगी बनू लागली ती नियमितपणे ध्यानास बसू लागली "ततः पदं तत् परिमार्गितव्यम्। यस्मिन् गता न निवर्तंति भूय। तमेव चाद्य पुरुष प्रपद्ये, यत प्रवृत्ति प्रसृता पुराणि॥ हा गीतेतील श्लोक माझ्या चिंतनाचा विषय असे" जीवनाचा अर्थ, चैतन्य, मातृत्वाचे (वैश्विक) प्रयोजन, इत्यादीविषयीचे तिचे जिज्ञासू मन काही जाणिवाना जन्म देऊ लागले याच काळात, वयोवृद्ध श्री जनार्दनस्वामीनी तिला काही आसनेही शिकवली आणि ओम् जपण्यास सागितले

त्याबरोबरच, यौवनसहजभाव, आशा-निराशांचे हेलकावे, घावामागून घाव, संघर्ष या गोष्टीही ती अनुभवीत होती. सुटकेचा मार्ग म्हणून या अनुभवाचे उदात्तीकरण होऊ पहात होते तिच्या समिश्र जाणिवा कविता-मधून व्यक्त होऊ लागल्या तिच्याच शब्दात, 'हे काव्य माझ्या भावगर्भ अनुभवाचे आध्यात्मिकीकरण असू शकेल; परतु ते केवळ वैफल्यापोटी झालेले नाही, त्याचे मूळ साधनेत व आध्यात्मिक विकासात आहे.'

उत्तरेची ध्यानधारणा चालूच होती तिला पुढील अनुभव येऊ लागले असे तिने नमूद केले आहे 'कठ, गाल व भुवयामध्ये सुया टोचल्यासारखे सवेदन, पोट आत ओढू लागणे, छातीत दोन्ही बाजूस काही हाल-चाल, कानाचे वरचे भागात काही तरी क्रिया, अश्रुस्राव, विस्मृतिवत् तद्री.'

## मी बदलू लागले

एकीकडे शारीरिक प्रकृती अशक्त झालेली होती. त्यातच भर पडली मनालाही थकवा ( exhaustion ) आणणाऱ्या घटनांची विसाव्या वर्षापर्यंतच्या एका स्नेहबधनाला तारुण्यातील आकाक्षाची जोड मिळत गेली. एका नामाकित घराण्याची सून होण्याचे स्वप्न पडू लागले होते तसे प्रत्यक्षात घडणार नाही यावर विश्वास बसूच शकत नव्हता; पण मन अस्वस्थही होत होते आयुष्यात करण्यासारखे पुष्कळ आहे; पण ऐन उमेदीची वर्षे वाया जाणार की काय ही भीती; आशेचा धागा तुटतो की काय ही शका, जीवनातील आधार मानलेला स्तंभ डळमळू लागल्याची जाणीव, ओढ मात्र कायमच. मन होते तिथेच असल्याचा चतुर्थीच्या रात्री आत्मनिरीक्षणानतर दर वेळी कौल, ही मानसिक अवस्था उत्तरेस थकवा आणू लागली तिला विलक्षण ग्लानी आणू लागली. आपण आयुष्यातील 'transition period' वर असल्याचे तिला वाटू लागले.

अशा स्थितीत १९७०–७१ मध्ये एका वयस्कर गृहस्थाची भेट झाली ते सेवाभावी वृत्तीचे, तसेच अध्यात्म प्रवृत्तीचे होते एक आश्रमही ते चालवीत होते. त्या पहिल्याच भेटीत उत्तरेच्या व्यक्तिमत्त्वाची खोल-वरची पातळी प्रभावित झाली. त्या गृहस्थाना पुन पुन: भेटण्याची विलक्षण ओढ वाटू लागली आतापावेतो अस्वस्थ असलेले तिचे चित्त शात होऊ लागले उत्तरेच्या वडिलाच्या शब्दांत, त्या गृहस्थाची भेट म्हणजे उत्तरेच्या जीवनास झालेला निवृत्तीचा स्पर्श होता आतापर्यंतच्या जीवनाकडे पाठ फिरवून त्या गृहस्थानी हाती घेतलेल्या कार्यात सहकार्य करावे, या जगासाठी काही तरी करायलाच हवे असे तिला ठामपणे वाटू लागले. त्या गृहस्थाविषयी तिला आपुलकी वाटू लागली. उत्तरेच्या स्वत.च्या शब्दात, 'कोणत्या तरी सामान्य गोष्टीस वाहून घेणे, निव्वळ ससार करणे हे ध्येयच उरले नाही. आजवर प्राण एकवटून साधना केली (जी) विघ्न आली त्या विघ्नांनाच श्रद्धाविषय बनवण्याची धडपड केली; पण आता साऱ्यांतून मुक्त झाले जणू एका विशाल सत्याच्या अंतर्यामीच येऊन पोहोचले आता मनात कोणताही विरोध नव्हता पाठीमागे भूत-काळ नव्हता' विवाह न करण्याचा तिने निश्चय केलेला होताच ती वडिलाना म्हणे : आई होऊ न शकणाऱ्या ( स्त्रिया ) मदर टेरेसा, कमलाबाई होस्पेट होतात !'

आध्यात्मिक साधनेच्या सदर्भात, तिने लिहिले आहे 'काया–वाचा–मनेकरून परमानदाचा मागोवा–परमहसाचा शोध घ्यायला मी निघाले होते. या खटाटोपात कदाचित् देहाचा पिंजरा सोडावा लागेल. I am nobody इथपर्यंत पोचलेले भाव कशाकशातच गुतत नव्हते स्वत.चे 'असणे' याचेही बंधन वाटू लागले होते' आपण, 'ओम्काराच्या भुकेने सर्वस्व विसर्जित करून दु खाग्नीचा चिखल तुडवीत आलेले स्वय-विकसित कमलपुष्प' आहोत असे तिला वाटू लागले.

आयुष्याला नवीन दिशा द्यावी या निश्चयाने त्या आश्रमात कायमचे जाऊन राहण्याचे तिने ठरवले व १९७० च्या अखेरीस तिने तो विचार अमलातही आणला. तेथे राहून वाचन, मनन व लेखन करावे, डॉक्टर होण्याची अपुरी राहिलेली इच्छा तेथे वैद्यकीय ग्रथाचे वाचन करून पूर्ण करावी, त्या गृहस्थाच्या आश्रमकार्यात सहभागी व्हावे, अशा विविध प्रेरणा त्या निश्चयामागे होत्या. आश्रमातील वास्तव्याविषयी तिने लिहिले आहे

'तेथील वातावरणात आपला आत्माच उमलत असल्यासारखे वाटे. गीता, ज्ञानेश्वरी, नवनाथ, आश्रमपाठ या वाचनाने सतत नवनवी पालवी उमलत असल्यासारखे वाटे !'

'आता ओकार आदि भैरवी ।
माझ्या प्राणरंध्रातून व्याली ।
प्रकाशाची नामावली, कैसी सागू ?'


या पक्ती, त्याचप्रमाणे खालील पक्ती याच सुमाराच्या :

'आता ओकाराची माय माझी ।
घेइ पोटाशी आदिभैरवी ।
माझा सोहकार मावळे ।
शून्य दिशी ।।
आता क्षितिजाची साक्ष ।
उमा भाव भगवत ।
माझे अस्तित्वाची आस ।
विसावली ।।
करू कैसेनि जतन ।
माझे लोपले अस्तित्व ।
आता उरले कौतुक । अकर्माचे ।।
माझ्या सोहभावाचा उमाळा ।
वितळे अनत रश्मिकळा ।
सोहभावाचा उमाळा ।
उतू जातो ।।

परतु दुर्दैवाने उत्तरेला एक दु खद जाणीव होऊ लागली. अध्यात्माच्या वाटेवर तसेच सेवाकार्यात ज्या प्रकारची साथ मिळावी, म्हणून आकाक्षा व अपेक्षा होती ती पूर्ण होणार नाही हे तिच्या ध्यानात येऊ लागले. 'शारीरिक, मानसिक, आत्मिक मरण' होणार काय हा विचार येऊ लागला 'त्या अनामिक वेदनेची भीती' एकीकडे तर दुसरीकडे, 'जीवनास चिकटण्याची अनिवार ओढ' ही होती, 'असण्याचाही लोभ' होता. पूर्वी अनुभवलेल्या सघर्षाचा शारीरिक–मानसिक परिणाम झालेला होताच त्यात ही भर पडली. तिने लिहिले आहे

'मी बदलू लागले...चद्राकडे बघत राही. रात्र रात्र जागे मधून मधून विस्मृती. थकवा काही नकळणं...एकीकडे विलक्षण विस्मृती, दुसरीकडे स्मृती, हा खेळ माझी रस्सीखेच करी, तासन् तास रडत ठेवी.'

अशा स्थितीत तिला विचित्र अनुभव येऊ लागले. कधी भीती, विचित्र आवाज, गोल, चौकोन, प्रकाश इत्यादी. त्याबरोबरच, ज्याचा सबध केवळ उत्तरेच्या व्यक्तिगत इतिहासाशी लावणे कठीण आहे असेही काही अनुभव तिला येऊ लागले. उदा 'मधून



**शारदेचे दोन लिपीतले लिखाण**

मधून एक घर. देव्हारा–पूजा–**वाट पहाणं–** रात्री (ते) **घोड्यावरून येणं**–स्पर्श-पाय-चेपणं–दचकणं, बिलगणं, स्वस्थ होणं–पुनः दुरावा. कधीकधी, न पाहिलेली गावे व माणसे, नदीवर आंघोळ करणाऱ्या **सासूबाई** दासदासी...सोनचाफ्याची फुलं...कुणी तरी मारणं, मला अपमान वाटणं...'

## योगनिद्रा व कोऽहं हा प्रश्न

१९७४ च्या फेब्रुआरीत त्या आश्रमाला गोंदियाच्या 'मा योगशक्ती' यांनी भेट दिली. तीन दिवसांचे त्यांचे वास्तव्य उत्तरेच्याच खोलीत होते. त्यांनी उत्तरेस योग निद्रेचे प्रात्यक्षिक दाखवले व तिच्याकडून त्या प्रमाणे करवून घेतले. 'कोऽहं' हा प्रश्न व 'सोऽहं' हे उत्तर तिला उच्चारावयास लावले.

दुसरे दिवशी उत्तरेला वाटू लागले की मला काही होणार. तिला बंगाली अक्षरे दिसू लागली व बंगाली वाक्ये ऐकू येऊ लागली असे तिने बहिणीस सांगितले आणि लवकरच उत्तरा बंगाली बोलू लागली. हे अवस्थांतर कधी १०/१५ मिनिटे तर कधी अर्धा तास टिकायचे. (त्या बोलण्याची करण्यात आलेली टिपणे मला उपलब्ध झाली नाहीत. त्या गृहस्थाशी पूर्वजन्मीचे नाते हा त्या बोलण्याचा आशय होता, एवढे मात्र मला सांगण्यात आले उत्तरेस लहानपणी जो घोड्यावर बसलेला माणूस दिसे व प्रौढपणी स्वप्नात किंवा ध्यानास बसली असता जो उंच गौरवर्ण, सडपातळ पुरुष दिसे त्याच्याशी आता शारदेच्या मनात 'Link' लागली असावी; पण कशी व का ते कळत नाही' असे उत्तरेने लिहिले आहे.)

त्या आश्रमातून उत्तरा घरी परत आली उत्तरा त्याबरोबरच शारदासुद्धा असा प्रकार होऊ लागला. 'शारदावस्थेत' असताना उत्तरेने ज्ञानेश्वरीतील काही ओव्या म्हटल्याचे बहिणीने सांगितले आहे व 'त्या अवस्थेत शारदेने लिहिलेले मराठी उच्चप्रतीचे-metaphysical लिखाण होते' असे तिच्या वडिलांनी म्हटले आहे. खुद्द उत्तरेच्या सांगण्याप्रमाणे १९७४ च्या जून-जुलैत तिला असे जाणवू लागले की 'यदृच्छया, subconscious मध्ये देवी दुर्गेचे स्तवन चालू असते' मजजवळ असलेल्या कागदांपैकी काही कागदांवर मराठी व बंगाली या दोन्ही लिप्यात लिहिलेले आहे. उदा. चिदानंद वायुरूप लहरी माझ्या प्राणरंध्रातून मनःचेतन प्रांगणात प्रकाश स्रवतात तेव्हा...तो निरामय... स्वानुभव' आणि जे ज्ञानमय आभासलहर आमार प्राणमय कुहरे आछे .. हृदयाकाशे भावसंचार करिया भा...'

उत्तरेच्या ठिकाणी शारदा प्रकट होणे व तिने उत्तरेचा तावा घेणे हा प्रकार 'संचार' (possession or spirit invasion) या सदरात पडणारा आहे की, 'शारदा' हा उत्तरेच्या पूर्वजन्मांपैकी एक असावा ? काही जणांना असे वाटण्याचा संभव आहे की, सर्पदंशाने मूर्छित झालेल्या शारदेस खरोखरच मृत्यू येण्यापूर्वीच तिचा देह गंगेत टाकण्यात आला असेल व तेथे तिचा योनिपालट झाला असेल, ती त्या योनीत अस्तित्वात असेल व उत्तरेत तिचा संचार होत असेल; परंतु हा संचाराचा प्रकार नसावा. पुढील गोष्टी भूतयोनिसूचक संचाराचे निकष स्वीकारावेत असे मला वाटते. १) संचार अवस्थेत व्यक्तीच्या तोंडून बोलणाऱ्या तथाकथित मृतात्म्याचे वाक्यप्रयोग भूतकाळवाची असावयास हवेत. २) माझी अमुक इच्छा अतृप्त राहिली व अमुक अमुक करा म्हणजे माझे समाधान होईल अशा, म्हणजे 'मागणी' चा सूर, त्या बोलण्यात असायला हवा. ३) झपाटले जाणे अथवा संचार या प्रकारात अल्पकालिकता असते.

पहिले दोन निकष शारदेच्या बाबतीत निश्चितच लागू पडत नाहीत. शारदेचे बोलणे मी अमुक होते, अमुक काळात व अमुक ठिकाणी होऊन गेले, या स्वरूपाचे

नाही. तुझे पती कोण होते ? हा प्रश्न विचारला असता "होते ? आहेत," असे ती म्हणाली व तुझे पती आता हयात नाहीत असे प्रो. रॉयनी म्हटल्यावर ती रडू लागली. गेल्या शतकाच्या पूर्वार्धातील बगाल, कपनी सरकारचा अमल, लढाया वगैरे अद्यापि चालूच असल्याप्रमाणे शारदेचे बोलणे आहे.

स्वत च्या अमुक इच्छा अपुऱ्या राहिल्या, मला मुक्ती अमुक अमुक केले की मिळेल अशा आशयाचेही शारदेचे बोलणे नाही.

तिसऱ्या निकषाच्या सदर्भात बोलण्यापूर्वी एका गोष्टीचा उल्लेख करावासा वाटतो. पुणे येथील शारदावस्था सपल्यानतर मी उत्तरेस एका योगस्थ अधिकारी गृहस्थाकडे नेले होते त्यानी तिला त्याच्या तळघरातील ध्यानाच्या जागी जाऊन बसण्यास व बसवेल तितका वेळ बसण्यास सागितले. तेथे ती गेल्यावर ते म्हणाले : 'जर हा सचाराचा प्रकार असेल तर ती त्या जागेत क्षणभरही बसू शकणार नाही.' परतु उत्तरा तेथे १५-२० मिनिटे बसली. त्या वेळी एका ध्यानस्थ पुरुषाचा सागाडा, शिवलिंग, तलाव, पायऱ्या विशिष्ट आकाराचा तागा वगैरे गोष्टी तिच्या दृष्टीसमोर तरळल्या. तेथून ती बाहेर माडीवर येऊन बसली त्या वेळी, 'कोथाय आशो हस उठे करून आगमन' असे काही शब्द तिच्या मनात येऊ लागले. त्यानंतर तीनएक तासानी मी उत्तरेसमोर दोन दिवसापूर्वी 'शारदेने' काढलेल्या घराचे फक्त रेखाचित्र ठेवले शारदावस्थेत काढलेले ते चित्र असल्याचे सागितले नाही त्या वेळी तिच्या मनात पुढील बगाली शब्द आल्याचे तिने सागितले. कुलभूमी, हाफानी, प्रजोगबाडा, बोई, कैवत, सिमबधुरा इत्यादी.

आता तिसरा म्हणजे अल्पकालिकतेचा निकष तोही लागू पडत नाही, असे मला वाटते. 'शारदेत' उत्तरेला विस्थापित करून तिचा सपूर्णपणे तावा जरी मधूनमधून—साधारणतः अष्टमीस घेतला आहे, ही गोष्ट खरी. तथापि मला वाटते की, शारदा हा उत्तरेच्या व्यक्तित्वातील खोलवरचा एक स्तर असावा, पूर्वी होऊन गेलेल्या शारदेचे सस्कारशेष व प्रवृत्तिशेष व्यक्तित्व उत्तरेमध्ये प्रथमपासूनच असावे, व त्या अर्थाने ही केस परामानसशास्त्रीय स्वरूपाचे दुहेरी व्यक्तित्व या सदरात पडेल. उत्तरेने सागितलेले तिचे काही अनुभव—काही स्वप्नरूप व काही जागृतावस्थेतील हे याचे कारण होय.

## शारदा—उत्तरा-संबंध

उत्तरेच्या मातुश्रीनी सागितलेला एक अनुभव असा की, ती पाच-सहा वर्षांची होती त्या वेळी मशानकराच्या दरवाज्याजवळ असलेल्या एका चित्राकडे बोट दाखवून म्हणे, 'तो माझा नवरा आहे व मला बोलावतो आहे' अर्थात, कल्पनासृष्टीत वावरण्याच्या वयातील ह्या बोलण्याला तसे महत्त्व देता येणार नाही; परंतु खुद्द उत्तरेने कळवलेले काही अनुभव असे :

१) पाच-सहा वर्षांची असताना तिला वारवार स्वप्नामध्ये 'एक उच, किडकिडीत, बिनचष्म्याचा माणूस दिसे व तिच्या नाभीस स्पर्श करून 'ये' असे म्हणे.'

२) आठव्या—नवव्या वर्षी, शिरसी येथे दत्तक आजीच्या घरी असताना, 'घोड्यावर बसलेला एक माणूस मला दिसतो' असे ती पुष्कळ वेळा सागत असे. एका पडक्या घरात आपण काही शोधतो आहोत असेही तिला स्वप्न पडायचे.

(३) बारा तेराव्या वर्षी तिला एक स्वप्न वारवार पडे व ते ती वडिलाना सागत असे : 'एक नदी, जवळ शकराचे मदिर व त्यामध्ये पिंडी. पिंडीवर डोके टेकले की पाठीतून सर्प वरवर येई व तो मानेपाशी चावेल अशी भीती वाटे.' वयाच्या २८ व्या वर्षी तिला स्वप्नात एक शिवमंदिर व त्याच्या दाराजवळच्या पडक्या भिंती दिसत.

(४) १९६५ मध्ये नियमितपणे ध्यानास बसू लागल्यापासून, 'स्वप्नात (व) कधीकधी ध्यानात, मी एका पुरुषव्यक्तीस बघत असे. ती व्यक्ती उच व सडपातळ. रंग गोरा भरार, तलम. तो शारदेचा पती असावा' असे तिला वाटते.

(५) जागृतअवस्थेमध्ये उत्तरेस असे कधीकधी जाणवले आहे की,'Subconscious मध्ये दुर्गेचे स्तवन चालू आहे.'

शारदाजीवनाचे स्मृतिसस्कार उत्तरेच्या अबोध मन प्रदेशात असावेतच असे आणखी एका कारणास्तव वाटते. वडोदा येथे उत्तरेस (फेब्रु. ७६) स्वप्नात दिसलेल्या घराचे जे रेखाचित्र तिने पाठवले, ते आणि पुणे येथे 'शारदेने' काढून दिलेले तिच्या शिवपूरच्या घराचे रेखाचित्र एकसारखेच आहे. शिवाय ते स्वप्नही विचार करावयास लावणारे आहे.

'तुळसी वृंदावन. ओसरीवर बायका बसलेल्या. तिथून मी निघते ती 'त्या' घरी पोहचले. मला पाहून काळी गाय हबरते, दावे तोडते, घोडा फुरफुरतो. मी थेट देवघरावळ जाते अलमारीवर दुर्गेचा चादीचा मुखवटा. मागले कपाट दिसत नाही, पण तिथे ते आहे. ज्याना शोधतेय ते सापडत नाहीत. या वेळी आन्हिक करून असायला हवे होते. मग एक कंबरपोट मोठे असलेली बाई दिसते. ती आरशात पाहून बदामाच्या आकाराची पिंजर लावते. मी तर झोपलेली हे भान व मीच इथे कशी हेही भान. ती स्त्री शेंदूर/कुकू डाव्या बागडीस लावीत लावीत भागात भरते व कुंकवाचे हात देवघराच्या उवरठ्याला आतल्या बाजूने पुसते.'

वडोदा येथे एका योगस्थ गृहस्थानी उत्तरेस भुवयामध्ये विभूती लावली त्या वेळी तिला तसेच घर दिसले. शिवाय पुढीलप्रमाणे दृश्य दिसले. 'तुलसीवृदावन, पाढऱ्या कपड्यातील प्रेत. त्यामागे बरीच जण. पुढे वद्ध दाढीचा पुरुष. त्याच्या हातात काही तरी. प्रेत पायऱ्या उतरून नदीकडे जात होते.' (शारदेस मावशीच्या बागेत (सप्तग्रामी) सर्पदश झाल्याचे ती सागे, हे लक्षात घेण्यासारखे आहे.)

१९७६ त ध्यानास बसली असताना उत्तरेला, अनेक वेळा, पुढील दृश्य दिसल्याचे तिने कळवले : 'शिवमदिर, माणसाची गर्दी. शभो, हे भूतनाथ, असे सामुदायिक उच्चारण. मी आणि उजवीकडे कोशाचे वस्त्र परिधान केलेली पुरुषव्यक्ती दोघे मिळून पूजा. मी उभी राहते व त्याच्या डाव्या माडीवर डावा पाय ठेवते, मग उजवीकडे जाते व त्याच्या उजव्या माडीवर उजवा पाय ठेवते पिंडीवरील सर्प उजव्या बोटाला चावतो. व्याकुळ होऊन त्या पुरुषाच्या माडीवर डोके टेकते. अर्धवट गुगीत पालखीतून घरी येते.

साराश, शारदाजीवनाच्या स्मृती तसेच प्रवृत्ती उत्तरेमध्ये अबोधस्तरावर असल्याचे मानले, तर 'शारदा' ही उत्तरेशी पूर्वजन्मसबंधाने निगडित आहे असे समजण्यास वाव आहे.

## अखेरचा प्रश्न

उत्तरेला शारदेच्या जीवनातील प्रसग व घटना स्मृतीच्या रूपात का जाणवल्या नाहीत ? अबोधपातळीवर अस्तित्वात असलेल्या स्मृती व प्रवृत्ती याची

गुंफण होऊन त्यातून सुसंगत असे शारदेचे व्यक्तित्व का निर्माण झाले असेल ? आणि उत्तरा ही मधूनमधून स्वतःच शारदा का बनू लागली असेल ?

मला असे वाटते की–

उत्तरा आत्मिक साधनेचा मार्ग आक्रमीत होती तरी यौवनातील भावभावनांच्या व आशाआकांक्षांच्या संबंधात, तिच्या वाटयाला आलेल्या वेदना पचवून आयुष्याच्या एका मार्गापासून ती निवृत्त झाली. दुसरा मार्ग पत्करण्याचा तिने निश्चय केला होता व त्या दिशेने पाऊलही टाकले होते; परंतु त्या दिशेने प्रवास करण्याविषयीची स्वतःची कल्पना वास्तवात उतरणे कठीण आहे हे तिच्या ध्यानात आल्यामुळे तोही मार्ग बंद होऊ लागला. अशा परिस्थितीत 'पुढे पुढे जाऊ पहाणारे तिच्या मनाचे पाणी' मागे मागे फिरले असले पाहिजे. निराळ्या मार्गाने वाहण्याची मानसिक गरज ( need ) निर्माण झाली असली पाहिजे. तो मार्ग शारदेने उपलब्ध करून दिला.

अबोध अशा अंतरंगातील ज्या स्मृती व प्रवृत्तींची गुंफण होऊन 'शारदा' हे व्यक्तित्त्व संगठित झाले व त्या स्मृती व प्रवृत्ती उद्‌बुद्ध होण्यास–सजीव होण्यास– शरच्चंद्र चट्टोपाध्यायांच्या वाङमयाशी तल्लीनता, तसेच आध्यात्मिक साधना या दोन्ही गोष्टी अनुकूल ठरल्या असाव्यात. या आशयाचेच मत नागपूर टाइम्समध्ये ( १२–९–१९७० ) मी प्रसिद्ध केले आहे. शारदा हे व्यक्तित्व उफाळून येण्यास उत्तरेने घेतलेली होमिओपाथिक औषधेही अनुकूल ठरली असतील काय ; Stram, Cann-i, Alum, Cann-s ही औषधे आणि परकी भाषा तसेच परकीय प्रदेशांविषयी बोलू लागणे, एकदम अवस्थांतर होणे, यांचा संबंध असतो. यापैकी काही औषधे उत्तरेने घेतली होती का ते समजण्यास मार्ग नाही. □


**ऋणनिर्देश**

या संशोधनात खुद्द उत्तरा, तिचे वडील व बहीण व अमदाबादचे मामा, डॉ. आर. के. सिन्हा व डॉ. सुमती खरे ( नागपूर ) एन्. बी. मराठे ( कलकत्ता ) श्री. एस. वी. जोशी ( नॅशनल लायब्ररी, कलकत्ता ) डॉ. सौ. राजलक्ष्मी भट्टाचार्य ( पुणे ), डॉ. सी. वी. देसाई ( बेडकिहाळ ) व इतर अनेकांचे विविध प्रकारे मला साहाय्य लाभले. त्या सर्वांचा मी ऋणी आहे. वाचकांना रसप्रद वाटेल अशा स्वरूपात हा संशोधनवृत्तांत मजकडून तयार करवून घेतल्याबद्दल 'माणूस'चेही आभार ? □



**टीप**-ह्या संशोधनअहवालातील कोणत्याही भागाचा, कोणत्याही तऱ्हेने उपयोग ( चित्रपट, नाटक, कथा, वगैरे ) करण्यापूर्वी प्रा. व. वि. अकोलकर ( स्वरमाला, कर्वेरोड, पुणे– ४ ) यांची लेखी परवानगी आवश्यक आहे. □





# ज्ञानातून स्वातंत्र्याकडे जाणारी शिक्षणपद्धती

( ६ )

प्रा. स. शि. आवे

**न**कार, भिन्नता, तपासणी–ही व्यक्तिस्वातंत्र्याची मूल्ये अमेरिकन समाजाने शिरोधार्य मानली आहेत.

या मूल्यांच्या आधाराने आणि या मूल्यांच्या पोषणासाठी, त्यांनी आपल्या शिक्षणपद्धतीचे रूप ठरविलेले आहे.

– माहिती, अधिक माहिती, अधिकाची अधिक माहिती,

– विश्लेषण, अधिक विश्लेषण, अधिकाचे अधिक विश्लेषण.

– स्वतंत्रता, विविधता, लवचिकपणा.

या शिक्षणव्यवस्थेत सहभागी होऊन आल्यानंतर आलेली ही जाणीव आहे. 'अध्यापनासाठी या' असे निमंत्रण आले त्या वेळी अशी सुस्पष्ट जाणीव नव्हती. त्या वेळी काहीसे आश्चर्य वाटले होते.

हे आश्चर्य प्रत्यक्ष निमंत्रणाचे कमी होते. अध्यापनासाठी सुचविलेल्या विषयाचे जास्त होते.

पुणे विद्यापीठ आणि मध्यअमेरिकेतील काही प्रमुख कॉलेजे (Associated Colleges of the Midwest – – ACM) यांच्या सहकार्याने चालू असलेल्या एका शैक्षणिक उपक्रमात गेली दहा वर्षे मी अध्यापक म्हणून सहभागी आहे. या उपक्रमामध्ये, दरवर्षी पंधरा ते वीस अमेरिकन विद्यार्थी–विद्यार्थिनी मराठी भाषा आणि संस्कृती यांचे अध्ययन करतात. 'सर्टिफिकेट कोर्स ऑफ महाराष्ट्र–लँग्वेज ॲण्ड कल्चर' असा हा तीन महिन्यांच्या तीन सत्रांचा अभ्यासक्रम आहे. तीन महिने अमेरिकेत. सहा महिने महाराष्ट्रात-पुण्यात. या अभ्यासक्रमात अमेरिकन आणि मराठी प्राध्यापकांची अदलाबदल होत असते. डॉ. व. मं. सिरसीकर, डॉ. सु. न. तवले, श्री. पाटणकर, प्रा. देशपांडे असे या उपक्रमात निमंत्रित म्हणून गेले होते. यंदा मला निमंत्रण आले होते.

या उपक्रमात मी अमेरिकन मुलांना 'मराठी साहित्य' हा विषय शिकवीत असे आणि दहा वर्षांत प्रत्येक वर्षी मुलांना माझा

कुतूहलाचा प्रश्न विचारीत असे · 'स्वत.चा, स्वत.च्या आईवडिलाचा पैसा खर्च करून तुम्ही इतक्या अतरावर आमची भाषा, आमची सस्कृती शिकण्यासाठी का येता ? यात तुमचा फायदा काय ?' मला हे कुतूहल मनापासून जाणवत असे. आपल्याकडील एस. वाय.–टी. वाय· च्या पातळीची, त्या किंवा लहान वयाची ही मुले आपल्या घरापासून अकरा–बारा हजार मैल दूर येतात. पुण्यात मध्यमवर्गीय कुटुबात सहा महिने राहतात. इथले वळण शिकतात. वेरूळ, अजिंठा यांसारखी किंवा जेजुरी–पढरपूर यासारखी किंवा गोवा–काश्मीर यांसारखी ठिकाणे पाहून व्यापक भारतीय सस्कृतीची ओळख करून घेतात. तीसाठी नेपाळ–.श्रीलका येथेही काही जातात ... मधूनमधून या मुलाना घरची आठवण येते. इथे फार एकटे वाटते. रात्रीची अवेळी उठून काही जण रडतात सुद्धा... हे सगळे मला, आम्हा साऱ्या सहकाऱ्याना खरोखरी कौतुक वाटते. या मुलाची भारतीय कुटुबेही त्याच्याशी खूप मायेने वागतात हे सारे मला समजत आले आहे, त्याचे महत्त्व मनाशी पटलेले आहे. मी स्वत. यात पूर्णपणे सहभागी आहे. तरी हा प्रश्न मी प्रत्येक वर्षी विचारत आलो. आरण या मुलाच्या मनात काय आहे याचे कुतूहल मनात होते.

'तेच ते पुन्हा शिकण्यापेक्षा काही नवीन पाहावे, समजून घ्यावे असे वाटले.'– असे त्याचे उत्तर असायचे.

'काय नवीन बघाव अस वाटल ?' मी खोदून विचारत असे.

'काय अस काही नाही· काही तरी अपरिचित, नवीन याचेच आकर्षण आम्हाला वाटले साहस करावे असे वाटले.' असा त्यांचा खुलासा असे.

– साहस, बौद्धिक साहस, हा ज्ञानसपादनाचा प्रारभ आहे आणि ही अमेरिकनांची साधारण वृत्ती आहे. त्याच्या स्वतत्र, खेळाडू प्रवृत्तीशी सुसगत अशीच ही साहसवृत्ती आहे

तरीही, 'साहित्य व सस्कृती' यांशी सबंधित असा एखादा विषय निवडून आपण तो आमचेकडे शिकवावा, असे प्रत्यक्ष निमंत्रण आले तेव्हा आश्चर्य वाटलेच. 'भारतीय साहित्य आणि हिंदू धर्मपरंपरा' असा विषय मी कळविला. तो मान्य झाल्याचे पत्र आले. माझे आश्चर्य वाढलेच !

अमेरिकेतील उत्तरसीमेवरील मिनेसोटा हे राज्य उत्तरेस कॅनडा. पूर्वेस लेक सुपीरियर व विस्कॉन्सिन राज्य मिनेसोटा राज्याची राजधानी मिनेआपोलिस. वस्तीने पुण्याहून सव्वापट. या राजधानीपासून चाळीस मैल अतरावरचे नॉर्थफील्ड हे खेडे त्यातील कार्लटन हे कॉलेज. त्यातील समाजशास्त्र-विभाग. त्यातील दक्षिण आशियाकक्ष आणि दक्षिण – आशिया – अभ्यासा 'तील अभ्यासक्रम क्र १५ म्हणजे माझा हा वैकल्पिक अभ्यासक्रम.

या कॉलेजने असा अभ्यासक्रम का निवडावा ? विद्यार्थ्यांनी तो का निवडावा ? शिवाय हा अभ्यासक्रम केवळ ACM विद्यार्थ्यांसाठीच नव्हता. तो कॉलेजच्या सर्व विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध होता.कार्लटनला पोचल्या-.नतर असे कळले की, हा अभ्यासक्रम १५ विद्यार्थ्यांसाठी मर्यादित ठेवला होता. प्रत्यक्षात २५–३० विद्यार्थ्यांनी मागणी केली आणि तडजोड म्हणून अखेर २० विद्यार्थ्यांना हा विषय मिळाला होता. 'भारतीय साहित्य आणि हिंदुधर्मपरपरा' या विषयाची जिज्ञासा २०–२५ जणाना असावी याचे आश्चर्य वाटले.

जसजसा येथील शिक्षणपद्धतीचा परिचय झाला तसतसे हे आश्चर्य ओसरले

¤

येथे विद्यार्थ्यांना अमुक एक विषय वर्ज्य अशी गोष्ट नाही. तुम्ही अमुक विद्याशाखेत शिकता, मग तुम्हाला एवढेच विषय घेता येतील असे कृत्रिम बंधन नाही. एकूण चार वर्षांत, प्रत्येकी ६ क्रेडिट्सचे कोणतेही चोवीस अभ्यासक्रम घ्या आणि पदवीधर व्हा. यात अमुक एक विषय प्रधान-मेजर-म्हणून घ्यायचा असेल तर त्या विषयाचे अमुक इतके जास्त अभ्यासक्रम घ्या; पण कोणताही अभ्यासक्रम वर्ज्य नाही. माझ्या अभ्यासक्रमासाठी वाङमय, नाट्य, सगीत, क्रीडा असे विषय मेजर म्हणून घेतलेले विद्यार्थी होते. तसेच, भौतिकी, रसायन, वनस्पतिशास्त्र, भूशास्त्र अशा मेजरचेही होते.

मी त्याना त्याची प्रेरणा विचारली. 'शुद्ध जिज्ञासा' हे उत्तर मिळाले. ते अनपेक्षित नव्हते तरीही, याचा व्यावहारिक फायदा काय, असा प्रश्न मी विचारलाच. त्यावर जे उत्तर आले त्यात त्याची दृष्टी प्रकट झाली. ते म्हणाले, 'आपल्याला एकूण आयुष्यात कोणते ज्ञान केव्हा आणि नेमके कसे उपयोगी पडेल ते आताच कसे सागता येईल ? पण विविध शाखाचे ज्ञान हे कोणत्या ना कोणत्या पद्धतीने निश्चित उपयोगी पडेल यात मात्र शका वाटत नाही. शिवाय ज्ञानाच्या विविधतेने आमची मने सपन्न होतील. आम्हाला व्यक्तिमत्त्व प्राप्त होईल.'

व्यक्तिमत्त्व ही प्राप्त करून घेण्याची चीज आहे आणि त्यासाठी शिक्षण हवे, हा उदारमतवादी तत्त्वविचार आहे. एकोणिसाव्या शतकातल्या इग्लंडमधील हे उदारमतवादी तत्त्व अमेरिकन उच्च शिक्षणात आजही आहे

¤

हा वारसा जसा इग्लडचा आहे, तसा प्रॉटेस्टंट आणि प्यूरिटन या धर्ममताचाही आहे. यापैकी 'कॉंग्रिगेशनिस्ट' पथाच्या अनुयायानी गेल्या शतकात ठिकठिकाणी शाळा, कॉलेजे. विद्यापीठे उभारली. येल, डार्टमथ, ॲम्हर्स्ट ग्रिनेल ही यापैकी काही. आज देशभर आणि काही जगभर प्रसिद्ध असलेली.

यापैकी कार्लटन हे १८६६ चे. नॉर्थफील्ड गावचे. पहिली काही वर्षे हे नॉर्थफील्ड कॉलेज होते. पाच वर्षानी एका कार्लटन साहेबाने त्या काळचे ५०.००० डॉलर देणगी दिली आणि हे कार्लटन कॉलेज झाले. ११८ वर्षांच्या परपरेनतर आज हे कॉलेज मिनेसोटा राज्यातील पहिल्या क्रमाकाचे आणि देशातील पहिल्या दर्जाच्या निवडक कॉलेजातील एक म्हणून ओळखले जाते. मिनेसोटा राज्यात शाळातून मुलाना सागितले जाते 'a Carleton degree is pure gold.'

इग्रजी प्रॉटेस्टट आणि जर्मन प्यूरिटन वृत्तीचा सगम या कॉलेजात आणि मिनेसोटा राज्यातील सेंट ओलाफ, मॅकॅलेस्टर, UM (मिनेसोटा विद्यापीठ) अशा इतर सस्थात झाला आहे ब्रिटिश उदारमतवाद आणि जर्मन करडी शिस्त. मिनेसोटा राज्यात बव्हशी वस्ती नॉर्वे-स्वीडन-डेंमार्क यातून आलेल्या वसाहतकाराची आहे, हे याचे कारण असावे. या वसाहतकाराच्या सध्याच्या पिढीला फक्त इंग्रजी भाषा येते, पण त्याच्या आईवडिलाच्या दोन भाषा आहेत. बाहेर इग्रजी आणि घरात स्वीडिश वगैरे आजी-

आजोबाना एकच भाषा येते. मूळ देशातली. या वसाहतकाराचा मूळ कडवेपणा आजही कायम आहे.

कार्लटनला मिळालेले आणखी एक योगायोगाचे भाग्य म्हणजे प्रदीर्घ काळचे नेतृत्व. १९०९ ते १९६२ या त्रेपन्न वर्षांत या कॉलेजचे फक्त दोन प्रेसिडेंट झाले श्री. कार्डलिंग व श्री. गोल्ड. या दोघाची शासनपद्धती इतकी सारखी होती की या त्रेपन्न वर्षांत कार्लटनला 'एकच राजवट' होती, असे म्हटले जाते. 'उत्तम शिक्षक असतील तरच उत्तम विद्यार्थी येतील आणि उत्तम विद्यार्थी असतील तरच उत्तम शिक्षक येतील आणि यासाठी उत्तम शिक्षक व उत्तम विद्यार्थी याना टिकून राहावेसे वाटेल असे कॉलेजचे वातावरण आणि शासन हवे.' अशी या दोघाची विचारसरणी होती आणि त्या दृष्टीने शिक्षक व विद्यार्थी याना १९५० पासूनच कॉलेजच्या शासनात सहभागी करून घेण्यात आले आहे.

¤

या स्वातंत्र्याचा स्वीकार येथील विद्यार्थ्यांनी गभीरपणाने आणि जबाबदारीच्या भावनेने केला आहे. सक्तीच्या लष्करी सेवेविरुद्ध १९६९ साली अमेरिकन विद्यार्थ्यांत जी आंदोलने झाली, त्यात येथील विद्यार्थ्यांचेही आदोलन होते इतकेच काय, विद्यार्थी–विद्यार्थिनीसाठी एकच डॉर्मिटरी–वसतिगृह–हा हक्क १९७० साली विद्यार्थ्यांनी झगडूनच मिळवला आहे. या प्रकरणी सप झाला, मोर्चे निघाले, घोषणा दिल्या गेल्या, कॉलेजचे रस्तेही रगले; पण कॉलेजच्या इमारतीवर एकही दगड आला नाही की खिडकीची एकही काच फुटली नाही घोषणात अश्लील-बीभत्स घोषणा नव्हत्या... आणि आंदोलनानंतर कॉलेजचे रस्ते विद्यार्थ्यांनी स्वतः धुऊन दिले !

आज कार्लटन कॉलेजात चार-पाच नियतकालिके छापून प्रसिद्ध होतात त्यातील एक प्रशासनाचे, एक शिक्षकाचे तर तीन विद्यार्थ्यांची आहेत. विद्यार्थी शिक्षकाच्या प्रश्नाची चर्चा करतात. शिक्षक विद्यार्थ्यांच्या वर्तनाची चिकित्सा करतात. दोघे मिळून प्रशासनाची कठोर चिकित्सा करतात... आणि आश्चर्य म्हणजे ही विविध छाननी व्यावसायिक (professional) पातळीवर आणि सभ्यतेच्या मर्यादेत चालते छाननीला मात्र कसलेही बधन नसते एकमेकाचे अगदी वाभाडे निघतात जसे गभीरपणाने, तसे विनोदाने किंवा जहरी उपहासाने; पण कॉलेजच्या हिताची दिशा आणि विशेष म्हणजे 'कार्लटन' च्या उच्च बौद्धिक पातळीची जाणीव यांचा विचार कधीही सुटत नाही.

मी तिथे असताना चाललेला एक गमतीदार वाद आठवतो :

एका विभागाला अशी गरज वाटली की, आपल्या विभागाचे काम एकदा तिऱ्हाईत नजरेने तपासले जावे. तपासणीसाठी एक नि:पक्षपाती समिती नेमली जावी अशी विनती या विभागातील सर्व शिक्षकानी मिळून कॉलेजच्या शिक्षक–मडळाकडे केली मंडळाने तीन सदस्याची समिती नेमली या समितीने मनापासून काम केले. त्या विभागाचे अभ्यासक्रम–निकाल–गुणपत्रके–शिक्षकाची टिपणे असे सारे कागदपत्र तपासले. सर्व शिक्षक, सर्व विद्यार्थी याच्या खाजगी मुलाखती घेतल्या आणि तीन महिन्यानी आपला वृत्तान्त शिक्षणमडळाला, त्या विभागाला आणि विद्यार्थ्यांना सादर केला

आणि तीन–चार बाजूचे युद्धच जुपले !

विभाग स्थिरावला आहे (stagnated), शिक्षकाची अध्यापनपद्धती जुनाट, कटाळवाणी झाली आहे असे काही तपाससमितीचे निष्कर्ष होते आणि त्यावर खडाजगी माजली होती. समितीच्या एका निष्कर्षावर तर रणकंदनच झाले. तो निष्कर्ष असा होता. प्रस्तुत विभागात बहुतेक शिक्षक या स्त्रिया असल्याने विभागात तुलनात्मक अहकाराची व्यथा तीव्रतेने बळावलेली आहे यावर शिक्षणमंडळात गभीर विचार करावा. या आक्षेपाविरुद्ध मात्र साऱ्या शिक्षिका एक झाल्या होत्या.

हा सारा वाद नियतकालिकात, छापील रूपात आणि खाऊ की गिळू अशा तीव्रतेने चालू होता; पण युद्धभूमीखेरीज इतरत्र सारे व्यवहार सलोख्याने चालू होते. वादी–प्रतिवादी कँटीनमध्ये हसत-खेळत एकत्र चहा घेत होते आणखी एक पथ्य होते. बाहेरच्या वृत्तपत्राचे प्रतिनिधी आले तेव्हा त्यांना सागण्यात आले, 'आमचा वाद उघड आहे. आम्ही तो छापतोच आहो त्यावर कॉलेजात विद्यार्थी गटागटात चर्चा करीत आहेतच; पण ही वाब खाजगी आहे. तुम्ही कृपया ती जाहीर करू नका' विशेष म्हणजे त्या पत्रप्रतिनिधीनीही ही विनती मानली. या वादावर जाहीर कुठे काही लिहून आले नाही.

¤

उदारमतवादी खुलेपणा आणि कडवी शिस्त याचा हा मिलाफ कार्लटन कॉलेजच्या दिनक्रमात चोवीस तास दिसत असतो, जाणवत असतो

नॉर्थफील्ड हे दहा हजार वस्तीचे छोटे गाव कॅनॉननदीने दुभागलेले. दोन्ही तीरावर चढत गेलेल्या टेकड्या पश्चिमेच्या टेकडीवर सेंट ओलाफ कॉलेज. पूर्वेच्या टेकडीवर कार्लटन कॉलेजात विद्यार्थी पाच–पाच हजार. गावापेक्षा विद्यार्थ्यांचीच सख्या जास्त. सागली–मिरजेदरम्यान विश्रामबागेला आहे तशी स्थिती

कार्लटनच्या मुख्य टेकडीच्या जवळ आणखी दोन टेकड्या. वर गवताळ पठार. टेकड्यावर एल्म वृक्ष. मधून वाहणारा एक नदर. तो कॅनॉननदीला जाऊन मिळेपर्यंत कॉलेजच्या परिसरात दोन सरोवरे आणि एक छोटासा धबधबा तळ्याच्या पाळीला मोठे क्रीडागण कॅनॉननदीच्या काठाला अत्याधुनिक स्टेडियम. दोन टेकड्यावर कॉलेजच्या वीसएक इमारती आणि विद्यार्थ्यांची वसतिगृहे. सारे निर्मळ, नितळ, प्रमाणबद्ध, कलात्मक. (कार्लटन कॉलेजने एक पूर्ण वेळ Landscape artist and decorator नेमलेला आहे.)

या परिसरात युवक आणि युवती आपापल्या उद्योगात गर्क असतात. हिरवळीवर वाचत, खेळत, तलावात पोहत. ग्रथालय चोवीस तास उघडे असते. त्यात वाचत. ज्ञानकोश चाळत. नकाशे पाहत. प्रयोगशाळेत प्रयोग करीत. सगीतशाळेत गात, वाजवत, कॅसेटलायब्ररीत मुद्रित सगीत ऐकत. नृत्यशाळेत नर्तन करीत. दृक्श्राव्यकेंद्रात छोटे–मोठे चित्रपट बघत. विद्यार्थीगृहात चर्चा करीत ... उत्साही, निरोगी, चपळ मुले–मुली.... सतत कोणता ना कोणता उद्योग करीत. व्यायामशाळेत व्यायाम घेत, नाही तर पहाटे–रात्री–दिवसा पळत. कॉलेजच्या भोवतालच्या ग्रामीण रस्त्यावर सायकलवर टहलत. पुस्तके, वह्या, सँडविच व एखादे

सफरचद यानी भरलेली पिशवी खाद्यामागे टाकत ऐटबाज चालत. जीन्स आणि टी-शर्ट असा साधा पण तऱ्हेतऱ्हेच्या रंगाचा पोशाख मिरवत. सतत थुईथुई उडणारे विद्यार्थ्यांचे सप्तरगी कारंजेच जणू ... जणू आधुनिक गुरुकुल. (विश्वास बसणार नाही, पण प्रत्यक्ष प्रमाणाने सागतो एकूणात सिगरेट ओढणाऱ्या मुलामुलींचे प्रमाण अत्यल्प. त्यात प्रत्यक्ष कॉलेजच्या आवारात ओढणारे त्याहून कमी ) या निरोगी उत्साहाचा स्पर्श झाला नाही तरच नवल.

विद्यार्थी स्वतः असे गुतलेले राहतातच, पण त्याना आणखी गुतवण्यासाठी कॉलेजही काही कमी प्रयत्न करीत नाही दर सप्ताही प्रसिद्ध होणारी 'घोषणापत्रिका' पाहिली तर तीत दरदिवशी ४-५ पासून ८-१० पर्यंत कार्यक्रम दिसतील. साहित्यवाचनाचे व चर्चेचे एक-दोन, जुन्या बोलपटाचे अगर मूकपटाचे एक-दोन, गायनवादनाच्या मैफिली एक-दोन, सामाजिक-राजकीय चर्चा एक-दोन, परक्या व नव्या अनुभवकथनाचे एक-दोन, चित्राचे, छायाचित्राचे, जुन्या स्मृतिवस्तूचे एखादे प्रदर्शन, १९४६-१९६३ किंवा दुसऱ्या एखाद्या वर्षातील विशिष्ट वर्गाचा (class of 1946) एखादा मेळावा आणि कॉलेजला पुनर्भेट, आजी विद्यार्थ्यांच्या पालकाची भेट, आजी विद्यार्थ्यांच्या धाकट्या भावडाची खास भेट, मिनिआपोलिस-सेंट पॉल या जुळ्या शहरातील एखाद्या शाळेतून खास कार्लटन बघायला आपल्या शिक्षकांसह आलेला एखादा वर्ग ... असे या उपक्रमाचे आणि कार्यक्रमाचे किती किती प्रकार ... काही कॉलेजने आयोजित केलेले ... काही स्वत विद्यार्थ्यांनी घडवून आणलेले....

विद्यार्थ्यांनी घडविलेल्या कार्यक्रमात मत-स्वातंत्र्याचा त्याचा आग्रह दिसत असे. एक कार्यक्रम आठवतो: मध्य आणि दक्षिण अमेरिकन देशासबधीचे रेगन सरकारचे धोरण येथील बहुसख्य विद्यार्थ्यांना मान्य नाही, तर त्यानी त्या त्या देशांतून आलेल्या निर्वासिताच्या अनुभवकथनाचा कार्यक्रम ठेवला. सोबत, सूचक म्हणून, चार्ली चॅप्लिनच्या 'द ग्रेट डिक्टेटर' हा बोलपट दाखविला आणि अमेरिकन सरकार-त्रस्त निर्वासितांसाठी पैसे-कपडे-वस्तू या रूपात निधी जमा केला. विद्यार्थ्यांच्या क्रांतिकारक धोरणाची परपरा त्यानी चालू ठेवली. यासाठी साऱ्या सुविधा देऊन कॉलेज-चालकानी त्याची उदारमतवादी परपरा चालू ठेवली.

कार्लटन-कॉलेजला आपल्या या शैक्षणिक व्यक्तिमत्त्वाचा मोठा अभिमान आहे. चालकाना, शिक्षकाना, विद्यार्थ्यांना. तेथील कँटीनचालकाला आणि गावातील दुकानदारानाही हा अभिमान आहे कँटीनमध्ये पहिली कॉफी घेत असताना चालकबाई आमच्या टेबलाशी बसल्या. त्यानी आमची चौकशी केली. उठताना त्या म्हणाल्या; 'तुम्ही नशीबवान आहात, तुम्हाला कार्लटनला यायला मिळाले!'

... माझे मन एकदम पस्तीस वर्षे मागे गेले. फर्गसनच्या कँटीनमध्ये दा. गो. देशपांडे मला म्हणाला होता, 'भावे, तू नशीबवान आहेस. तू फर्गसनमध्ये आला आहेस. आज मीही असेच सागत असतो......

¤

कार्लटनचे सविस्तर वर्णन केले ते मनात रुजून राहिलेल्या अनुभवातून; पण कार्लटन हे एकच असे कॉलेज नाही. अशी कॉलेजे इथे देशभर विखुरलेली आहेत. वैद्यक, अभियांत्रिकी, कायदा अशी कॉलेजे आहेतच. त्याच्या जोडीला ही 'लिबरल आर्टस्' कॉलेजे प्रत्येकाची तऱ्हा वेगळी. मूळ सूत्र तेच.

कोलोराडो स्प्रिंग्ज कॉलेजचे उदाहरण या सूत्रावर प्रकाश टाकणारे आहे

या कॉलेजने अमेरिकेतील रूढ सेमेस्टर-पद्धती आठ-एक वर्षांपूर्वी सोडून दिली आणि स्वतःची 'ब्लॉकपद्धती' नव्याने सुरू केली. साडेतीन आठवड्याचा एक ब्लॉक नतर अर्ध्या आठवड्याची सुटी असे सहा-सात-आठ ब्लॉक्स विद्यार्थ्यांनी वर्षात पुरे करायचे. तीन आणि सहा ब्लॉक्सनतर मोठी सुटी. एक विषय आणि एक शिक्षक अशी एकाग्रता विद्यार्थ्यांना प्राप्त व्हावी ही या पद्धतीमागची भूमिका होती.

पण हळूहळू यातील अपुरेपणे आणि अडचणी अनुभवाला येऊ लागल्या ब्लॉकमध्ये बसवण्यासाठी विषयाचे कृत्रिम भाग करावे लागत आहेत असे लक्षात आले. साहित्यशास्त्र, सौंदर्यशास्त्र विशिष्ट तत्त्वज्ञान हे विषय असे एकात्म आहेत की ते सलग शिकवणे आवश्यक आहे हे ध्यानात आले. मग शिक्षकमडळापुढे प्रश्न आला ब्लॉकपद्धतीचा फेरविचार करावा.

बऱ्याच शिक्षकानी फेरविचाराला विरोध केला. त्यामागे त्याच्या त्याच्या भूमिका होत्या शास्त्राच्या आणि गणिताच्या शिक्षकानी तर आव्हानपूर्वक सांगितले की, साहित्यशास्त्र किंवा सौंदर्यशास्त्र याचे ब्लॉक्स कसे पाडता येतात हे आम्ही दाखवतो या-उलट प्रतिआव्हान दिले ते कलाशाखेच्या प्राध्यापकानी ते म्हणाले, 'मॅथमॅटिकल ॲनॅलिसिस' चे ब्लॉक्स पाडता येणार नाहीत हे आम्हीही सिद्ध करून दाखवतो 'सायन्स किंवा ह्यूमॅनिटीज् याचेसाठी ब्लॉक-पद्धती ठेवावी आणि कलातत्त्वज्ञानासाठी सेमेस्टर-पद्धती ठेवावी' अशी सुचवलेली तडजोड या आव्हाना-प्रतिआव्हानात बारगळली

या साऱ्या चर्चेनंतर शिक्षकमडळाने जी सुधारणा मान्य केली ती शिक्षकाना जास्तच स्वातंत्र्य देणारी होती. आपापल्या विषयासाठी कोणती पद्धती उचित व आवश्यक आहे हे ठरविण्याचा अधिकार या सुधारणेने ज्या त्या शिक्षकाकडे देण्यात आला. हे स्वातंत्र्य कसे अमलात आणावे याची कार्य-पद्धतीही शिक्षकमडळाने ठरविली ही कार्य-पद्धती मात्र सर्वांवर बधनकारक होती. कार्यपद्धती अशी होती :- प्रत्येक शिक्षकाने आपापला अभ्यासक्रम लेखी तयार करावा. अध्यापनाचा तपशील तयार करावा यासाठी कोणती पद्धती उचित आहे याविषयी मुद्देसूद निवेदन तयार करावे हे सारे शिक्षक-मडळाकडून मान्य करवून घ्यावे. नतर ते आपल्या विद्यार्थ्यांना दाखवावे. या साऱ्या कार्यक्रमाला आणि परीक्षापद्धतीलाही त्याची मान्यता घ्यावी एवढे सारे झाल्यावर अभ्यासक्रमाची सुरुवात करावी.

स्वातंत्र्यमूल्य ही एक गभीर जबाबदारी आहे हे यातील सूत्र आहे आणि अमेरिकन कॉलेजानी हे सूत्र स्वीकारले आहे. लॉरेन्स विद्यापीठ, मिनेसोटा विद्यापीठ, शिकागो विद्यापीठ अशा ज्या ज्या शिक्षणसंस्था मी पाहिल्या आणि इतर ज्या अनेक सस्थाविषयी माहिती घेतली त्या त्या सर्व शिक्षणसस्थात मला ही commitment to freedom आढळून आली.

हे स्वातंत्र्य शिक्षणाचे, ते घेणाऱ्या विद्या-

र्थ्यांचे आणि ते देणाऱ्या शिक्षकांचे.

याविषयी आपल्याकडे नेहमी एक मुद्दा तक्रारीच्या सुरात मांडला जातो. असे म्हणतात, ' मूल्य म्हणून स्वातंत्र्य ठीक आहे हो आणि अमेरिकेत ते आहे, हेही ठीक आहे. त्यांना ते जमतं. कारण त्यांची तशी तयारी आहे. आपल्याकडे स्वातंत्र्य आणून पाहा. बघा कसे तीन तेरा वाजतात ते ! '

अमेरिकेतला स्वातंत्र्याचा प्रयोग पाहून असे वाटते की, ही तक्रार बरोबर नाही. गेली दोन शतके स्वातंत्र्यमूल्याची उपासना अमेरिकनांनी चुकत-चुकतच केली आहे. आजही चुका होतात, अतिरेक होतात, विकृती होतात, गुन्हे होतात; पण या साऱ्या गोष्टी दुरुस्त करण्याचा प्रयत्न करताना— स्वातंत्र्य हे मूल्यच सोडावे असे मात्र या समाजाला वाटत नाही.

आणि जीवनात जे मूल्य सर्वोच्च, ते शिक्षणपद्धतीत सर्वोच्चच नव्हे, तर अपरिहार्य असावे हे स्वाभाविकच नव्हे तर इष्ट होय. ही स्वाभाविक आणि इष्ट स्वतंत्रता अमेरिकन शिक्षणात आहे.

□

तीन महिन्यांच्या अनुभवानंतर आज हे कसे सहज वाटते आहे; पण कार्लटनला पोचल्याच्या दुसऱ्याच दिवशी डॉ. लँगवर्दीनी जेव्हा मला माझ्या विषयाच्या अभ्यासक्रमाबाबत सुचवले, तेव्हा, नाही म्हटले तरी, मी दचकलो होतो. तो म्हणाला,

' सदाशिव, तुझ्या विषयासाठी उपयोगी पडावी, अशा काही पुस्तकांची प्राथमिक यादी ही मी तयार केली आहे. ग्रंथालयात पाहून तू ही यादी पक्की कर. नंतर एलेनॉर झेलियट आणि जिम फिशर यांच्याशी चर्चा कर. मग तुझ्या पहिल्या सेशनमध्ये विद्यार्थ्यांशी विचारविनिमय कर. मी तेव्हा असेनच... तसेच तुला कसा तास हवा सांग. छोटा, मध्यम की मोठा ?'

' कसा तास म्हणजे काय ?' मी विचारले.

' छोटा म्हणजे सत्तर मिनिटांचा, मध्यम म्हणजे शंभर आणि मोठा म्हणजे दीडशे मिनिटांचा.' त्याने खुलासा केला.

' मी विचार करून उद्या सांगतो ' मी म्हणालो.

□

## पुस्तके

# सुटसुटीत प्रवासवर्णन ' सोनेरी तुरुंगात. . . '

प्रवासवर्णने लिहिणारे लेखक काही कमी नाहीत. त्यातून प्रवास परदेशाचा असेल तर मग त्यातील अनुभव, तेथील प्रेक्षणीय स्थळं वगैरेवर लिहिणं अगदी ' मस्ट ' होऊन बसतं. अशाच एका परदेश-प्रवासावर आधारलेलं ' सोनेरी तुरुंगात सहा आठवडे ' हे डॉ. हे. द. कोपर्डेकर यांचे पुस्तक मंदार प्रकाशनतर्फे नुकतेच प्रसिद्ध झाले आहे.

या पुस्तकात लेखकाने केलेल्या अमेरिका, लंडन व नैरोबी यांच्या प्रवासाचं वर्णन येतं. अशा प्रकारचं वर्णन असलेल्या पुस्तकाला दिलेलं ' सोनेरी तुरुंगात सहा आठवडे ' हे नाव नक्कीच उत्सुकता जागवणारं वाटतं. हे नाव कसं सुचलं याचा संदर्भ लेखकाने सुरुवातीलाच दिला आहे. अमेरिकेत स्थायिक झालेल्या त्याच्या एका मित्राच्या मते अमेरिका हा एक सोनेरी तुरुंगच आहे. लेखकही म्हणतो की, हे काही प्रमाणात खरे आहे. कारण अमेरिका हा मुक्त समाज असल्याने पैसा मिळवण्याच्या बाबतीत, नाती टिकवण्याच्या बाबतीत कसलेच बंधन नाही. हा जो मोकळेपणा अमेरिकेत लाभतो त्यामुळेच तिथे आलेला माणूस त्या मोकळेपणातच गुंतत जातो. त्यातून बाहेर पडणे त्याला शक्य असूनही शक्य होत नाही. या दृष्टीने, हव्या तेवढ्या सुखसोयी देणारा पण त्याचबरोबर आपल्या जाळ्यात अडकवणारा हा देश म्हणजे एक प्रकारे सोनेरी तुरुंगच आहे.

लेखकाच्या प्रवासाचे अमेरिकेतील शहरे, लंडन व नैरोबी असे टप्पे आपोआपच पडलेले आहेत. सर्वात प्रथम अमेरिकेतील वास्तव्याचा भाग येतो. ह्यालाच या पुस्तकात सर्वात जास्त महत्त्व देण्यात आले आहे. अमेरिकेत लेखकाने पाहिलेली वॉशिंग्टन, न्यूयॉर्क, बाल्टिमोर ही शहरे व नायगारा धबधबा यांचा उल्लेख येथे होतो. वॉशिंग्टनचे स्थान अमेरिकेतील इतर शहरांहून खूपच निराळे आहे. कारण लिंकन, केनेडी आणि खुद्द वॉशिंग्टन यांची स्मारके, ऐतिहासिक महत्त्वाच्या इमारती याच ठिकाणी आहेत. बाल्टिमोर तसे वॉशिंग्टनला जवळचे; पण आतापर्यंत उपेक्षितच राहिलेले शहर; पण वाढत्या उद्योगांमुळे आता त्यालाही बरे दिवस आल्याचे, त्याचेही महत्त्व वाढू लाग-लागल्याचे लेखक सांगतो. न्यूयॉर्कमधली पहाण्यासारखी स्थळे म्हणजे यूनोची तसेच फोर्ड फाउंडेशनची इमारत आणि रॉकफेलर सेंटर. अर्थात न्यूयॉर्कमधली प्रेक्षणीय स्थळे बघताना न्यूयॉर्कसारख्या मोठ्या शहराच्या व्यवस्थापनात कोणत्या अडचणी येतात याचा उल्लेख करायलाही लेखक विसरत नाही; पण या साऱ्यांपेक्षा लेखकाने जगप्रसिद्ध नायगाऱ्याचे केलेले वर्णन अधिक चांगले उतरले आहे. नायगाऱ्याची रचना, त्याच्या आजूबाजूचे पॉइंटस्, त्याचे मूळ स्वरूप आणि निरनिराळ्या वेळी निरनिराळ्या ठिकाणांहून दिसणारी त्याची विविध रूपे या साऱ्यांचंच वर्णन अगदी मनापासून लेखकानं केलं आहे. सबंध पुस्तकातला हा सर्वात चांगला उतरलेला भाग म्हणता येईल.

नंतरच्या टप्प्यात लंडनची धावती भेट व नैरोबीचा प्रवास यांचं वर्णन आहे. पहिल्या टप्प्याच्या पार्श्वभूमीवर हे वर्णन काहीसं रुक्ष आहे. लेखक ज्या चर्चासत्रासाठी या दौऱ्यावर गेला होता त्याचाच बहुतांश उल्लेख या भागात आल्यामुळं तसं झालं असावं; पण जाताजाता आफ्रिकेतील उद्योजकता वाढविण्यासाठी प्रयत्न करणाऱ्या केनिया इंडस्ट्रियल इस्टेटस् आणि नॅशनल ख्रिश्चन कौन्सिल ऑफ केनिया ' या संस्थांबद्दलही लेखक माहिती देऊन जातो.

पुस्तकाचा छोटेखानीपणा हा त्याचा सर्वात महत्त्वाचा गुण; पण पानांची संख्या मर्यादित राखल्याने पुस्तक सुटसुटीत झालं असलं तरी ते वाचनीय बनवण्यात लेखकाला फारसं यश आलेलं नाही. लेखक जागतिक बँकेच्या आर्थिक विकास संस्थेच्या अभ्यासक्रमासाठी या दौऱ्यावर गेला असल्याने प्रेक्षणीय स्थळांबरोबरच तेथील चर्चा वगैरेबाबतही पुस्तकात

वरच लिहिल गेल आहे; पण काही अपवाद वगळता बऱ्याचदा या दोन्ही गोष्टीच मिश्रण हे कटाळवाणच वाटत छोटया छोटया गोष्टीचा अनौपचारिकता आणण्यासाठी केलेल्या उपयोगानेही पुस्तकातील अनावश्यक भाग बराच लाबला आहे मुख्य म्हणजे वाचकाला आपल्यावरोबर नेईल अशा ओघवत्या भाषेचा वापर करण्यात लेखक कमी पडला आहे आम्ही अमुक नबरच्या वसने अमुक ठिकाणी गेलो, इतके तिकिट काढले, अशा पद्धतीची वर्णन सतत येत राहिल्याने ती तुटक, तोचतोचपणा असलेली वाटतात आणि म्हणूनच वाचकाला ती खिळवून ठेवू शकत नाहीत

या पुस्तकातल्या श्याम जोशीच्या रेखाचित्राचा मात्र उल्लेख करावा लागेल. सर्वसाधारणत अशा पुस्तकात प्रेक्षणीय स्थळाचे फोटो दिले जातात, पण यात मात्र या फोटोवरून श्याम जोशीनी रेखाटलेल्या रेखाचित्राचा समावेश आहे यामुळे पुस्तकाला एक वेगळेपणा लाभला आहे एवढे नक्की.

–सीमा कुलकर्णी

सोनेरी तुरुगात सहा आठवडे
डॉ हे द. कोपर्डेकर
पृष्ठे १२०, किमत . १८ रु.

# सहेला रे

‘सहेला रे’ हा श्रीमती वासती मुझुमदार याच्या कविताचा सग्रह. या सग्रहात १९५७ ते १९८१ या काळात त्यानी लिहिलेल्या कवितापैकी निवडक कविता समाविष्ट केल्या आहेत.

वासती मुझुमदार याच्या कवितेला विशिष्ट विषय नाही किवा त्यात एखादा सलग, आकारबद्ध अनुभवही व्यक्त झालेला नाही. या कवितामध्ये व्यक्त झालेले अनुभव संवेदनेच्या पातळीवरचे, केवळ संवेदनामय आहेत. त्याचे स्वरूप विलक्षण तरल, थरथरते आणि काहीसे धूसरही आहे. मनातील सवेदना मुख्यत. निसर्गप्रतिमांतून उत्कटपणे शब्दाकित झाल्या आहेत. सूर्य, मेघ, पाऊस, थेंब, झाडे, फुले, पाने, जल, चांदणे याची प्रतिमासृष्टी या सर्व कवितामध्ये आहे. अगदी क्वचित वीजदिव्यातली लवथवती तार त्यात डोकावते. निसर्गाच्या चैतन्यशील प्रतिमासृष्टीतून एक हळवी, खिन्न, उदास सवेदना सतत जाणवत रहाते. ‘काळया ढगाच्या रेशीमस्रावलीतून चद्राची उमलतात असख्य फुले’ असे जरी असले तरी, ‘खोल खोल कळतात चादण्याच्या तीव्र कळा’ ही जाणीव व्यक्त होते ‘पाणी टिप्पूर हासल, झाड निजूनिया गेली, पानदाटीच्या कुशीत सोनकळी मालवली.’ चैतन्य आणि उदासीनता येथे एकमेकांत मिसळून गेली आहे

अतर्मनात जाणवत असलेली सृष्टी शब्दातून व्यक्त होताना जाणवते रंग, रेषा, आकार, नाद व लय याची तीव्र जाण वासतीबाईंना लाभलेली आहे यामुळेच बा. भ. बोरकराच्या कवितेशी या कवितेचे एक आतरिक नाते आहे असे वाटते. मृदु, पारदर्शक शैलीतून या उत्कट सवेदनाकुल आत्मनिष्ठ कविता आहेत.

–विनया खडपेकर

महेला रे
वासती मुझुमदार
‘मौज’ प्रकाशन
पृष्ठे : ८०, मूल्य . रु. १६

# कवाडे कधी उघडतील?

मुक्ता सर्वगोड याचे ‘मिटलेली कवाडे’ हे पुस्तक म्हणजे दलिताच्या जीवनात होणारी चुकीची समाजसेवा, हानिकारक अलिप्तपणा, त्याच्या खऱ्या गरजा, दलितावर झालेले अन्याय, जुलूम याचं स्पष्ट चित्र स्वत च्या अनुभवातूनच समाजापुढे मांडणारी पण अहकाराचा वाराही न स्पर्शिलेली कथा आहे.

विषमतेची चीड असणाऱ्या, जात चोरणाऱ्या किवा त्याआधारे सवलती घेणाऱ्या लोकाची कीव करणाऱ्या, समाजसेवेच बाळकडूच घेऊन आलेल्या निरपेक्ष मुक्ताबाई पुस्तकात अनेक ठिकाणी भेटतात.

लेखनाच्या विषयाला गौणत्व येऊ नये म्हणून स्वत च्या आयुष्याच प्रदर्शन न करता केवळ समाजदर्शन घडावं या हेतूनं अत्यत अलिप्तपणे लिहिलेली मुक्ताबाईची ही आत्मकथा वाचत असताना त्याच्या जीवनाबद्दलही उत्कट उत्सुकता निर्माण होते; पण त्याच्या सामाजिक अनुभवाशिवाय एक ओळही येथे वाचावयास मिळत नाही. त्यामुळे ही आत्मकथा आहे असे म्हणण्यापेक्षा ही अनुभवगाथा आहे असे म्हणणे जास्त बरोबर ठरेल.

स्वातत्र्य मिळाल्यानतर ठिकठिकाणच्या मिरवणुका, भाषणे याचा उल्लेख आहे. भाषणातून त्या वेळी वक्ते म्हणत, ‘आम्ही देशासाठी अस केल, अस करू’ वगैरे वगैरे. गोरगरिबाना मात्र देश स्वतत्र झाला म्हणजे काय ? याचा पत्ताच नव्हता. कारण त्याच्या दैनंदिन यातनात तसूभरही फरक पडला नव्हता मुक्ताबाई मात्र या विरोधाभासाने व फसव्या भाषणानी अतर्मुख झाल्या. त्या वेळी त्यानी केलेल्या भाषणात त्या म्हणतात, ‘स्वातत्र्य मिळाल–मिळाल म्हणतात, पण ते वेशीपर्यंत आलय का मारुतीच्या देवळापर्यंत हे गोरगरिबाना माहीत नाही.

मुक्ताबाई लिहितात, ‘बाटलेल्या ख्रिश्चन महारिणीच्या हातचा चहा सर्वजण प्रेमाने पितात, पण जे महारमाग आपल्या धर्मात इमाने–इतबारे रहातात, गाव मिरवत तीच विठोबाची पताका मिरवतात, सणसूद करतात त्याना हिंदू कोणत्या शहाणपणावर दूर ठेवतात ?’ अस हे निर्भीड आणि परखड व्यक्तिमत्त्व. हरिजन सोसायटीसाठी वणवण भटकणाऱ्या, धडपडणाऱ्या मुक्ताबाईचीही येथेच ओळख होते

गाधीवधानंतर झालेल्या जाळपोळीच्या वेळी व्याकूळ होऊन होऊन मुक्ताबाई आपल्या भाषणात म्हणतात, ‘वेलणकराची मिल, ओगल्याचा कारखाना तुम्ही जाळलात, त्याची चूल लगेच बद होणार आहे काय ? पण तिथे काम करणाऱ्या गोरगरिबाची मुलं रात्री आईपाशी भाकरी मागतील तेव्हा ते कुठे जातील ? हे पेटवणारे धावणार आहेत का त्याना तुकडा वाढायला ? इथे त्या व्याकूळ होतात, तर भरमसाठ पोकळ आश्वासने देणारे पुढारी, शहरी बकाल वस्त्यातून बायकांच्या जिवावर खाऊन वर त्यानाच दारू पिऊन मारहाण करणारे नवरे, असं समाजातलं विदारक दृश्य पाहून त्या उद्विग्न होतात.

दलिताना अनेक रूपानी भेटणारी 'मिटलेली कवाडे' उघडण्यासाठी मुक्ताबाई स्वत तर अविरत झटत आहेतच; परतु या समाजातील स्वार्थी आणि ढोंगी पुढाऱ्यानाही त्या 'ही कवाडे उघडण्यासाठी प्रयत्न करा.' म्हणून बजावून सागत आहेत. तसं नाही केलत तर 'काळ बदलेल आणि ही झोपडपट्टी पेट घेऊन उठेल तुमच्या सतरा पिढयाही मग वर उठू शकणार नाहीत' असा इशाराही त्या देतात.

मुक्ताबाई आशावादीही आहेत. बाबा आमटे, महात्मा फुल्यासारख्या पुण्यपुरुषाच्या सत्कार्यांची उदाहरणे देऊन त्या म्हणतात, 'या सर्वांच्या प्रयत्नानी मिटलेली कवाडे उघडण्यात यश येत आहे आणि म्हणूनच ही मिटलेली कवाडे आता मिटलेली रहाणार नाहीत

पुस्तकात मधून-अधून येणाऱ्या वाक्यातून 'मिटलेली कवाडे' चाकोरीला चटावलेल्या वाचकासमोर सारखी उभी रहातात. मुक्ताबाईना जणू सुचवायचे आहे की, ही कवाडे उघडायची आहेत. त्याच्याकडे बघून नुसत हळहळायच नाही की जाणून-बुजून पाठही फिरवायची नाहीये

प्रस्तावनेत श्री यदुनाथ थत्ते यानीही मुक्ताबाईंचा उल्लेख 'गोड मावशी' असा केला आहे मुक्ताबाईंचे विवेचन कुणाला आवडेल न आवडेल; पण त्याचा अनुभवकथनातील प्राजळपणा निश्चितच मनाला स्पर्श करील, विचाराना चालना देईल असे जे श्री· थत्ते यानी म्हटले आहे ते मात्र पुस्तक वाचताना जाणवते

**—छाया कुलकर्णी**

मिटलेली कवाडे
मुक्ता सर्वगोड
चेतश्री प्रकाशन, अमळनेर
पृष्ठे १६१, मूल्य . २० रुपये.

## आशांचा पाऊस

शोभा भागवत

# आपण क्रूर होतो तेव्हा....

ऑगस्टच्या अखेरीला इंडियन एक्स्प्रेसमध्ये के. निश्चोल नावाच्या एका लेखिकेचा पालकत्वाबद्दलचा लेख आलाय **Reflections on Parenthood** असं या छोटया लेखाचं शीर्षक आहे. लेखिकेचा मुलगा आता कॉलेजमध्ये जाणारा आहे तिला आजवर अस वाटत होत की, आपण मुलाशी कायम छान वागलो त्याचा आणि आपला सवाद कायम होता; पण मुलगा आता त्याच्या लहानपणच्या अनेक आठवणीबद्दल बोलतो तेव्हा लेखिका विचारात पडते. तिला जाणवत आपण मुलावर अन्याय केला. त्याच्याशी कित्येक गोष्टी नीट बोललो नाही, शिस्तीच्या आग्रहापायी त्याला दुखवल, त्याचा अपमान केला.

रोजची गोष्ट मुलाला सकाळी उठवण्याची सुरुवातीला गोडीन उठवल्यावर हळूहळू आवाज कर्कश होत जातो आणि शेवटी पाघरूण ओढून मुलाला बखोटीला धरून उठवाव लागत हा तर आपल्याही घरातला अनुभव. ह्या लेखिकेला आता अस वाटत की, आपण मुलाला लहानपणी एक गजराच घड्याळ द्यायला हव होतं आणि त्यालाच सागायला हव होत तू किती वाजता उठायच ते ठरव आणि गजर झाला की ऊठ ह्यामुळे तो अधिक जबाबदार झाला असता आणि रोजचे समरप्रसगही टळले असते

उठल्यावर आलं शी करणं लेखिकेला ऑफिसला जायची घाई असल्यान त्यान ठराविक वेळी पॉटीवर बसलच पाहिजे ह्या शिस्तीपायी रोजचा आरडाओरडा होता. मुलगा म्हणतो मला कळायचच नाही एरवी इतकी प्रेमळ वागणारी आई अशी क्रूर का होते? का त्या गार पॉटीवर बसायला लावते? त्यापेक्षा चड्डीत शी करण किती सोप होत ! आईला आता वाटतं की, त्या वेळी थोडा वेळ काढून त्याच्याशी गप्पा मारत हा कार्यक्रम उरकला असता तर ते अधिक सुखाच झाल असत

सकाळी ऑफिसला जायची घाई असली की, खरच मुलावर फार ताण येतात. मग दूध पिणं, अभ्यास, अघोळ सगळ्याच गोष्टीसाठी झगडे चालू असतात मुलानी बिनबोभाट या गोष्टी कराव्यात म्हणून आया अनेक युक्त्या करतात. दुधात मुलाचा आवडता रग, स्वाद घालण, अघोळीसाठी काही तरी बक्षीस कबूल करणं हे झाले गोडीचे प्रकार नाही तर मग धाकदपटशा, धमक्या तेही पुरल नाही तर मग धपाटा ! आपापल्या परीन आपण मार्ग शोधत असतो आणि कुठलाच मार्ग जमत नाही म्हटल्यावर क्रूर होतो. याला उपाय, आपलही डोकं तापवायच नाही म्हणून काही पालक मुलाच्या अघोळीची वेळ सध्याकाळ हीच ठरवतात; पण तिथेही अघोळ म्हणजे सकाळीच हा आपल्यावरचा सस्कार आड येतोच या सगळ्या ओढाताणीत मूल लवकर आवरत नाही म्हणून त्याला दोष देण्यापेक्षा आपली गरज पुन्हा पुन्हा सांगण, मला उशीर होईल, याच महत्त्व पटवून देण जरुरीच असत. आपल डोकं शात ठेवल की, अर्धे प्रश्न सुटतात; पण ह्या गोष्टी वेळेवर व्हाव्यात ही घाई आपल्यालाच, ही चिंता आपल्यालाच असते. मुलाना त्याच काही वाटत नाही. त्यामुळे हा घोर आणि चिडचिडाट आणखीच वाढतो. तेव्हा आपण चिडून बोलायच नाही, आपण रागवायच नाही, आपण हात उगारायचा नाही, आपण आवाज चढवायचा नाही हे ठरवल की, ह्या नात्यात नि प्रसगात काय फरक पडतो हा प्रयोग प्रत्येक पालकान करून पहावा.

हेच समरप्रसंग जेवणाबद्दल, टी व्ही. पहाण्याबद्दल घडतात आणि आपण आपला

अधिकार गाजवून ते प्रश्न निकालात काढतो एक मुद्दा अगदी नाजूक असतो ज्याचा ह्या लेखिकेन उल्लेख केलाय रात्र होते मूल खेळायच्याच मूडमध्ये झोपायला तयार नसत आई-बाबाना आता आपल्याला एकान्त हवा अस वाटायला लागलेल असतं आणि मूल आपल आई, तू माझ्याजवळ झोप किंवा मी तुमच्या दोघाच्या मध्ये झोपणार म्हणत असत मूल अनेकदा विचारतसुद्धा तू का म्हणून माझ्याजवळ झोपत नाहीस ?

या लेखिकेचा मुलगा म्हणतो, 'तू मला कधी सांगितलच नाहीस की, तुम्हाला दोघाना एकमेकाना भेटायच असत. जेव्हा जेव्हा तू मला झोप झोप केलस आणि तुमच्या खोलीतून बाहेर काढलंस तेव्हा तू मला फसवते आहेस, टाळते आहेस, मी तुला आवडत नाही असंच मला वाटल '

त्या अनुभवावरून इतर पालकानी काही शिकाव अस त्या लेखिकेला वाटल. आता आपण ज्या गोष्टीचा आग्रह धरतो आहोत तिच मुलाच्या मनातल नेमक स्थान काय, त्याच्या मनात तो काय अर्थ लावतो आहे, आई-वडलाकडे काय म्हणून पाहतो आहे याचे अदाज आपल्याला नसतात आईवडील एकत्र झोपतात हेही मुलासमोर शक्यतो बोलल जाऊ नये याची काळजी अनेक घरात घेतली जाते, पण तुम्ही जसे मित्र-मित्र, मैत्रिणी-मैत्रिणी खेळता, बोलता, गप्पा मारता तसं आम्हालाही एकमेकाशी खूप बोलायच असत, दिवसभर आम्ही भेटू शकत नाही म्हणूत रात्रीच वेळ मिळतो, हे मुलाना समजावून सागायला हव.

मुलाच्या मनातले गोंधळ समजावून न घेता आपण आपल्याला हव ते घडवण्याचा प्रयत्न करतो, त्यासाठी आरडाओरडा करतो, मारपीट करतो तेव्हा मुलालाही आपण हाच धडा देतो नाही का ? तुला हवं ते करून घ्यायच असेल तेव्हा अस वाग, असा क्रूर हो, हा क्रूरपणा थाबायला हवा. नाही तर लहानपणी आईवडलाचा मार खाल्लेल मूल मोठेपणी बायको-मुलाना मारणं हाच जगण्याचा मार्ग आहे अस समजत.

मोठ्या माणसाचे सगळे अन्याय, अत्याचार मुकाट्यान सहन केले पाहिजेत हे मुलाना न शिकवता आम्ही क्रूरपणा केला तर तुम्ही पण उलट तो परत करा म्हणजे आमचे डोळे वेळेवर उघडतील असं शिकवायला हव. □

# रंगभूमी

## राजकीय उपहासिका

# तांदूळ निवडता निवडता

वि. भा. देशपांडे

अभिषेक या नाट्यसंस्थेच्या वतीने अशोक पाटोळे याचे नवे नाटक 'तादूळ निवडता निवडता' नुकतेच रगभूमीवर पेश झाले आहे

नाटकाच्या नावापासूनच एक कुतूहल निर्माण होते त्यातही जाहिरातीमुळे त्या कुतूहलात भरही पडते; पण या नाटकाचा प्रयोग आपण पाहू लागलो की,अनेक गोष्टीचा उलगडा होत जातो. एक मध्यमवर्गीय कुटुब त्यातल्या सर्वसामान्य घरगुती कामामध्ये गुतलेली बाई जेव्हा मत्री होते तेव्हा तिला येणारा अनुभव अनेक प्रसगातून आपल्यासमोर उभा राहतो. निवडणूक आणि मत्रीपद उपभोगताना, सोसताना तिला तिच्या नवऱ्याला काय काय सोसावे लागते त्याचे चित्रण हा नाटकाच्या मुख्य सूत्राचा भाग आहे हे नाटक विनोदाच्या अगाने प्राधान्याने जाते त्यातही उपहासाच्या अगाने विशेषत्वाने जाते. वर्तमान जीवनातील विशेषत राजकीय क्षेत्रातील प्रसगाचे, वृत्ती-प्रवृत्तीचे दर्शन घडवायचे तर त्याला मुक्त नाट्याचा बाज अधिक जवळचा असतो. या नाटकाचा तोंडवळा बदिस्त नाटकाचा असला तरी तो पूर्णतः तसा नाही. त्याचे अस्तर मुक्तनाट्याकडे झुकणारे आहे त्यामुळे नाटक आणि मुक्तनाट्य यामध्ये या नाटकाचे लेखन वावरते आहे, अर्थात ते जाणतेपणाने केलेले असणार यात शकाच नाही. अशा नाट्यरचनेचा काही भाग सुखाचा, सोयीचा असतो तसाच तो काही काळाने हाताबाहेर जाण्याचा धोकाही असतो. सोयीचा भाग असा की, राजकीय जीवनात नित्य काही ना काही लक्षवेधी घडत असते, त्याचा वापर करण्याचा मोह होतो त्या घटना, प्रसग ताजेपणाने प्रेक्षकाच्या स्मरणात असतात त्यामुळे त्याची दादही त्वरेने येत असते. अशी दाद आली की, नटवर्गही सुखावतो. मग त्यात आदिकाचे विमानतील प्रसगाचे उल्लेख येतात, एन टी. रामारावाचा सदर्भ येऊ शकतो आणि पुष्कळ काही. अद्ययावत घटना-प्रसगावर विनोद करून हसे मिळवायचे असा हिशोब आणि सवलत घ्यायचे ठरवले तर त्या मोहाचा धोकाही घ्यानात घ्यावा लागतो. तशा दोन्हीही शक्यता या नाटकाच्या प्रयोगाच्या सदर्भात जाणवत होत्या.

अर्थात या प्रकारच्या धोक्याची कल्पना नाटककाराला आणि दिग्दर्शकाला असणारच एखाद्या नाट्यमय प्रसगातून आजच्या राजकीय जीवनावर, वातावरणावर चुरचरीतपणाने काही ऐकायला, पाहायला आपल्याला बरे वाटते तो आनद या नाटकाने दिला यात शकाच नाही. नाटक पाहताना जाणवत होते की, नाटककार पाटोळे याचे सद्य-स्थितीचे निरीक्षण बारकाईचे आहे केवळ निरीक्षण चागले असून भागत नाही तर त्यातली निवड करून त्याला नाट्यरूप देण्याची क्षमता असावी लागते ती क्षमता पाटोळे याच्याकडे जरूर आहे. ( हे नाटक

पाहात असताना असे वाटून गेले की, राजकारणाच्या विषयावर उपहासाच्या अगाने लिहिणारे अनेक लोक आहेत; पण गाभीर्याने राजकीय विषयावर नाट्यलेखन करणाराची सख्या अल्प आहे तशा लेखनाचा प्रयत्न व्हावा. )

सारगद्वयानी नाटकाचा प्रयोग नेहमीप्रमाणेच परिश्रमपूर्वक पेश केला. गेल्या वर्ष-दोन वर्षांत सारंगानी गभीर प्रकृतीची नाटके लिहून वेगळे वळण स्वीकारले होते उदा. रथचक्र, जोडीदार, खोल खोल पाणी इत्यादी. या पार्श्वभूमीवर 'तादूळ' वेगळे आहेत. दिग्दर्शक म्हणून कमलाकर सारगला पहिले धन्यवाद द्यायला हवेत ते कलाकार निवडीसाठी ! ज्या भूमिकेसाठी कलाकाराची निवड केली ती त्याला चपखल बसल्याने प्रयोगाची रगत वाढत गेली नवरा झालेला बाळ कर्वे, सासूबाई झालेल्या मगल पर्वते, पी. ए झालेले शाम पोक्षे यानी आपल्या भूमिका चोख केल्याने लालनने केलेली मत्रीबाई अधिक ठसठशीत झाली. लालनने गृहस्थी बाईचा साधेपणा आणि मत्रीणबाईचा मधूनच येणारा तोरा यांचे मिश्रण उत्तमपणाने उभे केले लालन ही एक रगभूमीवरील सराईत कलाकार असल्याने तिच्या अभिनयात सहजता, परिणामकारकता होती हे नव्याने सागण्याचे कारण नाही; पण राजा नाईक, विजय पटवर्धन, अनिल कामत आणि हरीश पाठारे ह्या कलाकारानी छोटया छोटया (दोन–तीन) भूमिका करून प्रयोगाची रगत आणखी वाढती ठेवली. त्यातल्या प्रत्येक भूमिकेचा वेगळेपणा जाणवण्याइतका चागला होता. विजय पटवर्धन याला अशीच काही कामे व्यावसायिक रगभूमीवर मिळायला हरकत नसावी–इतका तो लक्षात राहिला. छोटे–मोठे कलाकार एकत्र करून असे प्रयोग नेहमीच होत असतात; पण सपूर्ण 'टीम'चे काम चागले झाले म्हणजे जो आनद होतो तो या प्रयोगाने दिला.

बाबा पार्सेकराचे नेपथ्य, अजित मर्चट याचे पार्श्वसगीत आदी प्रयोगतत्राची अगे व्यवस्थित होती त्यात वेगळेपणा असा काहीच नव्हता.

◻

## पुरुषोत्तमकरंडक स्पर्धा

महाविद्यालयीन जीवनात सन्मानाचे स्थान मिळवलेली पुरुषोत्तम करडक एकाकिका स्पर्धेची फेरी नुकतीच पार पडली पहिल्या फेरीत ( १७ ते २८ ऑगस्ट ) ३५ च्यावर एकाकिका पेश झाल्या त्यापैकी ९ एकाकिकाची निवड दुसऱ्या ( अंतिम ) फेरीसाठी झाली. पहिल्या फेरीला परीक्षक होते सौ सेवा चौहान, मा कृ. पारधी, विपिन कामुलकर अतिम फेरी १५ आणि १६ सप्टेबरला भरतनाट्यमदिरात होईल.

◻

## रंगदीपने केलेला गौरव

पुण्यातील रगदीप या नाट्यसस्थेने दिल्लीच्या गाधर्व महाविद्यालयाच सचालक श्री. विनयचद्र मौद्‌गल्य आणि गायक उद्योगपती विनय भरत राम ह्याचा सत्कार उद्यान प्रसाद कार्यालयात केला या निमित्ताने सगीतक्षेत्रातील अनेक मान्यवर व्यक्ती उपस्थित होत्या नतर विनय भरत राम याचे गायनही झाले. रंगदीपने एक चागला योग या निमित्ताने जुळवून आणला

◻

चित्रपट

# कंटाळवाणा – टू मिशनरीज

दोन आठवड्यांपूर्वी 'हर्वी' च्या चित्रपटाबद्दल लिहिलं होत त्यानतर आता 'इंग्रजी चित्रपटाना मुकावे लागणार' अशा बातम्या येऊ लागल्या. इंग्रजी चित्रपट-शौकिनाना काळजी वाटू लागली अलकाला 'मॉडर्न टाइम्स' परत यायचा आहे, तो आता चुकणार अशी भीती ज्याच्याजवळ मी त्या चित्रपटाची अमाप स्तुती केली होती त्याना वाटायला लागली; पण कराराची मुदत अजून दोन महिन्यानी वाढवल्याची बातमीही आली आहे त्यामुळे आणखी दोन महिने तरी चागले–चागले इग्रजी चित्रपट पहायला मिळतील चागला चित्रपट असेल याच आशेनं 'टू मिशनरीज' पाहिला; पण निराशाच झाली.

टेरेन्स हील आणि बड स्पेन्सर ही जोडी म्हणजे लॉरेल–हार्डीची बरीचशी नक्कल आहे अर्थात हे आधुनिक युगातले असल्याने त्याच्याइतके वेधळे न दाखवता अधिक व्यवहारचतुर रगवले आहेत बडस्पेन्सर जाडजूड, गलेलठ्ठ (शम्मीकपूरची (सध्याच्या) आठवण होईल असा), तर टेरेन्स हील उच, देखणा, निळ्या डोळ्याचा नायक.

या जोडगोळीचे 'आय अॅम फॉर द हिपोपोटॅमस', 'हू फाइडस अ फ्रेड, फाइड्स अ ट्रेजर' असे लाबलचक नावाचे पण उत्तम चित्रपट इथे येऊन गेले 'हिपोपोटॅमस'मध्ये वन्यप्राण्याच्या शिकारीला निर्बंध घालण्यासाठी त्यानी केलेले प्रयत्न मनोरंजक आणि हृद्य वाटतात, पण हील–स्पेन्सरचे प्रेक्षक त्या जोडगोळीच्या विनोदी लीला बघण्यासाठीच येतात. कुठल्या कामासाठी त्याच्या या कारवाया चालू आहेत हा प्रश्न गौण ठरतो.

'टू मिशनरीज' च्या रूपान अवतरलेले हील–स्पेन्सर आपल तितकस मनोरंजन करत नाहीत. काळ आहे साम्राज्यवादाचा. जेव्हा आशियाई देशात, डच, पोर्तुगीज, ब्रिटिश, स्पॅनिश जिथून जे लुटता येईल ते लुटत मग ते मसाल्याचे पदार्थ, कॉफी, चहा काहीही असो स्वत च्या बळाच्या जोरावर त्यानी स्थानिक लोकाना गुलामही करून घेतलेल, अशाच एका चहा-कॉफी मुबलक होणाऱ्या भागात हे दोन मिशनरीज रहात असतात स्पेन्सर खराच मिशनरी तर टेरेन्स हील, तुरुगातून सुटल्यावर काय करायच म्हणून मिशनऱ्याच सोग घेतलेला या मिशनऱ्याचे उपाय रागडे असतील, पण ते दोघंही स्थानिक लोकात विलक्षण प्रिय चर्चच्या वरिष्ठ व्यक्तीना ही लोकप्रियता सहन होत नाही, त्यावरून निर्माण होणारे तणाव या सगळ्याच दर्शन इथ घडत हे दोघ मिशनरी स्थानिक लोकाच्या मालाला योग्य भाव मिळावेत यासाठीही प्रयत्न करत असतात

कथेत म्हणावा तेवढा दम नाही, पण स्पेन्सर–हीलकडून कथेची फारशी अपेक्षा असत नाही हे तर मगाशीच सागितलय्. त्यानी केलेल्या मारामाऱ्याही विशेष मनोरंजक नाहीत. मारामाऱ्याचे उल्लेख अशासाठी की, हे दोघं प्रत्येक चित्रपटात कुणाशी तरी सामना करत असतात. मग दोघानीच इतराचा पाडाव करायचा ही 'अमिताभी' कामगिरी पार पाडण्यासाठी त्यांनी योज-

लेल्या कलृप्त्या रंजक असतात.

बड स्पेन्सरचे ठोसे सुरुवातीला मजेशीर वाटले, तरी नंतर ते कंटाळवाणे होतात. तसंच टेरेन्स हीलच्या बाबतीतही होतं. शेवटी शेवटी तर दोन-तीन वेळा असं वाटलं की चला, चित्रपट संपला; पण परत नवीन प्रसंग सुरू होऊन चित्रपट आपला पुढे चालूच असा कंटाळा येणं या जोडगोळीच्या कीर्तीशी विसंगत आहे; पण हा चित्रपट कंटाळवाणा आहे, हे मात्र तितकंच खरं.

ब्रिटिश सैनिक या दोघांसमोर त्यांच्या नेहमीच्या पद्धतीनं, अभिवादनाचं वाक्य म्हणून 'गॉड सेव्ह द क्वीन' म्हणतात. अतिशय त्रासिक चेहरा करून बड स्पेन्सर विचारतो, 'व्हाय? इज शी सिक?' या वाक्याला मात्र प्रेक्षकांची मनापासून दाद मिळाली. दाद देण्याची आणखी जागा म्हणजे छायाचित्रण. समुद्रकिनाऱ्याचं आणि स्थानिकांच्या वसाहतीचं मोठं विलोभनीय चित्रण यात केलं आहे.

—उज्ज्वला लेले

आगामी

### 'ए स्टिच इन टाइम'

नॉर्मन विस्डमची प्रमुख भूमिका असलेला चॅप्लिन धर्तीवरचा विनोदी चित्रपट 'अलका' मध्ये प्रदर्शित होणार आहे. नॉर्मन विस्डमनं वैद्यकीय क्षेत्रात घातलेल्या गोंधळाबद्दलचा हा चित्रपट आहे.

¤

### 'फ्रेंच लेफ्टनंट्स वुमन'

'क्रेमर व्हर्सेस क्रेमर' पासून उदयाला आलेली, 'ऑस्कर' विजेती मेरील स्ट्रीप या चित्रपटाची नायिका आहे. स्वातंत्र्य मिळवू पाहणाऱ्या स्त्रीची ही प्रेमकहाणी आहे.

❀

# नाट्यपंढरी



### □ नटसम्राट

नटसम्राट म्हटल्याबरोबर आज आधी डोळ्यांसमोर उभे रहातात ते कविवर्य कुसुमाग्रजांचे चिरंजीव नाटक— नटसम्राट! मग त्याच्या अनुषंगाने आठवण होते ती ते नाटक गाजवणारे रथीमहारथी, डॉ. श्रीराम लागू, दत्ता भट, सतीश दुभाषी, चंद्रकांत गोखले नि आज नटसम्राट गाजवीत असलेले तरुण अभिनेते यशवंत दत्त यांची. नकळत डोळे पाणावतात ते सतिशच्या अकाली नि शांताबाई जोग (सरकार, (कावेरी) यांच्या अपघाती निधनाच्या स्मृतीने.

एक काळ असा होता की, नटसम्राट म्हटले की— गणपतराव जोशीच! (हॅम्लेट) अन्य कुणीही नाही; पण नटसम्राट हेसुद्धा अखेर काळाच्या हातातले खेळणेच. गणपतराव गेले. मग त्या मावळत्या सूर्याची किरणे घेऊन उगवतीवर आले, नारायण श्रीपाद राजहंस— नटसम्राट बालगंधर्व! त्यांची कारकीर्द प्रदीर्घ काळ जवळजवळ पन्नास वर्षे गाजली. रसिकांना उदंड आनंद देऊन गेली. त्यांच्या पराक्रमाच्या खुणा मराठी रंगभूमीवर-विशेषत: संगीत रंगभूमीवर ठायी ठायी दिसतातच; पण मराठी मनात गंधर्वप्रेमाला, भक्तीला अढळपद प्राप्त झाले आहे.


पण याच काळात नटसम्राट गणपतराव जोश्यांचा वारसा घेऊन एक गद्य नटसम्राट रंगभूमीवर अधिराज्य गाजवीत होता. त्याचे नाव—नटवर्य नानासाहेब फाटक! शिरवाडकरांनी नटसम्राट बेतले, रचले — ते नानासाहेबांकडे पाहूनच. नानांसाठीच. मुळात नानांसाठी 'किंगलियर'चे रूपांतर करण्याची कल्पना; पण विचार करताना नि प्रत्यक्ष लिहिताना शिरवाडकरांना काही निराळेच भावले. ते सांगतात— 'लिअरच्या तीरावर रेंगाळत असतानाच केव्हा तरी एक वेगळा विचार मनात आला. नानासाहेब फाटकांसारखा रंगभूमीवरचा एक राजा घेऊनच आपण एका नव्या नाटकाची उभारणी का करू नये? शिरवाडकरांच्या मनाने असे घेणे, हाच नानांच्या अभिनयश्रेष्ठत्वाच्या गुणविशेषांचा गौरव होय. शिरवाडकर इतकेच सांगून थांबत नाहीत, तर अगदी मनमोकळेपणाने लिहितात, 'नानासाहेबांविषयी, नट म्हणून त्यांच्या सामर्थ्याविषयी मला अतिशय आदर होता. आजही आहे. नानासाहेबांसारखा महान नट माझ्या मनात उभा रहात होता आणि लियरचे नायकत्व स्वत:साठी मागत होता... नानासाहेबांनी बेलवलकरला (नटसम्राट) पुष्कळसे दिले. गद्य नटातील अग्रेसर स्थान. तिन्ही सप्तकांत चित्त्यासारखा धावणारा आवाज, स्वभावातील ताठरपणा, गणपतराव जोश्यांचे शिष्यत्व, झटकन उसळणारा अभिमान आणि संताप आणि एकूण बाह्य रेषा. ठमोदेखील त्यांच्या बाबत ऐकलेल्या कथेत मिळाली.

नानासाहेबांच्या स्वगतांवर तर कुसुमाग्रज निहायत खूप! हॅम्लेट, झुंजारराव, राघोबा, मॅकबेथ (राजमुकुट) या भूमिकांत पहाणे नि ऐकणे हा एक अपूर्व आनंद होता. नानासाहेबांचे हे सारे गुणसौंदर्य लक्षात घेऊनच 'नटसम्राट' उभा होता. त्यात स्वगतांची रेलचेल केली. आवाज लावायची संधी दिली; पण दुर्दैव असे की, नानांच्या कारकीर्दीवर

ज्याने राजमुकुट चढणार होता, तो हा ' नटसम्राट ' त्याच्या वाटणीला आला नाही. नाना तेव्हा थकले होते, वाकले होते. त्यांच्या वाणीचे वैभव हरपले होते. शिरवाडकरानी मनीमानसी पूजलेला नटसम्राट, नानाच्या दिमाखदार रूपात पहाण्याचे भाग्य रसिकाच्या भाळी लिहिले नव्हते हेच खरे !

नानासाहेबाचे शेक्सपियरशी अतूट नाते. उत्तरायुष्यात त्यानी हॅम्लेट, झुजारराव, (अथेल्लो) राजमुकुट (मॅकबेथ) गाजविले पण शायलॉक, ब्रूटस करण्याची त्याची इच्छा अपुरी राहिली खाडिलकराचा ' राघोबा ' ( भाऊबदकी ) उभा केला तसाच ' प्रतापराव ' ( काचनगडची मोहना ) साकार करण्याची त्याची फार इच्छा होती

नानासाहेबावर एके ठिकाणी लिहिताना कुसुमाग्रज मोठ्या आदराने लिहितात, ' सम्राटपद हे एकच असते. त्याचा किरीट केवळ असामान्य अशा गुणवत्तेच्या मस्तकावर चढविला जातो हे गृहीत धरले तर या पदाचे अधिकारी नानासाहेब फाटक हेच आहेत, यावद्दल मला वाटते दुमत होणार नाही. नानासाहेब फाटक म्हणजे गेल्या तीस-चाळीस वर्षातील मराठी रगभूमीचे सर्वोच्च ऐश्वर्य होय. बालगधर्वानतर मराठी रगभूमीवर गौरीशकरासारखे आकाश व्यापून उभे राहिले ते नानासाहेब फाटक कित्येक कलावताचे मोठेपण हे प्रयत्नसिद्ध असते, तर कित्येकाचे जन्मजात असते नानासाहेब या दुसऱ्या वर्गातील आहेत. माणसे घडविणारी जी कोणती दैवी शक्ती असेल, तिने देखणे रूप, भव्य चेहरा, तिन्ही सप्तकात दाडपट्ट्यासारखा लीलेने फिरणारा स्वर आणि नाट्यानुकूल प्रतिमा याचे एक अपूर्व मिश्रण तयार केले आणि ते नानासाहेब फाटक या नावाने मराठी नाट्यक्षेत्रात अवतरले, असे म्हटले तर त्यात अतिशयोक्ती होणार नाही '



# राजधानी दिल्ली

पृष्ठ ४ वरून

## सिद्धार्थ–१९२२

— — जेव्हा स्वदेशी सस्कृतीला उतरती कळा लागते आणि देशात सामाजिक पुनर्रचनेची आवश्यकता निर्माण होते तेव्हा तो देश दुसऱ्या सस्कृतीची मूल्ये आणि नियम पडताळू लागतो जर्मन इतिहासात हे अनेकदा घडले अशाच वेळी भारतीय सस्कृती आणि तत्त्वज्ञानाने जर्मन मनाला निश्चित दिशा दाखवली. अशी स्थिती बहुधा युद्धोत्तर होती.

— — ' आपण कोण आहोत ?' ' आपण कुठून आलो ?' हे प्रश्न जर्मन विचारवताना भेडसावू लागले हर्मन हेसला स्वत च्या आणि दुसऱ्याच्या अनुभवातून जेव्हा हे प्रश्न पडले तेव्हा त्याला त्यांचे उत्तर बौद्ध तत्त्वज्ञानात सापडले त्यातूनच १९२२ मध्ये ' सिद्धार्थ ' या कादबरीची निर्मिती झाली.

मनुष्याचे ऐहिक आणि आध्यात्मिक असे दुहेरी वर्तन घडविणारे लेखन जर्मन लेखक करू लागले. मनुष्य हा उच्च बौद्धिक पातळीवर जगणारा आणि नैतिक बधनात राहणाराही आहे, तसाच तो केवळ ऐहिक जीवन जगणाराही आहे आध्यात्मिक परिपूर्तता आणि ऐहिकतेचे उदात्तीकरण हा मानवाचा शाश्वत प्रश्न आहे असे जर्मनाना वाटू लागले या दोन टोकात सुमेळ साधला जावा, जीवनाची आसक्ती ही अलिप्त असावी असे विचार त्याच्या मनात निर्माण होऊ लागले. थॉमस मॅनच्या उत्तरकाळातील सर्व कादबऱ्यात ' मी कोण ' हा प्रश्न हाताळला गेला आहे ' This is something very Indian ' असे तो ॲग्नेस मेयरला लिहिलेल्या पत्रात म्हणतो थॉमस मॅनने एका भारतीय दतकथेच्या आधारे लिहिलेल्या ' दी ट्रान्सपोस्ड हेडस् ' या कथेतही (१९४०) हाच तत्त्वज्ञानाचा प्रश्न चित्रित केला आहे. परस्थ आणि स्वत्व याची एकरूपता दर्शविण्याचा त्यात प्रयत्न आहे ' (गिरीश कर्नाड याचे ' हयवदन ' हे या विषयावरील नाटक प्रसिद्धच आहे )

निबधवाचनानतर जमलेल्या सर्व मडळीना चहा–बिस्किटाचा उपहार झाला. एक–दोघेजण चहापानानतर निघून गेले. एक–दोन झोपलेले श्रोते चहाच्या आगमनाने जागे झाले चर्चेत काही प्रश्न विचारले गेले. प्रश्न तसे जुजबी होते वक्ता आणि श्रोते यामध्ये त्यावर साधक–बाधक चर्चा झाली

निबध ऐकल्यानतर माझ्या मनात अनेक विचार निर्माण झाले हजारो मैल अतरावरून परकीय लोक आपल्या देशात येतात आपल्या देशाचा आणि येथील सस्कृतीचा अनेक अगानी अभ्यास करतात. त्यासाठी सपूर्ण आयुष्यही खर्ची घालतात अशा आपल्या प्राचीन सस्कृतीचा अभ्यास करण्यासाठी एतद्देशीय लोक किती प्रयत्न करतात ? त्याच्या अभ्यासाची उत्कट इच्छा किती जणाच्या मनात निर्माण होते ? आपल्या देशात भौगोलिक, भाषिक, आचार–धर्मात इतकी विविधता असूनही आपण एकात्म कसे आहोत याचा आपण कधी विचार करतो का ? रामायण–महाभारतासारख्या महाकाव्यात अन् वेदोपनिषदात आपल्या सस्कृतीची पाळेमुळे रुजलेली आहेत. त्यातील प्रसगातून, जीवनपद्धतीतून आणि उपदेशातून भारतीयाच्या आचार–विचाराची जी बैठक तयार झाली आहे, तिचा अभ्यास आपल्याकडे कितपत जोपासला गेला आहे ? अनेक भारतीय भाषाची जननी असलेल्या सस्कृत भाषेच्या पुनरुज्जीवनासाठी आपल्याकडे कितीसे प्रयत्न केले जात आहेत ? एकीकडे आपण भिन्न भिन्न असूनही एक असल्याची ग्वाही देत बसलो आहोत. तथापी ती एकता टिकवण्यासाठी आपण स्वत चा, स्वत च्या भाषेचा, सस्कृतीचा सखोल शोध घेण्याचा प्रयत्न करतो का ? किंबहुना आपण किमान आपल्या शेजारच्या राज्यातील भाषा शिकण्याचा, तिच्यातील वाङ्मय, आचार-विचार समजून घेण्याचा तरी कितीसा प्रयत्न करतो ? देशातील एकात्मता टिकवण्यासाठी तरी अशा प्रयत्नाची नितात आवश्यकता आहे

डॉ तलगेरीचा निबध बराच उद्बोधक वाटला. मनाला अस्वस्थ करणारे अनेक प्रश्न त्यामुळे निर्माण होणे, हे त्या निबधाचे प्रेरणा–सामर्थ्य म्हटले पाहिजे.

—ललिता मिरजकर

## योजनेतील पुस्तकांची सूची

### एक झाड आणि दोन पक्षी
पॉप्युलर प्रकाशन / रु. १००
' रणांगण 'कार श्री. विश्राम बेडेकर यांचे आत्मकथन.

### टॉलस्टॉय–एक माणूस
सुमती देवस्थळे / रु. ५५
टॉलस्टॉयच्या गुंतागुंतीच्या व्यक्तिमत्त्वाचा लेखिकेने घेतलेला शोध.

### नाझी भस्मासुराचा उदयास्त
चौथी दिमाखदार आवृत्ती
वि. ग. कानिटकर / रु. १४०

### योद्धा शेतकरी
विजय परुळकर / रु. ३६
शेतकरी आंदोलनाचे, शरद जोशी यांच्या नेतृत्वाचे व शेतकऱ्यांच्या प्रत्यक्ष संघर्षाचे अतिशय जिव्हाळ्याने केलेले चित्रण

### श्रीग्रामायन
श्री. ग. माजगावकर / रु. २५
जीवनाची चाकोरी सोडून, पायपीट करून, ग्रामीण प्रश्नाचे वेगवेगळे पैलू जवळून पाहण्याचा एक आगळा प्रयत्न.

### बलसागर
श्री. ग माजगावकर / रु. ३०
राष्ट्रवादी भूमिकेतून नव्या क्षितिजांचा घेतलेला शोध.

### डॉ. आयडा स्कडर
सौ. वीणा गवाणकर / रु. २२
ग्रामीण भागात डॉक्टरी सेवा नेण्याचा प्रयत्न भारतात प्रथम डॉ. आयडांनी केला. त्यांच्या त्यागमय जीवनाची कहाणी.

### एक होता कार्व्हर
सौ. वीणा गवाणकर / रु. ३०
वैराण मुलुखाचे सुजलाम् सुफलाम् भूमीत रूपांतर करणारा थोर निग्रो संत आणि शास्त्रज्ञ डॉ. कार्व्हर यांचे प्रेरणादायी चरित्र.

### आंबेडकर भारत
बाबुराव बागुल / रु. २०
गोष्टीरूप आंबेडकर चरित्र

### पूर्णिया
अनिल अवचट / रु. १२
अलिप्तपणे तरी भेदकतेने घडवलेले बिहारच्या माणसाचे दर्शन.

### फिडेल, चे आणि क्रांती
अरूण साधू / रु. २२
जुलमी राजवटीच्या टाचांखाली दडपल्या गेलेल्या लॅटिन अमेरिकन समाजाला नवी स्वप्ने देऊ पाहणाऱ्या क्रांतीचा इतिहास.

### लेक वालेसा
डॉ. श्रीकांत मुंदरगी / रु. २२
लेक वालेसा आणि पोलिश जनता यांनी रशियन दडपशाहीविरुद्ध दिलेल्या लढ्याचे चित्रण–मराठीत प्रथमच.

### विज्ञानेश्वरी
डॉ. दत्तप्रसाद दाभोळकर / रु. २०
किचकट गणितांच्या आणि अवघड प्रमेयांच्या, दाट जंगलातून मूलभूत शास्त्रीय सिद्धांताच्या पाऊलवाटा शोधणारे- खास ललितशैलीतील पुस्तक.

### तुम्हाला विज्ञानयुगात जगायचंय....
डॉ. दत्तप्रसाद दाभोळकर / रु. २०
विज्ञानयुगातील अनेक आश्चर्यकारक नव्या गोष्टी, नवे प्रयोग तुम्हाला सोप्या भाषेत समजून–उलगडून दाखविणारे पुस्तक.

### आपली मुलं
शोभा भागवत / रु. २०
आपली मुलं मोठी होत असताना त्यांच्याकडे पाहण्याचा, त्यांना स्वतंत्र व्यक्तिमत्त्व देण्याचा दृष्टिकोन देणारं पुस्तक.

### मला निसटलंच पाहिजे
अनु. श्रीकांत लागू / रु. २०
इतिहासाच्या त्या धामधुमीच्या काळात, एका हुकुमशहाच्या मगरमिठीतून, जिवावर उदार होऊन ते निसटले व भारताच्या भूमीत उतरले. त्यांच्या साहसाची कथा.

### सांगत्ये ऐका
हंसा वाडकर / रु. १४
रसिकांची, व सर्वसामान्य वाचकांची मान्यता लाभलेले खळबळजनक, मोकळे, अनोखे आत्मवृत्त

### शतपावली
रवींद्र पिंगे / रु. १६
रवींद्र पिंगे यांच्या सहजसुंदर लेखणीतून उतरलेली बारा उत्कृष्ट व्यक्तिचित्रे.

### सबला
माधव शिरवळकर / रु. १२
स्त्री–पुरुषाबाजीवर झोत टाकणारी, सत्यघटनेवर आधारित कादंबरी.

### रूपवती भार्या शत्रुः !
ॲड. माधव कानिटकर / रु. २५
ॲड. कानिटकर यांच्या समर्थ लेखणीतून उतरलेले, काही गाजलेले खून खटले.

### हैद्राबाद मुक्तिसंग्रामातील अज्ञात कथा
अशोक परळीकर / रु. १२
निझामी राजवटीतील अमानुष अन्यायाचे आणि हैद्राबाद मुक्तीसाठी प्राणपणाने दिल्या गेलेल्या लढ्याचे दर्शन घडविणाऱ्या कथा.

### लाल किल्ल्यातील अभियोगाची कहाणी
पु. ल. इनामदार / रु. २०
ग्वाल्हेरचे गांधीवादी वकील श्री. पु. ल. इनामदार यांनी महात्मा गांधी खून–खटल्यातील सहावे प्रमुख आरोपी डॉ. परचुरे यांचे वकीलपत्र घेऊन या खटल्यातून निर्दोष मुक्तता केली. त्या खटल्याची कथा.

### तीर्थरूप आक्का
शारदाबाई आपटे /रु. ५
जुन्या कुटुंबातील कर्मयोगी सेविकेची कथा.

### टच
अशोक प्रभाकर डांगे / रु. १०
काही विदेशी चित्रपट कथांचा संग्रह.

### काही दिवस श्यामचे– काही राधाचे
फिरोझ रानडे / रु. २५
मध्यमवर्गीय श्यामच्या संसारकथा.

### आर डॉक्युमेंट
लेखक : आयर्व्हिंग वॉलेस
अनुवाद : अशोक जैन / रु. १०
राजकीय वर्तुळात खळबळ उडवून देणाऱ्या जगप्रसिद्ध लेखकाच्या कादंबरीचा परिचय

MANOOS WEEKLY ( Licensed to post without prepayment of postage No–11 ) Regd. No. PNCW–28

**लोकांनी, लोकांचें, लोकांसाठी चालवलेले राज्य हे ज्याच राजकीय वचन होते परंतु अतिरेक्यांनी केवळ स्वार्थासाठी केलेले लोकांचे आणि देशाचे विच्छेदन ज्याला पाप वाटत होते अशा एका लोकशाही नेतृत्वाची कहाणी.**

अब्राहम लिंकन

# फाळणी टाळणारा महापुरुष

वि.ग.कानिटकर



**भरपूर छायाचित्रांसह प्रकाशित झालेली पहिली डीलक्स आवृत्ती. मोठा क्राऊन आकार. पृष्ठे ४००**

**दीडशे रुपये किंमतीचा दर्जेदार चरित्रग्रंथ आपल्या संग्रही असण्यासाठी**

# ऑगस्ट ८४ योजना

## ५०० रुपये + ५ वर्षे = ४०० रुपये + ५०० रुपये

**आपण ५०० रुपये ५ वर्षांसाठी राजहंस प्रकाशनाकडे ठेव म्हणून ठेवल्यास ४०० रुपये किंमतीची पुस्तके आपणास व्याजाच्या मोबदल्यात मिळू शकतील आणि ५ वर्षांनंतर ठेवही परत मिळेल.**

# शिवाय

**योजनेतील सभासदांना आज उपलब्ध असलेली व पुढील ५ वर्षांत प्रकाशित होणारी सर्व राजहंस प्रकाशने २५% सवलतीत मिळू शकतील.** ( पोस्ट खर्च सभासदांचा राहील. )

**सूचना :** १. योजनेतील सभासदाला ४०० रुपये किंमतीची पुस्तके मिळणार आहेत. ज्या सभासदांकडे '**फाळणी टाळणारा महापुरुष**' हा ग्रंथ असेल वा नको असेल त्यांना त्या किंमतीची इतर पुस्तके मिळू शकतील.

२. चेक वा ड्राफ्ट 'राजहंस प्रकाशन' या नावाने काढावा.

राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव पेठ
नागनाथ पाराजवळ
पुणे ४११ ०३०.
दूरध्वनी : ४४३४५९
वेळ : सकाळी ११ ते ५

**श्री. वा. र. गोडे**
४१ भवानी शंकर रोड
चितळे पथ कॉर्नर, जोशी वाडी
दादर (पश्चिम) मुंबई ४०० ०२८
वेळ : दुपारी २ ते ७

योजनेतील पुस्तकांची सूची मलपृष्ठ १ वर